म. ग्रं. सं. ठाणे
विषय ... शास्त्र
सं. क्र. १८६२



# राष्ट्रीय
# [illegible]यात्रा

REFBK-0012989

प्रा. श्री. शेरात

३४४५८ प्रवासी
३२१ १८.३.६२

# राष्ट्रीय तीर्थयात्रा

[ शिवनेरी ते चितोडगड ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
REFBK-0012989
REFBK-0012989

: लेखक :

मा. भी. थोरात

( 'पदयात्रा'चे लेखक )

किंमत दोन रुपये

प्रकाशक :

**ग. ल. ठोकळ**, बी. ए; बी. टी.
ठोकळ प्रकाशन,
लक्ष्मी रस्ता, पुणें २.

पहिली आवृत्ति : १९६२

एकमेव विक्रेते :
**श्री लेखन वाचन भांडार**,
लक्ष्मी रोड, पुणें २.

मुद्रक :

**मा. प. तळेकर**,
श्री दत्त मुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

# तीर्थयात्रेचा खुलासा

" ब्रह्मदेवानें सृष्टींतलें तीळतीळ सौंदर्य जमा केलें आणि तिलोत्तमा बनविली. ती जशी सुंदर तशीच ' पद्मिनी. ' पद्मिनीचें नांव तर तिच्या गुणानें नि स्वरूपानें सर्वांना माहीत असेल; पण ती सीलोनच्या हमीरसिंह चौहानाची मुलगी होती, हें फार थोड्या लोकांना माहीत असेल. कारण पद्मिनी म्हटलें कीं शूर रजपुतांची आठवण होते. राजस्थानच्या रजपूत वीरांच्या इतिहासांतच पद्मिनीचा इतिहास एकरूप झाला आहे. दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन खिलजी पद्मिनीच्या स्वरूपाबद्दल पुष्कळ गोष्टी ऐकून होता. ती आपल्याला मिळावी या हेतूनें तो चितोडवर चालून आला आणि थोडेथोडके नाहीं, तर चांगले सहा महिने त्यानें चितोडला वेढा दिला; परंतु पद्मिनी राहोच, तिचें नुसतें दर्शनहि त्यास मिळालें नाहीं. शेवटीं त्यानें कपट केलें व महाराणा भीमसिंहास निरोप देऊन सांगितलें कीं, ' मी तर फक्त पद्मिनीच्या स्वरूपाची तारीफ ऐकून तिला पाहण्यासाठींच आलों आहें. तिनें मला नुसतें दर्शन दिलें कीं मी परत जातों ! ' भीमसिंहाला—पद्मिनीच्या पतीला—हें खरेंच वाटलें आणि एवढी मोठी लढाई नि रक्तपात टाळण्यासाठीं भीमसिंहानें बादशहास पद्मिनी दाखविण्याचें कबूल केलें; परंतु ती प्रत्यक्ष नाहीं. आरशांत तिचें प्रतिबिंब दाखविण्याचें ठरलें. त्याप्रमाणें अल्लाउद्दिनानें परमसुंदरी पद्मिनीचा चेहरा आरशांत पाहिला आणि तो परत फिरला. त्याला पोंचविण्यासाठीं भीमसिंह किल्ल्याबाहेर पडला. तेथें अल्लाउद्दिनानें आपली फौज लपवून ठेवली होती. त्यानें कपटानें भीमसिंहास कैद केलें आणि किल्ल्यावर बालराजास निरोप दिला कीं, ' जोंपर्यंत पद्मिनीस सहीसलामत माझ्या स्वाधीन करणार नाहींस, तोंपर्यंत मी भीमसिंहास सोडणार नाहीं ! ' या निरोपानें किल्ल्यावरील सर्वच लोक मोठ्या पेंचांत पडले. खूप खळबळ माजली. कुणालाच कांहीं सुचेनासें झालें. इकडे आड तिकडे विहीर. भीमसिंह सामान्य माणूस का होता ? त्या वेळीं म्हणजे सन १२७५ मध्यें चितोडचा महाराजा लक्ष्मणसिंह हा होता. तो अज्ञान असल्यानें राज्याचा सर्व

कारभार त्याचा चुलता—भीमसिंहच—पाहात असे. असा कर्ता पुरुषच जर शाहाच्या कब्जांत गेला तर इतरांनीं काय करावें ? परंतु पद्मिनीनें या पेंचप्रसंगांतून मार्ग काढला. शाहाच्या कपटी डावपेंचास 'जशास तसें' या न्यायानें उत्तर देण्याचें तिनें ठरविलें आणि शाहास निरोप दिला कीं—' मी स्वतःच शाहास भेटूं इच्छितें. शाहाच्या तंबूंत ही भेट व्हावी; परंतु एका अटीवर ! माझ्याबरोबर माझ्या सर्व दासींनाहि तिथें येण्याची परवानगी असली पाहिजे आणि त्यांनाहि सन्मानानें वागविलें पाहिजे ! ' पद्मिनीची ही अट शाहानें एकदम मान्य केली. पद्मिनी आपल्याला मिळणार या कल्पनेनें शाहा बेहोष झाला होता. ही साधीसुधी दिसणारी अट किती भयंकर होती, हें ओळखण्याइतका शाहा शहाणा राहिला नव्हता. ठरल्याप्रमाणें पद्मिनी त्याच्या तंबूकडे निघाली. एकापाठोपाठ एक सातशें पालख्या किल्ल्याबाहेर पडल्या आणि शाहाच्या ऐन तंबूंतच घुसल्या. या सातशें पालख्यांत सातशेंच दासी होत्या काय ? छे ! अत्यंत निवडक असे सातशें शूर रजपूत वीर त्यांत दडून बसले होते, आणि त्या पालख्या आपल्या खांद्यांवरून वाहून नेणारे कहार तरी कोण होते ? तेहि निवडक सैनिकच होते ! पद्मिनीनें शाहास निरोप दिला कीं, ' भीमसिंहाची एकदा शेवटची भेट घेण्याची माझी इच्छा आहे. तेव्हां तशी परवानगी द्यावी ! ' शाहानें पद्मिनीची ही इच्छाहि मान्य केली आणि अर्धा तास त्यांना भेटीसाठीं परवानगी दिली. एवढ्या अवधींत एका पालखींत बसवून भीमसिंहास गुपचूप किल्ल्याकडे पाठवून देण्यांत आलें आणि सातशें रजपूत वीर पालखीबाहेर पडले. अडीच-तीन हजार कहारांनीं हातांत शस्त्र धरलें आणि शाहा अल्लाउद्दीन खिलजीहि सावध झाला. घनघोर युद्ध झालें. भीमसिंह सुखरूप गडावर पोंचले. युद्धांत शाहाचा सपशेल पराभव झाला आणि तो जीव घेऊन दिल्लीस पळाला ! "

"शाबास! वाहवा !" दुसरा प्रवासी सहज उद्गारला. पुन्हां तो पहिला प्रवासी पुढें सांगूं लागला; " नंतर पुन्हां मोठ्या तयारीनिशीं शाहा अल्लाउद्दिनानें पद्मिनीसाठीं चितोडवर हल्ला केला आणि त्यांत पराकाष्ठेच्या प्रयत्नानंतरहि रजपुतांचा पराभव झाला ती गोष्ट वेगळी; पण त्याहि वेळेस पद्मिनी मात्र शाहास जी मिळाली नाहीं ती नाहींच ! आपल्या शेंकडों रजपूत स्त्रियांसमवेत तीहि जौहारांत सामील झाली नि शाहाच्या तावडींतून तिनें आपली कायमची मुक्तता करून घेतली.

"बस्स ! इकडे रजपूत आणि दक्षिणेंत मराठे. महाराणा प्रताप आणि छत्रपति शिवाजी ! या दोन जमाती आणि त्यांतले हे दोन वीर ! भारताचे सुपुत्रच ते !"

इंदोरहून मी रतलामकडे गाडीनें चाललों होतों. वरील संवाद एका डब्यांत चाललेला मी ऐकत होतों. स्टेशन जवळ आल्यानें गाडीची गति मंदावत होती. रात्रीची वेळ. त्या प्रवाश्यास त्याच स्टेशनवर उतरायचें असल्यानें चर्चेचा समारोप करीत तो म्हणाला,

**" गढ तो चितौड गढ और सब गढैयाँ**
**रानी तो पद्मावती और सब गधैयाँ ॥**
**झरना झरे गऊमुख पडे, नरमें नाथ की ठोड ।**
**क्रोड युग तपस्या करें, तब पावे गढ चितौड ॥ "**

सामानसुमान आवरून तो प्रवासी केंव्हांच निघून गेला; परंतु त्याचे हे शेवटचे उद्गार माझ्या डोक्यांत घोळतच राहिले. आतां राणी पद्मिनी पाहणें तर मला शक्यच नव्हतें. परंतु चितोडगड पाहण्याचा पक्का निश्चय याच वेळीं मीं करून टाकला आणि तो पार पाडला.

यानंतर सात-आठ दिवसांची गोष्ट. तेव्हां मी चितोडगड पाहून आलों होतों आणि उदयपूर, हळदीघाट वगैरे ठिकाणें पाहून असाच रेल्वेनें गोरमघाटांतून प्रवास करीत होतों. हीहि वेळ रात्रीचीच होती. अतिशय सुंदर नि अवघड असा हा घाट आहे. रात्रीचा अंधारहि त्याचें सौंदर्य झांकूं शकत नव्हता. मीं सहज एका सहप्रवाश्यास विचारलें, " या घाटाचें नांव काय ? कांहीं ऐतिहासिक घटनांशीं याचा संबंध आहे का ? " त्यावर तो प्रवासी म्हणाला, " राजस्थानांत व राजस्थानच्या जवळपास असा एकहि घाट नाहीं कीं ज्याच्याशीं महाराणा प्रतापसिंहाच्या नांवाचा संबंध नाहीं. घाटच काय, परंतु राजस्थानचा डोंगर अन् डोंगर राणा प्रतापसिंहाच्या पदस्पर्शानें पावन झालेला आहे !" आम्ही पुष्कळ गोष्टी बोललों. राजस्थानच्या इतिहासासंबंधीं या गृहस्थास पुष्कळच बारीकसारीक माहिती होती आणि नंतर चौकशीअंतीं कळलें कीं, हे गृहस्थ रिटायर्ड प्रोफेसर होते. म्हणूनच ते मला एवढी माहिती सांगू शकले. चर्चेच्या ओघांत ते म्हणाले, " एवढा प्रतापी राजा, पण स्वतःचीं मुलं भाकरीवांचून भुकेनें तडफडतांना पाहण्याचें दुर्दैवानें त्याच्या नशिबीं आलें. कंदमुळें खाऊन राहिला. गवतावर झोपला. झाडाखालीं संसार थाटला; परंतु अखेरपर्यंत शत्रूशीं

झुंजत राहिला. 'खाने पडे पत्ते परंतु न दासताका त्रास है.' चितोडगड परत घेतल्याशिवाय सुखमय जीवन जगायचें नाहीं, अशी प्रतिज्ञाच राणा प्रतापसिंहानें केली होती!"

प्रस्तुत पुस्तकांत चितोडचें प्रदीर्घ वर्णन आलेलें आहे. तसेंच शिवनेरीचेंहि. महाराणा प्रताप यांच्या जीवनाशीं जसा चितोडचा अविभिन्न संबंध आहे, तसाच छत्रपति शिवाजीमहाराजांच्या जीवनाशीं शिवनेरीचा. हीं दोन्हीं ठिकाणें म्हणजे राष्ट्रीय तीर्थक्षेत्रेंच आहेत आणि म्हणूनच प्रस्तुत पुस्तकास 'राष्ट्रीय तीर्थयात्रा' असें नांव दिलें आहे. एरव्हीं यांत महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान आणि सौराष्ट्रांतील अनेक प्रेक्षणीय स्थळांची माहिती दिलेली आहे. आचार्य विनोबा भावे यांच्या सहवासांत आलेले अनुभव दिले आहेत. हीं सर्वच स्थळें अत्यंत प्रसिद्ध व प्रेक्षणीय आहेत. माहिती मनोरंजक व उद्बोधक आहे. वाचकांस आवडेल अशा पद्धतीनें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. पुस्तक जास्तींत जास्त निर्दोष करण्याकडे लक्ष पुरविलें आहे. ऐतिहासिक माहिती शक्य तों कांटेकोर नि बिनचूक देण्याचा प्रयत्न केला आहे. माझें तेवढें सर्व काम मीं केलें आहे. पुस्तकांतील उणीवा दाखविण्याचा—तें बरेंवाईट ठरविण्याचा—अधिकार आपला आहे. तो आपल्यासाठीं राखून ठेवला आहे.

पुस्तकाचे प्रकाशक श्री. ग. ल. ठोकळ यांचे काय आभार मानावेत! तें आमचेच आहेत. या क्षेत्रांत पदार्पण करण्याचें साहस त्यांच्याचमुळें मला झालें. तरीसुद्धां माझें कर्तव्य म्हणून त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानून आपली रजा घेतों.

मु. कासारवाडी, पो. चास,
ता. सिन्नर, जि. नासिक.

**मा. भी. थोरात**

# अनुक्रमणिका


१. महाराष्ट्रांतील दोन तीर्थें १–४

प्रस्थान– पुण्यक्षेत्र आळंदी – ज्ञानेश्वराचें मंदिर – धन्य देहू गांव–

२. कार्ल्याचीं लेणीं— हॉलीडे कॅम्प ४–५

३. पुण्यदुर्ग शिवनेरी ६–१३

शिवाईचें मंदिर–शिवकुंज–ऱ्हमानी मशिद–जन्मस्थानाची वास्तु– कडेलोटाचें स्वप्न– कडेलोट– लेण्याद्रि पर्वत– शिवकालीन कागदी वाडा.

४. इंदोरच्या वाटेवर १३–१७

अद्भुत पाणीपुरवठा योजना–बेगम मुमताजमहलचें प्रेत–शाही किल्ला–जुम्मा मशिद

५. विनोबांच्या सहवासांत १७–२५

पहाटेची पदयात्रा– ज्ञानेश्वराची भाषा– सर्वोदय नगर– सफेद कोटीवरील दिनक्रम–

६. इंदोरचीं प्रेक्षणीय स्थळें २६–२९

काचेचें मंदिर–प्रेक्षणीय माणूस–होळकरांचा राजवाडा–

७. वीरभूमि चितोडगड २९–४९

चलफिरशीं दाता – भैंरो पोल – हनुमानपोल – जोरला प्रवेशद्वार– लता मंगेशकरचें गाणें – महाराणा कुंभा

यांचा राजवाडा—जोहारमैदान – जयस्तंभ—एक रमणीय स्थान – सावधान – अशीहि मुलगी असू शकते— चारशें वर्षांनंतर रंग कायम – कालीमातेचें भव्य मंदिर— सूर्यकुण्ड— दंतकथा – पद्मिनीमहाल – संत मिराबाईचें मंदिर – कुम्भा श्यामजी मंदिर—

८. राजस्थानी हृदय ४९–५२

९. एक प्रेक्षणीय शहर—उदयपूर ५२–५८

एकवीस हिरे – जगनिवास पॅलेस—औट घडीचा राजा— काचेचा दरबार हॉल – जनाना महल— मर्दाना महल – हजारों प्रतिबिंबें-

१०. मौंट आबूचें अप्रतिम शिल्प ५८–६५

दीडशें कोटींची कलाकृती ?— देलवाडा मंदिर —असे सिनेमा असले तर—आजकालचे सिनेमा – अंधश्रद्धा कीं आत्म-विश्वास ?—लुणवसहि मंदिर—केवळ हातसफाई—

११. गिरनारच्या सिंहप्रदेशांत ६५–७७

धुक्याचें साम्राज्य—गुरुदत्ताचें शिखर— तो अविस्मरणीय क्षण—श्रीगुरुदत्ताचा मित्र —पूर्वजांची भेट – लोकनृत्य— मवैयाचें रासनृत्य – विवाहप्रसंगींचें गीत —कोपरगांवची टोपी सौराष्ट्रांत – शेठजींना सल्ला – अप्परकोट किल्ला— जेलजवळील दर्गा – नबाबाचें कबरस्थान – सात वारांचें महात्म्य.

: १ :

## प्रस्ताव

जलप्रलय होणार असें भाकीत कांहीं इटालियन गूढवाद्यांनीं केलें. वृत्तपत्रांनीं त्याला प्रसिद्धि दिलें. मी खेड्यांत राहतों. आसपास आदिवासी लोकांची वस्ती फार. ही बातमी त्यांनींच प्रथम मला कळविली. त्यामुळें प्रथम मीं ती हंसण्यावारीच नेली; परंतु जेव्हां मीं स्वतःच एका प्रसिद्ध वृत्तपत्रांत ती वाचली तेव्हां तर मला जबर धक्काच बसला ! प्रलयाच्या भीतीनें नव्हे, पण वृत्तपत्रकारांना मी भ्यालों. काय भयंकर प्राणी असतात हे ! मागें एकदा मी हिमालयांत असाच कुठें तरी भटकत होतों. 'फ्ल्यू'ची सांथ येणार अशी जी सनसनाटी बातमी तिकडच्या वृत्तपत्रांनीं दिली, कीं ती वाचूनच 'फ्ल्यू' व्हायचा. अठरा सालच्या भयंकर तापसराईशीं या सांथीची त्यांनीं तुलना करून तिचें भयानक नि विदारक चित्र उभें केलें होतें. घाबरून मीं जो पळ काढला तों थेट घर गांठलें. त्या वेळीं ठरलेल्या माझ्या तिबेटच्या प्रवासाची योजना फिसकटल्यामुळें माझें जें नुकसान झालें तें कधींच भरून येणारें नाहीं; परंतु एक मोठा फायदाहि त्याच वेळीं झाला. तेव्हांपासून मीं एक कला हस्तगत केली. माझी भीति त्यामुळें कायमची नाहींशी झाली. म्हणून वृत्तपत्रकारांचे मानावे तेवढे आभार थोडेच आहेत. एक पैसाहि खिशांत नसतां, डोंगरावरून घसरून जखमी झालेल्या स्थितींत मी सहीसलामत घरीं येऊं शकलों. पैशाशिवाय प्रवास करण्याची हुन्नर मी शिकलों.

तेव्हांपासून मला संकटांत उडी घेणें आणि त्यांतून बाहेर पडणें यांत एक प्रकारची मौज वाटते. संकटें नसलीं कीं मला कसेंसेंच होतें. अगदीं चुकल्याचुकल्यासारखें. एक प्रकारची निष्क्रियताच येते म्हणा ना. जर संकटेंच नाहींत तर कामच काय करायचें ? "संकटकाळीं माणसाची छाती इंच दोन इंच फुगली पाहिजे. एक प्रकारचा उन्माद नि मस्ती त्याला चढली पाहिजे" असें नामदार यशवंतराव म्हणतात ना तेंच खरें, खिशांत फक्त एवढेच पैसे घ्यावेत, कीं तेवढ्यावर आपल्याला दूर कुठें तरी

हजारबाराशें मैलांवर जातां येईल. मग पाहा कशी मौज येते ती. अमावास्येच्या रात्रीं स्मशानांत असंख्य वेताळांनीं जमून तांडवनृत्य आरंभावें, तद्वत् शेंकडों संकटें आपल्याभोंवतीं भवभाऱ्यांप्रमाणें घोंगावतात. मग उन्माद आणि मस्तीशिवाय माणूस जगूंच शकत नाहीं. ग्रीस देशांतील स्पार्टन् लोक निर्बल मूल जन्मतांच तें पाण्यांत फेकून देत. या त्यांच्या रानटी कृत्यांतील खरी खुमारी तेव्हांच कळते. वेळोवेळीं भारतभ्रमणांत मीं हातानें संकटें विकत घेतलीं. नाहीं तर केवळ तीस रुपये भांडवलावर केरळ ते काश्मीरपर्यंत आठ नऊ महिने प्रवास करणें किंवा तीन रुपये भांडवलावर सौराष्ट्र, राजस्थानांत तीनचार हजार मैल प्रवास करणें याला आपण दुसरें काय म्हणाल ? अशाच एका मोठ्या प्रवासांतील कांहीं मजेदार हकीगती व पाहिलेल्या गंमती आपणांस आज सादर करीत आहें. त्या वाचून आपली खात्री पटेल कीं, नेहमींच धोका टाळण्यांतहि एक प्रकारचा धोकाच असतो. त्यामुळें माणूस निरनिराळ्या अनुभवांपासून वंचित राहतो. सांगण्याचा हेतु इतकाच, कीं इटालियन गूढवाद्यांनीं जें भाकीत केलें त्यामुळें मला कांहींच वाटलें नाहीं. वाईट वाटलें तें या गोष्टीचें, कीं हा प्रलयाचा दिवस मीं अगोदरच माझ्या प्रवासासाठीं बाहेर पडण्याचा म्हणून ठरवून ठेवलेला असल्यानें या भाकितामुळें मला या दिवशीं घर सोडण्यांत खूप अडथळा निर्माण झाला. निदान पावसाळ्यांत तरी मीं घर सोडूं नये असें घरांतील सर्वांचेंच त्यामुळें मत पडलें नि मग मोठ्या मुष्किलीनें त्यांना सर्वांना राजी करुन मला बाहेर पडावें लागलें. मात्र ठरल्याप्रमाणें मीं घर सोडलें तें याच दिवशीं.

### महाराष्ट्रांतील दोन तीर्थें

देहू-आळंदीचें नांव महाराष्ट्रीय वाचकांस नवीन नाहीं. "चाकण चौऱ्याशीं धन्य देहू गांव । तेथील पवित्र जन्म आम्हां ॥" असें तुकाराममहाराजांनींच देहूचें वर्णन केलेलें आहे. मी पुण्यास गेलों होतों. तेथून माझीं कांहीं पुस्तकें घेऊन पुढील प्रवासास सुरुवात करणार होतों. पूर्वी मीं फक्त देहूच पाहिलेली असल्यानें आळंदी पाहण्याची माझी इच्छा तशीच राहून गेलेली होती. या वेळीं योगहि असा चांगला आला होता कीं, ऐन आषाढी एकादशीच्या दिवशींच मी आळंदीस जाऊं शकलों.

### पुण्यक्षेत्र आळंदी

मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटमधील मराठे लोकांनीं काढलेल्या फंडांतून एक धर्मशाळा येथें बांधलेली आहे. अशा अनेक धर्मशाळा येथें आहेत; परंतु ही चांगली,

मोठी आणि प्रशस्त असल्यानें मी तेथेंच उतरलों होतों. मला एक चांगल्यापैकीं खोलीहि मिळाली होती. रात्रीपासूनच 'ज्ञानबा-तुकाराम' करीत नि टाळ-मृदंगांच्या गजरांत दिंड्यांवर दिंड्या येऊन धडकत होत्या. ठिकठिकाणीं फडाफडांतून टाळ-मृदंगांच्या ठेक्यावर भजनाचा गजर चालला होता. ज्ञानदेव-तुकारामांच्या गजरानें अक्षरशः सारें वातावरण दुमदुमून गेलें होतें. महाराष्ट्रांतील या संत-श्रेष्ठींवरील गाढ श्रद्धा पाहून मला त्यांच्या या भक्तांचें कौतुक वाटलें. ती रात्र मीं जागूनच काढली. झोप तरी कशी येणार? सर्व वारकरी जागेच होते. धर्मशाळेंतील गर्दी हळूहळू वाढतच होती. रातराणीच्या धुंद सुगंधानें वातावरणांतहि एक प्रकारची धुंदी भरलेली होती. एकादशी-च्या दिवशीं देवदर्शनास हजारों लोक येत असल्यानें गर्दीमुळें मोठमोठ्या रांगा लावाव्या लागतात, असें कळल्यानें मी रात्रींच जाऊन मंदिर पाहून व देवदर्शन करून आलों.

## ज्ञानेश्वरांचें मंदिर

हें मंदिर नदीकांठावर बांधलेलें असलें तरी त्याच्या तिन्ही बाजूंस आळंदी गांव वसलेलें आहे. ज्या बाजूतें नदी आहे तेथेंहि पुष्कळ दुकानें टाकून गेल्यावर नदी लागते. या दुकानांतून मुख्यतः मुरमुरे, साखरेचे काजू, बत्तासे, साबण्या, कुंकू, बुक्का, तुळशीच्या माळा, चंदनाचा गंध, मिठाई वगैरे मालच असून तो प्रत्येक यात्रिक तीर्थाहून गांवीं जातांना प्रसाद म्हणून थोडा तरी घरीं घेऊन जाणारच. नदी-वर स्नान करून या दुकानांच्या रांगेंतून पुढें आल्यावर उजव्या हातास हें भव्य मंदिर लागतें. विशाल प्रवेशद्वारांतून आंत जातांच एक मोठें प्रांगण व मंदिर दिसतें. मंदिरांत वर चांदीचा मुखवटा असलेली ज्ञानेश्वरांची समाधि आहे. हेंच मुख्य देवालय. इतरहि ल्हान ल्हान देवस्थानें आंत आहेत. त्या सर्वांचें दर्शन घेऊन मी खोलीकडे परतलों.

या दिवशीं हजारों भाविक येथें जमलेले असतात. आळंदीस संपूर्ण प्रदक्षिणा घालणें, देवदेव करणें यांतच त्यांचा सबंध दिवस जातो आणि मग द्वादशीस येथें उपवास सोडून सर्वजण आपापल्या घरीं भजनें गात जातात. मी शिवनेरीस मोटारनें चाललों असतां रस्त्यानें शेंकडों लोक खांद्यावर पताका घेऊन टोळीटोळीनें चालतांना मला दिसत होते. शेंदोनशें मैल पायीं प्रवास करून नित्यानें येणाऱ्या कांहीं दिंड्या व वैयक्तिक वारकरीहि येथें येतात आणि देहू-आळंदीच्या दर्शनानें कृतकृत्य

झाल्याचें समाधान घेऊन परत जातात. आज तीनशें-सव्वातीनशें वर्षांपासून हा क्रम चालू आहे नि पुढेंहि चालूं राहणार !

## धन्य देहू गांव

देहूची इंद्रायणी नदी ही परम पवित्र. हीच नदी पुढें आळंदीहूनहि जाते; परंतु इंद्रयणीचा देहू येथील डोह प्रेक्षणीय आहे· केवळ धार्मिक भावनेनेंच नाहीं तर रसिकास हें ठिकाण खात्रीनें आवडेल असेंच आहे. अशा या रमणीय डोहावर एकान्तांत येऊन तुकाराममहाराज परमेश्वराचें भजन-चिंतन करीत बसत· ते ज्या मोठ्या शिलाखंडावर बसत असत तेथें हल्लीं एक ल्हानसें मंदिर बांधलेलें आहे; परंतु ती शिला भक्तजनांच्या दर्शनासाठीं आंत त्याच जागेवर ठेवलेली आहे· मी देहूला यापूर्वीच गेलों होतों· त्या वेळीं यात्रा वगैरे नव्हती. त्यामुळें अत्यंत शांत वातावरणांत मीं दोन दिवस येथेंच मुक्काम केला होता. तुकाराममहाराजांचे आठवे वंशज बाबासाहेब इनामदार यांना मी भेटलों होतों. त्यांच्याकडून त्यांच्या घराण्याच्या इतिहासांतील अनेक गोष्टींची माहिती मला मिळाली होती. स्वतः तुकाराममहाराजांनीं जे शेंकडों अभंग रचले, त्यांतल्या त्यांच्या हस्ताक्षरांत लिहिलेल्या कांहीं अभंगांची वही मीं त्यांच्याकडून पाहिली. या संतश्रेष्ठाचें हस्ताक्षर पाहून मला खूप आनंद झाला होता. देहूस त्या वेळीं भारत-सेवक-समाजातर्फे एक शिबिर भरलें होतें. त्या शिबिराच्या व्यवस्थापकांनीं माझीं दोन-तीन व्याख्यानेंहि शिबिरांत ठेवलीं होतीं. गोपाळपुऱ्यापासून इंद्रायणीच्या डोहापर्यंत एक सुंदर रस्ता त्या शिबिरांतील विद्यार्थ्यांनीं तयार केला आहे. त्याचें उद्‌घाटन जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांच्या हस्तेंच झालें होतें. तेव्हां मी तेथेंच होतों. आळंदीनंतर मी सरळ शिवनेरीकडेच निघून गेलों.

: २ :

## कार्ल्याचीं लेणीं

पुण्याहून मुंबईला जातांना वाटेंत लोणावळा हें थंड हवेचें प्रसिद्ध ठिकाण लागतें, हें सर्वांना माहीतच आहे. येथून जवळच पांचसात मैलांवर प्रसिद्ध कार्ल्याचीं प्राचीन लेणीं आहेत. अर्थातच हीं लेणींहि मीं पुष्कळ

दिवसांपूर्वी पाहिलीं होतीं. त्यामुळें तिकडे जाण्याचें कारण पडलें नाहीं. तरीहि या भव्य नि प्रेक्षणीय लेण्यांसंबंधानें चार शब्द लिहिलेच पाहिजेत असें वाटतें. कारण त्यामुळें एका प्रेक्षणीय स्थळाची वाचकांना थोडक्यांत ओळख होईल.कार्ला येथील हीं बुद्धधर्मीय लेणीं इसवी सनोत्तर अदमासें पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत कोरलेलीं आहेत. येथील एक विस्तीर्ण चैत्यगृह हें हीनयान पंथीय बौद्धांच्या चैत्यगृहांपैकीं एक सर्वोत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या भव्य प्रवेशद्वारांत एक विशाल सिंहस्तंभ असून आंतील बाजूस अर्धगोलाकृति गवाक्ष, कलापूर्ण शिल्पकला, व कोरीव मूर्ति आहेत. येथील बुद्धाच्या उठावदार मूर्ति मात्र महायान पंथीयांनीं नंतर म्हणजे इ. स.च्या ५-६ व्या शतकामध्यें कोरल्या आहेत व त्या मूळ योजनेस धरून नाहींत. लेण्यांमधून ब्राह्मी लिपीमध्यें कोरलेले अनेक शिलालेख असून हीं लेणीं खोदण्यासाठीं ज्यांनीं दान दिलें आहे, त्यांच्या नांवांचा त्यांत उल्लेख केलेला आहे. अशा एका लेखामध्यें हें चैत्यगृह जंबुद्वीपांतील अद्वितीय 'शैलगृह' म्हणून वर्णिलें आहे. अर्थातच कालदृष्ट्या हीं लेणीं वेरूळ व अजिंठा वगैरे प्रसिद्ध लेण्यांपूर्वीचीं असल्यानें वरील उल्लेख बरोबर आहे असेंच म्हणावें लागेल. कारण वेरूळ व अजिंठा हीं दोन ठिकाणें सोडलीं तर इतकें भव्य चैत्यगृह मीं पाहिलेल्या भारतांतील अनेक लेण्यांतहि मला आढळून आलें नाहीं. वेरूळ-अजिंठ्याचीं लेणीं यापेक्षां भव्य नि सुंदर असलीं तरीहि हें चैत्यगृह प्रेक्षणीय आहे यांत शंकाच नाहीं.

## हॉलीडे कॅम्प

कार्ल्याचीं लेणीं ज्या पर्वतांत आहेत तेथून जवळच पायथ्याला हॉलीडे कॅंप बांधलेले आहेत. सुट्टीच्या दिवसांत हवा खाण्यासाठीं अनेक श्रीमंत नि हौशी लोक येथें येतात. सर्वसाधारण माणसासहि येथें चारदोन दिवस राहतां येईल अशी स्वस्तांतील सोयहि केलेली आहे. मी एकदोन दिवस या कॅंपांतील मजेदार वातावरणांत राहिलों आहें. मोठीच मौज वाटते. अनेक नवविवाहित जोडपीं मोठ्या हौसेनें येथें येऊन चार आठ-दिवस मौज करून आपापल्या गांवीं जातात. अर्थातच यांत सुशिक्षितांचाच भरणा असतो हें सांगणें नकोच. कार्ल्याच्या या कॅंपांतील ते दोनतीन दिवस ज्या आरामांत मीं घालविले ते संस्मरणीय आहेत.

: ३ :

# पुण्य दुर्ग शिवनेरी

छत्रपति शिवाजीमहाराजांचा जन्म शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचें बालपण येथेंच गेलें. शिवनेरीवरच आपल्या बालक्रीडा त्यांनीं केल्या. छत्रपतींच्या जन्मस्थानाची वास्तु, शिवाईचें मंदिर, मोगलकालीन कमानी मशीद अशीं प्रेक्षणीय ठिकाणें शिवनेरीवर आहेत आणि आनंदाची गोष्ट म्हणजे अद्यापहि हीं सर्व ठिकाणें चांगल्या अवस्थेंत आहेत. तीं प्रत्येक मराठी माणसानें पाहिलीं पाहिजेत. भारताच्या भाग्यविधात्याच्या जन्मानें नि पदस्पर्शानें पुनीत झालेल्या शिवनेरीस राष्ट्रीय तीर्थाचें महत्त्व आहे. शिवजयंतीस तर येथें मोठा उत्सव दरसाल साजरा केला जावा असें मला वाटतें. त्यामुळें या राष्ट्रपुरुषाच्या उज्ज्वल चारित्र्याचें दर्शन घडून लोकांना राष्ट्राभिमानाची स्फूर्तिच लाभेल. शिवाजी या नांवांतच किती स्फूर्ति सांठविलेली आहे! संयुक्त महाराष्ट्राचा नुकताच जो राष्ट्रव्यापी, महान् व न भूतो न भविष्यति असा लढा झाला त्याचें कारण काय? या गोष्टींचा जेव्हां मी माझ्या अल्पमतीप्रमाणें विचार करतों, तेव्हां मला वाटतें कीं, छत्रपति शिवाजीमहाराजांचा, तुकोबा-ज्ञानोबांचा हा महाराष्ट्र आहे. मराठ्यांचा महाराष्ट्र. तो त्यांच्या इच्छेविरुद्ध गुजराथला जोडणें कुणाला कसें परवडणार? तशांत एका छत्रपतींच्या नांवाचा भरपूर उपयोग सरकारच्या विरोधकांनीं केला आणि त्यामुळेंच महाराष्ट्रांत अत्यंत वेगानें काँग्रेसपक्षाची घसरगुंडी झाली. काँग्रेसची लोकप्रियता शून्यावर आली. नेहरू ज्या रस्त्यानें मुंबईत प्रवेश करीत तो रस्ता पूर्वीं माणसांनीं फुलून जात असे. 'चाचा नेहरू' झिंदाबादच्या घोषणा करून हजारों बालकें त्यांना सामोरीं जात. त्याच नेहरूंच्या मोठमोठ्या प्रतिमांना लोकांनीं 'खास' हार अर्पण करून रस्त्यारस्त्यावर, नाक्यानाक्यावर लावल्या. नेहरूंच्या गळ्यांत 'चपलाहार'! हें दृश्य पूर्वीं कधींच कुणालाच पाहतां आलें नव्हतें आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्याच धमालींत एकदा नेहरू मुंबईस आले. तेव्हां तर त्यांना लोकांना टाळण्यासाठीं खास हेलिकॉप्टर विमानानें मुरारजी-भाईंच्या घरीं जावें लागलें. मुरारजीभाई हें नांव तर एक शिवी होऊन बसलें. हा सर्व कशाचा प्रताप? विरोधकांना एक मोठें शस्त्र या वेळीं सांपडलें होतें आणि त्याच

शस्त्रानें त्यांनीं काँग्रेसपक्ष महाराष्ट्रांतून नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केला. हें शस्त्र म्हणजे फक्त शिवाजीचें नांव ! याच नांवाचा काँग्रेसनें जेव्हां उच्चार केला, तेव्हां महाराष्ट्र काँग्रेसचा गेलेला प्राण पुन्हा आला नि काँग्रेस महाराष्ट्रांत पूर्ववत् हालूं—डोलूं लागली. असा अगाध महिमा ज्या नांवांत आहे, ज्या नांवांत येवढी शक्ति-स्फूर्ति भरलेली आहे त्या पुण्यपुरुषाच्या जन्मस्थानाच्या दर्शनानें कोणत्या मराठी माणसाच्या अंगावर मूठभर मांस चढणार नाहीं ? असा कुणी मराठी माणूस महाराष्ट्रांत तरी सांपडणार नाहीं.

ते पावसाचे दिवस होते. सकाळीं सात वाजतांच मी किल्ला पाहण्यासाठीं बाहेर पडलों. बरोबर जुन्नर गांवांतील एक फोटोग्राफरहि घेतला होता. पुढें आमची दोघांची चांगलीच मैत्री जमली. शिवनेरीच्या पार्श्वभूमीवर आणि किल्ल्यावर आम्हीं पुष्कळ फोटो घेतले. या फोटोग्राफरचा मला किल्ला पाहण्यासाठीं मार्गदर्शक म्हणूनहि बराच उपयोग झाला. एक दीर्घ वळण घेऊन आम्ही शिवनेरी किल्ल्याच्या अगदीं पायथ्याला जाऊन पोंचलों. तेथून गडावर चढून जाण्यासाठीं चांगला रस्ता आहे. किल्ल्यावर जाण्यासाठीं हा जो रस्ता आहे त्या रस्त्यानें सात दरवाजे लागतात. दरवाज्यांना वापरलेल्या भक्कम लाकडी फळ्या व पोलादी खिळे अद्याप चांगल्या अवस्थेंत आहेत. रस्त्यानें जों जों वर चढत जावें तों तों मागच्या बाजूकडील देखावा अधिकाधिक रमणीय दिसूं लागतो. शेतें लहान लहान होत जातात. शेतकरी दिसेनासे होतात. मोठमोठीं घरें मुलांच्या खेळांतील लहान लहान घरांसारखीं दिसूं लागतात. किल्ल्यावर जातांना प्रथम लागतो नाना दरवाजा. नंतर परवानगी दरवाजा. नंतर हत्ती दरवाज्यांतून पीर दरवाज्यापर्यंत जातां येतें. शिवाईचा दरवाजा टाकून आपण पुढें गेलों कीं, फाटक दरवाजा लागतो आणि नंतर शेवटच्या कुलपकर दरवाज्यानंतर आपण थेट गडावर पोंचतों. शिवनेरीवर जाण्यापूर्वीं प्रथम शिवाईचें दर्शन घ्यावें लागतें; कारण शिवाई आपण किल्ल्यावर चढतों त्याच बाजूनें मध्येंच एका उंच कड्यावर ठाण मांडून बसली आहे आणि पहिलें दर्शन घेण्याचा मान शिवाईलाच आहे. जिजामातेनेंहि कितीदा तरी शिवाईचें दर्शन घेतलेलें आहे. शिवाजीसारखें पुत्ररत्न ज्या आईमातेच्या कृपेनें झालें आणि देवी बनण्याचें भाग्य आई जिजामातेला लाभलें, अशा त्या शिवाईदेवीचें दर्शन घेऊन, आम्हीं किल्ल्यावर जाण्याचें ठरविलें.

## शिवाईचें मंदिर

एका बाजूनें तटाच्या भिंतीवरून दिसणारा खोलच खोल कड्याचा भाग, दुसऱ्या अंगाला उंच शिवनेरीचा माथा. पांढऱ्या चांफ्याच्या ( फुलांच्या ) दाट राईतून शिवाईकडे रस्ता जातो. थंडगार छाया नि सुगंधी हवा. एका प्राचीन गुंफेंत शिवाईनें वास्तव्य केलें आहे. आंत अत्यंत शांत नि गंभीर वातावरण होतें. मीं दर्शन घेतलें. तेथील बालराजे शिवाजी आणि जिजामातेचें दर्शन घेतलें आणि पुजाऱ्यास विचारलें, "किल्ल्याची ज्यांत ऐतिहासिक माहिती दिलेली आहे, असें एखादें पुस्तक आपल्याजवळ आहे काय ?" परंतु असें कुठलेंच पुस्तक त्याच्याजवळ नसल्यानें त्यानें 'नाहीं' असें सांगितलें· तेव्हां आपण गांवांतून फोटोग्राफरला आणलें हेंच चांगलें झालें, असें मला वाटलें. शिवाईच्या मंदिरांत थोडी विश्रांति घेऊन आम्ही तेथून निघालों व माथ्यावर गेलों.

## जिजामातेचा पुतळा

किल्ल्यावर गेल्यावर प्रथम दर्शन होतें तें या पुतळ्याचें. बालशिवाजी आणि जिजामाता यांचा हा धातूचा पुतळा आहे. नव महाराष्ट्र राज्यनिर्मितीच्या दिवशीं म्हणजेच शिवजयंतीस या पुतळ्याचें अनावरण महाराष्ट्र राज्याच्या मुख्य मंत्र्यांच्या हस्तें झालें, असा उल्लेख असलेला एक शिलालेखहि येथें लावलेला आहे. सध्यां ऊन्हवाऱ्यापासून नि पाणीपावसापासून संरक्षण करण्यासाठीं पुतळ्याभोंवतीं एक साधी पत्र्याची शेड बनविलेली आहे. लवकरच येथें भव्य इमारत बांधली जाणार आहे, असें येथील दोन सरकारी रखवालदारांकडून कळलें.

## शिवकुंज

सुमारें नव्वद हजार रुपये खर्चून येथें शिवकुंज बांधण्याची योजना आहे. त्यांत या पुतळ्यासाठीं इमारत, एक सुंदर बाग, प्रवाश्यांसाठीं कांहीं खोल्या, विश्रांतीची जागा अशा प्रकारची सर्व सोय केली जाणार आहे. लवकरच कामास सुरुवात केली जाणार आहे.

## कमानी मशीद

जिजामातेच्या या पुतळ्यापासून जवळच ही मशीद आहे. ही मशीद अत्यंत प्राचीन आहे. मोगलकालाच्या प्रारंभींच्या दिवसांत ती बांधलेली आहे, असें

म्हणतात. मशिदीखालीं पाण्याचें एक मोठें टाकें आहे. हिंदूंचें एक पवित्र तीर्थ म्हणून या टाक्याचें महत्त्व आहे. मशिदीपेक्षां टाकें प्राचीन कालांत खोदलेलें आहे. मशीद त्यानंतर यावर बांधण्यांत आली असें म्हणतात. ही मशीद ज्या मोठ्या कमानीखालीं बांधण्यांत आलेली आहे, ती कमान फार सुरेख आहे. कमानीच्या दोन्ही बाजूंस दोन उंच मिनार असल्यानें तर ती फारच सुरेख दिसते.

## जन्मस्थानाची वास्तु

येथेंच सुमारें सव्वातीनशें वर्षांपूर्वी बालशिवाजीचा जन्म झाला. हें स्थान म्हणजे एक चिमुकली दुमजली दगडी इमारत आहे. लांबी-रुंदीनें अगदींच कमी अशी ही छोटेखानी इमारत; पण केवढें भाग्य वांट्याला आलें तिच्या ! एका महापुरुषाचा जन्म या छोट्याशा जागेंत झाला. दुसऱ्या मजल्यावर ल्हानशी बैठकीची जागा आहे. तेथें बसून समोर पूर्वेकडे दूरवर दिसणारा देखावा रमणीय वाटतो. कितीहि वेळ पाहातच राहावें असें दृश्य दिसतें. जुन्नरचीं ल्हान ल्हान घरें पाहून मौज वाटते. एखाद्या प्रदर्शनांत ठेवलेल्या छोट्याशा शहराच्या मॉडेलसारखेंच तें दिसतें. छत्रपति शिवाजीमहाराजांचे गुरु दादोजी कोंडदेव यांचा एक वाडा जुन्नर गांवांत आहे. तो येथून पुष्कळच ल्हान दिसतो. किंचित् डावीकडे जुन्नरच्या उत्तरेस दिसतो लेण्याद्रि पर्वत. पावसानें ताजी टवटवीत झालेली वनश्री भारी नयनरम्य दिसत होती. या थंडगार हवेंत व ताज्या वाहत्या वाऱ्यांत मी व माझे फोटोग्राफर मित्र बराच वेळ बसलों. ते मला येथील कांहीं ऐतिहासिक माहिती सांगत होते व मी शांतपणें ऐकत होतों.

## कडेलोटाचें स्वप्न

तो दूरवर दिसतो आहे तो प्रसिद्ध भीमाशंकर. तेथील घनदाट वनश्री तर येथूनहि रमणीय दिसते, परंतु तिचा दरवळलेला सुगंध नि त्यानें भारलेलें वातवरण अनुभवण्यासाठीं तेथेंच गेलें पाहिजे. तेथूनच भीमा नदीचा उगम झाला. या इकडे पलीकडे आहे नाणेघाट. नाणेघाट मोठा प्रसिद्ध आहे. कोंकणांतून देशावर रहदारी पूर्वी याच घाटानें व्हायची. कोंकणांतील कल्याण आणि शूर्पारक हीं मोठीं व प्रसिद्ध बंदरें. देशोंदेशींचा माल या बंदरांतून भारतांत यायचा आणि भारतांतील माल निर्यात व्हायचा. इराण, अरबस्तान, ग्रीस इत्यादि नाना देशींचे नाना लोक, त्यांच्याबरोबर माल वाहणारे

ल्माण लोकांचे तांडे, त्यांची बैलांवरून माल वाहून नेतांना मोठी वर्दळ या घाटांत असायची. असा हा रहदारीनें गजबजलेला घाट होता.या बाजूस येथून जवळच संतश्रेष्ठ तुकोबारायांचें गुरुघराणें नांदत होतें. तें गांव ओतूर होय. तुकोबांनीं आपल्या अभंगवाणींत आपल्या गुरूचा उल्लेख भक्तिभावानें केलेला आहे आणि त्यांचे लाखों भक्त अजूनहि टाळमृदंगांवर तो उल्लेख तितक्याच भक्तीनें करीत आहेत. अभंगाची ती मधुर चाल आठवते तुम्हांला ? त्या गोड चालीवर म्हणा बरें. त्याशिवाय यांतला रस घेतां येणार नाहीं. तो उल्लेख असा आहे—

**राघव चैतन्य केशव चैतन्य ।**
**सांगितली खूण माळिकेची ।**
**बाबाजी आपुलें सांगितलें नाम**
**मंत्र दिला राम कृष्ण हरी ऽ ऽ ॥**

तो पाहा लेण्याद्रीच्या अष्टविनायकांपैकीं एक प्रसिद्ध गणपति. लेण्याद्रि तरीं किती सुरेख ! चहूंबाजूंनीं कोरलेलीं सुबक लेणीं, म्हणूनच लेण्याद्रि नांव सार्थ आहे त्याचें. आतां या इकडे उजवीकडे पाहा. जुण–नेरच्या–जुन्नरच्या दक्षिणेला ते कांहीं प्राचीन ढासळलेले उघडेबोडके बुरूज दिसतात ना, ते पूर्वीं एका मजबूत तटबंदींत होते. तटबंदी पडून गेली नि ते पोरक्या पोराप्रमाणें एकेकटेच आशाळ-भूतपणें पाहात उभे राहिले आहेत. जुण–नेर याच तटबंदींत होतें. पूर्वीं कालान्तरानें सरकत सरकत तें लेण्याद्रीकडे चाललें आहे. कडेलोटाच्या त्या तिकडे हायस्कूलच्या इमारतीजवळ खालीं पायथ्याला जें मैदान दिसतें आहे ना, त्याच मैदानावर नव–महाराष्ट्र-राज्यनिर्मितीच्या दिवशीं मोठा मेळावा भरला होता आणि नवमहाराष्ट्र-राज्याचे पंतप्रधान ना. यशवंतरावजी चव्हाण त्या वेळीं येथें आले होते. हायस्कूलचें नांव ऐकतांच स्वप्नांतून कडेलोट होऊन एकदम भानावर आल्याप्रमाणें मीं म्हटलें, "अं, इथेंच तो मेळावा भरला होता ! चला, चला लवकर, हायस्कूलमध्यें व्याख्यान आहे माझें तीन वाजतां. लवकर गेलें पाहिजे. दोन वाजून गेले असतील आतां नाहीं ?" मी दिवसाकडे पाहात म्हणालों आणि किल्ल्यावरील इतर कांहीं प्रसिद्ध ठिकाणें चटकन् पाहून आम्हीं खालीं उतरून जाण्याचें ठरविलें.

**कडेलोट**

किल्ल्यावरील गुन्हेर वगैरेंसारख्या शत्रूच्या लोकांना शासन करण्यासाठीं या जागेचा उपयोग केला जात असे. येथून ढकलून दिलेला गुन्हेगार सव्वीस ठिकाणीं

आदळत या कड्यावरून थेट किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत जाऊन पडत असे. कडेलोटाची मोडकळीस आलेली एक दगडी कोठी अजूनहि पाहावयास मिळते. कडेलोट करतांना गुन्हेगारास बरोबरच्या इतर शिपायांना खालीं लोटून देतां येऊं नये व दंगामस्ती करतां येऊं नये अशी खास जागा व सोय या कोठींत आहे. या कड्यावरून खालीं पाहिलें असतां भीतीनें अंगावर शहारे आल्यावांचून राहात नाहींत. येथून जुन्नर—लेण्याद्रीकडचा देखावा विशेष सुंदर दिसतो. शिवनेरीवरील प्रसिद्ध अशीं एवढींच ठिकाणें आहेत. येथून वर पुन्हा एका लहानशा उंच टेकडीवर चढून गेलें असतां, तेथें एक प्राचीन छत्री, मशीद व एक पाण्याचें टाकें पाहण्यासारखें आहे. किल्ल्यावर तशीं लहान-मोठीं पन्नासएक स्वच्छ पाण्याचीं टाकीं आहेत. त्यांतील गंगा-जमुना हें टाकें विशेष प्रसिद्ध आहे. त्यांतील पाणी थंडगार व रुचकर असून फार पाचक आहे असें म्हणतात. आम्हीं तें पाणी स्वतः पिऊन पाहिलें. तें थंड आणि पिण्यास गोड होतें यांत शंकाच नाहीं.

शिवनेरीहून आम्ही हायस्कूलच्या इमारतीपर्यंत आलों तेव्हां ठीक तीन वाजले होते. त्यामुळें मला ताबडतोब व्याख्यानासाठीं हायस्कूलमध्यें जावें लागलें.

सर्व तयारी झालेली होती. त्यामुळें ताबडतोब व्याख्यानास सुरुवात केली. व्याख्यानाचा विषय होता.—' माझा उत्तर हिंदुस्थानचा प्रवास ' !

## लेण्याद्रि पर्वत

जुन्नरच्या उत्तरेला सुमारें दोन-तीन मैलांवर हा पर्वत आहे. असें सांगतात कीं, या भागांतल्या सर्वच पर्वतांत अशीं किती तरी लेणीं ठिकठिकाणीं कोरलेलीं आहेत. खुद्द शिवनेरीहि अशाच लेण्यांनीं व्यापलेला आहे. येथून तीनचार मैलांवर जें मानमोडी लेणें आहे तें तर प्रसिद्ध आहे. लेण्याद्रि हा तसा खूप उंच नि मोठा पर्वत आहे. शिवनेरीपेक्षांहि तो प्रचंड आहे. याच्या पोटाला जीं लेणीं कोरलेलीं आहेत त्याच जागेची उंची शिवनेरीच्या माथ्याइतकी आहे. लेण्याद्रीचा गणपति ज्या गुहेंत आहे ती गुहा अत्यंत भव्य असून सुरेख आहे. या गुहेपुढें दगडाखालीं झांकलेलीं पाण्याचीं मोठीं टाकीं असून त्यांत भरपूर पाणी असतें. लेण्याद्रीवरून शिवनेरीकडील देखावा मनोहर दिसतो. हें स्थान अशा शांत नि रमणीय ठिकाणीं आहे कीं, प्रवाशयांस तेथें क्षणभर बसून विश्रांति घ्यावीशीच वाटते. गुहेपर्यंत चढून

जाण्यासाठीं ज्या अतोनात पायऱ्या चढाव्या लागतात, त्यामुळें तर विश्रांतीची अधिकच गरज भासते.

## शिवकालीन कागदी वाडा

जुन्नर येथील हातकागद-कारखाना पाहण्यासारखा आहे. लेण्याद्रि पाहून मी गांवाकडे येत होतों. नदीवर मला कांहीं मजुरांच्या डोक्यांवर अनेक पाट्या दिसल्या. त्यांत पांढरेशुभ्र कसले तरी गोळे पाहून कुतूहलानें मीं विचारलें कीं, 'हे गोळे कशाचे आहेत ?' तेव्हां मजुरांकडून कळलें कीं, हे कागदाच्या लगद्याचे गोळे आहेत. लागलीच मीं हा कागदाचा कारखाना पाहण्याचें ठरविलें. जुन्नर-गांवांत मुलामुलींच्या शाळेंतून माझे व्याख्यानाचे दोन-तीन कार्यक्रम ठरलेले होते. सर्व आटोपून मी कारखाना पाहण्यासाठीं गेलों तों पांच वाजून गेले होते. त्यामुळें मला दुसरे दिवशीं हा कारखाना पाहावा लागला. कारण पांच-साडेपांचला तो बंद होतो.

दुसरे दिवशीं जेव्हां मी हा कारखाना ज्या कागदी वाड्यांत आहे त्या भागांत गेलों नि कारखान्याचे मॅनेजरला भेटलों, तेव्हां त्यांचें आडनांव कागदी असें आहे हें कळल्यावर मीं त्यांना विचारलें कीं, "या भागांत कागदाचा कारखाना आहे म्हणून कीं कागदी नांवाचे लोक राहतात म्हणून कागदीवाडा हें नांव पडलें ?" त्यावर मॅनेजरसाहेब म्हणाले, "तें मलाहि निश्चित नाहीं सांगतां येणार ! कारण छत्रपति शिवाजीमहाराजांच्या कालापासून याच भागांत कागदाचा कारखाना आहे आणि हा कागद तयार करणारे आम्ही कागदी लोकहि त्याच वेळेपासून या भागांत राहतों आहोंत. तेव्हांपासूनच कागदी वाडा हें नांव पडलेलें आहे !" त्यावर मीं म्हटलें, "परंतु ही कारखान्याची इमारत तर नवी दिसते आहे, आणि यांत कांहीं यंत्रेंहि आहेत." त्यावर ते म्हणाले, "हे समोर जे पडलेल्या इमारतीचे भग्नावशेष दिसतात ना, येथें पूर्वीचा कारखाना होता. या नव्या कागदकारखान्याच्या इमारती आतांच बांधलेल्या आहेत, आणि यंत्रसामग्रीहि अलीकडेच खरेदी केलेली आहे. तरीसुद्धां सर्व प्रक्रिया येथें हातानेंच केल्या जातात. फक्त कागदाचा लगदा कुटण्याचें कामच मशीननें केलें जातें, आणि तयार झालेला कागद घोटून त्याला एक प्रकारची जी तकाकी येते किंवा पॉलिश केल्यासारखें दिसतें असा कागद होण्यासाठीं तो खूप घोटावा लागतो. हें काम आम्ही अजूनहि

हातानेंच करतों. परंतु फार श्रम त्यांत पडतात, म्हणून त्यासाठींहि नुकतेंच यंत्र आणलें आहे." नंतर मला सर्व कारखाना दाखविण्यांत आला. कागद तयार करणें हें अत्यंत साधें व सुटसुटीत काम आहे. परंतु त्यासाठीं ही कला आत्मसात् करावीच लागते. प्राचीन कालापासून चालत आलेली ही कला पाहून मला कौतुक वाटलें. अत्यंत सफाईनें सर्व कामें कामगार करीत होते. कागदी-साहेबांनीं इतरहि पुष्कळ माहिती या कारखान्यासंबंधानें मला दिली. ते म्हणाले, "शिवकालीन अनेक सरकारी कामकाजांत याच कागदाचा उपयोग केलेला आहे. असे कांहीं कागदहि आमच्या घराण्यांतील वृद्ध मंडळींनीं जपून ठेवलेले आहेत. मध्यंतरीं हा आमचा धंदा पार बुडण्याच्या बेतांत आला होता; परंतु सरकारनें आतां आम्हांला पुष्कळच सवलती दिलेल्या आहेत. आर्थिक मदतहि केली आहे. आमचा सर्व कागद सरकारच खरेदी करतें. त्यामुळें पुन्हा आमचे या धंद्यांत पाय टिकले आहेत."

हा कारखाना सहकारी पद्धतीनें चाललेला आहे. कामगारांच्या तीन श्रेणी असून सव्वाशें, नव्वद व पंचेचाळीस ते पन्नास रुपये अशा प्रमाणांत मजुरीचे दर आहेत. सध्यां येथें फक्त साठ कामगारच काम करीत आहेत. तरीहि वर्षाला सुमारें बेचाळीस हजार पौंड कागद ते तयार करतात. त्याची किंमत सुमारें पन्नास हजार रुपये इतकी होऊं शकते. इतरहि जोडधंदे हे मजूर करूं शकतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ३८८८५ दि:
क्रमांक ३२२

: ४ :

## इंदूरच्या वाटेवर

शिवनेरीनंतर पूज्य विनोबा भावे यांना भेटण्यासाठीं मी इंदूर-कडे निघालों होतों. वाटेंत बऱ्हाणपूर हें मोठें शहर लागतें. येथें माझ्या पूर्वीच्या प्रवासांत दोनतीन वेळां उतरलों होतों; परंतु येथील कांहीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्याचें राहूनच गेलें होतें. त्याचें कारण म्हणजे पावसाळा. याहि वेळीं पावसाचे दिवसांतच मी येथें गेलों होतों, तरीहि हीं ठिकाणें पाहिल्या-

शिवाय पुढें जायचें नाहीं असें मीं ठरवून टाकलें नि त्याप्रमाणें त्यांतलीं पुष्कळ ठिकाणें पाहिलीं.

बऱ्हाणपूर हें इतिहासप्रसिद्ध शहर आहे. इतिहासकालांत येथें तोफा ओतण्याचा कारखाना होता, आणि येथील तोफा अजूनहि ठिकठिकाणीं पाहावयास मिळतात. याहिपेक्षां बऱ्हाणपूरचा प्राचीन इतिहास उपलब्ध आहे. येथील म्युनिसिपल कमिटीचे सेक्रेटरी श्री. बाजपेयी यांना मी भेटलों होतों. त्यांचेकडून मला शहरासंबंधानें पुष्कळच माहिती मिळाली. ते एम. ए., एलएल. बी. असून त्यांना ऐतिहासिक गोष्टींत मोठाच रस वाटतो. त्यांनीं स्वतः लिहिलेली एक छोटीशी पुस्तिकाहि मला भेट दिली. तींत बऱ्हाणपूरच्या ऐतिहासिक घटनांची थोडीफार माहिती असून प्रेक्षणीय स्थळांचीहि माहिती बरीच दिलेली आहे. या शहराबद्दल असें म्हटलें जातें कीं, स्कंदपुराणांत बभ्नपूरनगराचा जो उल्लेख आलेला आहे तें बभ्नपूर म्हणजेच हल्लींचें बऱ्हाणपूर शहर असावें. पुराणकालांत 'वसाना' आणि 'चम्पानगर' या नांवानेंहि हें शहर प्रसिद्ध होतें, असेंहि बोललें जातें. सन १४०० मध्यें खानदेशांतील प्रसिद्ध राजा नासिरुद्दीन यानें या शहराची डागडुजी करून पुन्हा मोठें शहर याच जागेवर वसविलें व दौलताबादचे प्रसिद्ध संत शेख बुरहानुद्दीन यांचें नांव त्यानें या शहरास दिलें. तेव्हांपासून तेंच नांव कायम आहे. सुमारें दोनशें वर्षें बऱ्हाणपूर फारूखी राजांच्या राजधानीचें शहर होतें. अजूनहि येथील नदीकांठच्या प्रचंड मोडकळीस आलेल्या किल्ल्याचे अवशेष, जुम्मा मशीद, सूखा भंडारा ऊर्फ खूनी भंडारा अशा ठिकाणांवरून बऱ्हाणपूरच्या गतवैभवाची कल्पना येते.

## अद्भुत पाणीपुरवठा—योजना

बऱ्हाणपूर स्टेशनपासून दोन-तीन मैल शेतांतून पायवाटेनें चालत जाऊन आपण ही योजना पाहूं शकतों. खूनी भांडारा या नांवानें ही जागा ओळखली जाते. प्रवासी या ठिकाणीं अगदीं खूनी भांडारा या ठिकाणाजवळ जाऊन पोंचतो, तरी त्याला वर कांहींच विशेष असें दृश्य दिसत नाहीं. खरी गंमत आहे ती भूमिगत आहे. जमिनीच्या खालीं सुमारें शेंसव्वाशें फूट खोल उतरावें लागतें आणि मग ही मौज पाहतां येते. पत्र्याच्या झांकणानें झांकून ठेवलेल्या एका लहान तोंडाच्या विहिरींत उतरावें लागतें. ही विहीर अत्यंत अरुंद अशी असली तरी ती चांगलीच खोल आहे. सुमारें अकरा लोखंडी शिड्यांवरून शें-दीडशें पायऱ्या उतरून आपण

खालीं गेल्यावर एक अत्यंत अरुंद व सुमारें सातएक फूट उंचीचें भुयार लागतें. याच भुयारांत गुडघाभर खोलीचें स्वच्छ व थंडगार पाणी लागतें. या पाण्यांतून पुढें गेल्यावर तर अतिशय मौज दिसते. संगमरवरी पांढऱ्याशुभ्र दगडांचें हें भुयार असून त्यांतून चहूंबाजूंनीं सारखें पाणी झिरपत असतें. नागमोडी वळणें घेत या भुयारांतून एका वेळीं एकाच माणसास बरोबर चालत जातां येतें. अर्थात् पाऊलवाटेप्रमाणें मागें दुसरे जोडीदारहि चालत येऊं शकतात. आंत अशुद्ध हवेची अथवा विषारी जिवाणूंची मुळींसुद्धां भीति नाहीं. अर्थात् प्रवाश्यास ती वाटत असते, ती गोष्ट वेगळी; परंतु येथून स्टेशन व तेथून थेट बऱ्हाणपूर गांवापर्यंत पांच मैल म्हणजे एकूण सात मैलपर्यंत जो पाण्याचा पाट वाहात जातो त्यावर जागोजाग झरोके ठेवलेले आहेत. त्यामुळें एवढ्या खोलीवरहि हवा व पाणी स्वच्छ असतें. अर्थातच आंतून हा पाट पुष्कळ ठिकाणीं वळणें घेतो. त्यास कांहीं फांटेहि फुटल्याप्रमाणें येथें दिसतात. त्यामुळें रस्ता चुकण्याचीहि भीति वाटत होती. तशांतच मला जे मार्गदर्शक म्हणून शाळेंतील तीनचार विद्यार्थी मिळाले होते, तेहि नवीनच दिसत होते. त्यामुळें तर रस्ता चुकण्याचा संभव अधिक होता. परंतु अज्ञानांत माणूस किती धाडस करूं शकतों हें मला त्या विद्यार्थ्यांना पाहून कळलें.बेधडक ते कोणत्याहि रस्त्यानें कुठेंहि जायचे. अर्थातच मला त्यांच्या मागें तर कधीं पुढें चालावें लागत असे. मधून मधून वरून येणाऱ्या झरोक्यांतल्या प्रकाशांत व हवेंत थांबून पुन्हा अंधारांत एका पाठोपाठ एक चालावें लागे. कंदील होता; पण दिव्याखालीं अंधार या म्हणीप्रमाणें झालें. विहिरींत उतरतांना वर दिव्याखालीं व वरहि अंधारच होता. भुयारांतहि त्याचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. आपलें कांहीं काम नाहीं; म्हणून कीं काय थोड्याच वेळांत तोहि आपोआप विझला नि मग अंधाराच्या साम्राज्यांत भुयारी वाटेनें आम्ही भटकून पुन्हा पहिल्या जागेवर आलों आणि वर चढून या रमणीय नि अद्‌भुत ठिकाणाचा निरोप घेतला.

श्री. बाजपेयी यांचेकडून या व इतर ठिकाणांसंबंधीं मीं माहिती घेतलेली होती, त्यामुळें खूनी भंडारा पाहून मी लागलीच तापी नदीकांठीं असलेला प्रसिद्ध किल्ला पाहण्यासाठीं गेलों. या वेळेस मात्र बरोबर एक चांगला माहितगार माणूस घेतलेला होता. मीं त्याला विचारलें, “ खूनी भांडारा हें नांव कशावरून

पडलें ? " त्यावर तो म्हणाला कीं, " आंत जेथें पाणी पडतें त्याच ठिकाणीं एक लाल रंगाचा संगमरवरी दगड आहे. त्यावरून पडणारें पाणी लाल रंगाचें दिसतें. त्यामुळें खून म्हणजे रक्त म्हणून खूनी भंडारा असा हिंदी शब्द बनला. " याच ठिकाणापासून चौदा मैल अंतरावर असलेल्या असीरगड किल्ल्यापर्यंत भुयारी मार्ग आहे असेंहि तो म्हणाला.

## बेगम मुमताजमहलचें प्रेत

तापीनदीकांठीं शाही किल्ल्याच्या पलीकडे पूर्वकिनाऱ्यावर आहूखाना आहे. सम्राट् अकबराच्या मुलानें तो बांधला असें म्हणतात. या ठिकाणाविषयींची एक कथा प्रसिद्ध आहे. ती अशी कीं, शहाजहान बादशहाची प्रिय राणी बेगम मुमताज-महल ही वारल्यावर तिचें प्रेत सुमारें सहा महिने या ठिकाणीं ठेवलेलें होतें. नंतर ताजमहालसारखी जगविख्यात इमारत बांधण्यासाठीं जागा निश्चित करण्यांत आली. त्या दृष्टीनें जरूर ती सर्व तयारी झाल्यानंतर हें प्रेत आग्र्यास नेण्यांत आलें व तेथें ताजमहालांतील प्रसिद्ध कबरीखालीं पुरण्यांत आलें. अर्थातच पूर्वी मसाले वगैरे लावून अशा प्रकारें हजार हजार वर्षेपर्यंतदेखील प्रेतें न नासतां न कुजतां ठेवतां येत होतीं. ईजिप्तच्या पिरॅमिडमध्यें अशींच शेंकडों वर्षांपूर्वींचीं प्राचीन राजांचीं अनेक प्रेतें सांपडल्याचें आपण नेहमीं वाचतों तीं प्रेतेंसुद्धां हजारों वर्षांपूर्वींचीं आहेत. आहूखानापासून पुष्कळ दूर 'करारा महल गुलआरा' म्हणून एक प्रेक्षणीय धबधबा आहे. जेथून पाणी खालीं पडतें तेथें सुमारें शंभर वार लांबीची भिंत बांधून या नैसर्गिक प्रवाहाला धबधब्याचें स्वरूप देण्यांत आलें आहे. अर्थातच हें काम पूर्वींच्या राजेलोकांनींच करून ठेवलेलें आहे. तेथून आहूखान या ठिकाणापर्यंत पाटानें पाणी आणलेलें आहे असें म्हणतात.

## शाही किल्ला

या किल्ल्याचे सध्यां अवशेष मात्र शिल्लक आहेत. त्यांतील संगमरवरी जाळीचे दरवाजे, खिडक्या वगैरे सामानसुमान येथून वेळोवेळीं वाहून नेऊन दुसऱ्या इमा-रतींच्या कामांत त्याचा उपयोग केला असें सांगण्यांत येतें. यांत सध्या म्युनिसिपालि-टीनें एक सुंदर सार्वजनिक बगीचा तयार केलेला आहे. इराणी पद्धतीचें व प्राचीन कालांतील हमामखाना—स्नानगृह प्रेक्षणीय आहे. घुमटाची इमारत हें व एवढेंच

त्याचेंहि अवशेषरूप स्मारक येथें उभें आहे. सध्यां डाकबंगल्यासाठीं या इमारतीचा उपयोग केला जातो.

### जुम्मा मशीद

गगनचुंबी मिनारांनीं शोभून दिसणारी ही मोगलकालीन मशीद आहे. मशिदीच्या छताचें बांधकाम वैशिष्ट्यपूर्ण आहे. इमारतींत असलेल्या अतोनात दगडी खांबांची बांधणी अशी खुबीदार आहे कीं, जों जों वर जावें तों तों खांब छताचा आकार धारण करतात. त्यामुळें कोणत्याहि दिशेनें पाहिलें असतां छताच्या असंख्य कमानी आपल्याच बाजूनें बांधीत नेलेल्या दिसतात. हें नवलपूर्ण बांधकाम पाहिल्याशिवाय त्यांतली खरी खुबी कळणार नाहीं. मशिदीस असलेले मिनार हे तर अत्यंत प्रेक्षणीय आहेत. शहरांतून कोठूनहि त्यामुळें मशिदीच्या अस्तित्वाची कल्पना येते. भारतांतील प्रेक्षणीय मशिदींत या मशिदीची गणना केली जाते.

: ५ :

## विनोबांच्या सहवासांत

मोठ्या माणसांबद्दल सामान्य माणसांत नेहमींच एक प्रकारचें कुतूहल असतें. कारण अशा माणसाची कीर्ति दिगंतरांत पोहोंचलेली असते. त्यानें केलेलीं लहान-मोठीं कामें अनेकांना माहीत असतात. तरीसुद्धां मोठ्यांच्या छोट्या गोष्टी या सामान्य वाचकालाच नव्हे तर चांगल्या सुज्ञ वाचकासहि पथप्रदर्शकच ठरतात. मी लहान होतों; परंतु मला अजूनहि चांगलें आठवतें कीं, मुंबईला मी माझ्या मामांबरोबर गेलों होतों. तेथें वाळकेश्वर भागांत कुठें तरी गांधीजींच्या सायंकाळच्या प्रार्थनेचा कार्यक्रम होता. गांधीजींबद्दल त्या वयांतहि मी पुष्कळ ऐकून होतों. अर्थातच ते एक महान् पुरुष होते. त्यांच्याबद्दल त्या काळीं सर्वच लहानमोठे लोक मोठ्या आदरानें बोलत असत. गांधीजींना पाहावें अशी माझी तीव्र इच्छा होती व तशी संधि सुदैवानें मला

त्या वयांतच लाभली. या गोष्टीचा मला आनंद तर झाला खराच ! परंतु त्याहीपेक्षां मोठा आनंद झाला तो यामुळें, कीं मी त्यांना अत्यंत जवळून पाहूं शकलों. गांधीजींच्या सायंप्रार्थनेचा कार्यक्रम ज्यांनीं पाहिला असेल त्यांना त्या वेळच्या गर्दीची चांगली कल्पना असेल आणि त्या गर्दींत एखाद्या लहान मुलानें ५।६ फुटांवरून त्यांचें दर्शन घेणें हें किती अवघड काम होतें त्याची साक्ष अशा प्रेक्षकांस बरोबर पटेल. विनोबा आजच्या युगाचे गांधी आहेत. थोडी धृष्टता करून असेंहि म्हणतां येईल कीं, विसाव्या शतकांतील बुद्धिमत्तेचा अर्क म्हणजे विनोबाजी. आचार्य विनोबाजी यांच्याबद्दल म्हणूनच माझ्या मनांत मोठेंच कुतूहल निर्माण झालें होतें. त्यांना भेटावें अशी माझी उत्कट इच्छा; परंतु त्यांच्या पदयात्रेंत म्हणे खूप लोक असतात आणि ते नेहमींच त्यांच्या बरोबर फिरत असतात, असेंहि मी ऐकून होतों. मग या सर्व लोकांत आपली दाद कोण घेणार ? असा प्रश्न माझ्यापुढें उभा होता. परंतु नाशिकचे आमचे सर्वोदयी जिल्हाध्यक्ष श्री. कोल्हटकरसाहेब यांनीं जेव्हां मला त्यांच्या पदयात्रेचे अनुभव सांगितले, तेव्हां तर माझें कुतूहल नि उत्सुकता शिगेला पोहोंचलीं नि मीं बाबांच्या भेटीसाठीं थेट चंबळखोऱ्यांत जाण्याचें ठरविलें; परंतु हो ना करतां मला घर सोडण्यास पुष्कळच उशीर झाला नि बाबा तोंपर्यंत थेट इंदूरला जाऊन पोहोंचले. ती ऑगस्टची एक तारीख मी कधींच विसरणार नाहीं. त्याच दिवशीं आचार्य भावे यांच्या निवासस्थानीं इंदूरला मी त्यांना भेटलों. सफेद कोठीवर विनोबांचा मुक्काम होता. हृदयांत उचंबळून आलेले अनेक भाव सावरून धरीत मी त्या दिवशीं सफेद कोठीवर गेलों आणि अच्युतभाईजवळ "बाबांना भेटण्याची माझी इच्छा आहे" असें सांगितलें. मीं लिहिलेलें 'पदयात्रा' हें पुस्तकहि मीं भाईमार्फत बाबांना सप्रेम भेट दिलें. भाईनीं माझ्या पूर्वायुष्याविषयीं नि माझ्या जीवनाच्या भावी कल्पनेविषयीं पुष्कळ प्रश्न मला विचारले आणि सारांशरूपानें त्यांनीं माझा वृत्तान्त बाबांपुढें सादर केला. दुसरे दिवशीं पहाटेच्या पदयात्रेंत बाबा तुम्हांला भेट देतील असें भाईनीं मला सांगितलें. त्यामुळें माझ्या मनाची झालेली अस्वस्थता काय वर्णावी ? प्रवासांत माझा एकुलता एक खादीचा पोषाख मळून काळाकुट्ट झाला होता व पहाटेच बाबांस भेटायचें असल्यानें व मला ही गोष्ट रात्रीं कळल्यानें काय करावें तेंच सुचेना. रात्रीं प्रार्थनेनंतर सर्व कार्यकर्ते आपापल्या बिछान्यावर झोपले. दहा वाजल्यानंतर सफेद कोठीचें बाहेरचें फाटक बंद होई. आंतहि

सर्वत्र सामसूम असे. रात्रीं जागरण करणें बाबांना मंजूर नाहीं आणि पहाटे तीन वाजतांच उठावयाचें असल्यामुळें सर्व कार्यकर्ते चटकन् झोपून गेले. मी मात्र अंथरुणांत तसाच तळमळत पडून राहिलों. शेवटीं एक युक्ति सुचली. पाऊस तर सारखा चालूच होता. मीं विचार केला. रात्रींच कपडे धुऊन टाकले तर? पहाटे ते सुकले जरी नाहींत तरी निदान स्वच्छ तर होतील आणि सुकलेले कपडेहि पावसानें ओले होणारच होते. युक्ति छान होती; परंतु रात्रीं कपडे धुवायचे कसे? मी हळूच चोरपावलानें उठलों नि बाथरूममध्यें गेलों. खूप दक्षता घेऊनहि कपडे धुण्याचा आवाज शिपायाच्या कानांवर गेलाच नि त्यानें येऊन कपडे न धुण्याबद्दल मला बजावलें. त्याच्याबरोबर गोड गोड बोलून मीं घाईनें कसे तरी कपडे धुतलेच. दोन दिवसांचें जागरण आणि पहाटे उठायचें ही आंच. अंथरुणावर पडतांच गाढ झोप लागली हें काय सांगावयास हवें.

## पहाटेची पदयात्रा

तीन वाजतांच घंटीनें आवाज दिला आणि सर्व आश्रम जागा झाला. प्रातर्विधि आटोपून ठीक चार वाजतां आम्ही सर्व लोक आश्रमाबाहेर पडलों. तेव्हां झिमझिम पाऊस पडतच होता. बाबांच्या पुढें बऱ्याच अंतरावर चौधरीजी आणि इतर प्रमुख कार्यकर्ते चालले होते. मागें आम्ही चाळीस एक कार्यकर्ते चाललों होतों. मध्यें बाबा होते. त्यांच्याबरोबर फक्त त्यांचे दोन शिष्य, आपल्या दोन्ही हातांत कंदील घेऊन बाबांचा हात धरून चालले होते. पहाटेची वेळ. थंडगार हवा. मंद प्रकाश. प्रसन्न वातावरण. झाडांच्या राईतून आमची पदयात्रा चालली होती. झाडांत दडून बसलेले नानाविध पक्षी आणि रंगीबेरंगी मोर मंजुळ आवाज करून आपल्या अस्तित्वाची जाणीव देत होते. बाबांची चाल म्हणजे साध्यासुध्या म्हाताऱ्याची चाल नव्हे. तरुणांनाहि ते घाम फोडीत. एका महान् पुरुषाच्या तेजोवलयांत आणि अशा प्रसन्न समयीं प्रवास करतांना मनाला जी धन्यता वाटते ती अवर्णनीय नि सुखदायी आहे. शहरांत कार्य करणारे कार्यकर्ते आपापले अनुभव नि कार्य बाबांना सांगत होते आणि बाबा नवे नवे विचार या पवित्र वातावरणांत कार्यकर्त्यांना देत होते. नित्य नवा विचार, हें तर बाबांचें वैशिष्ट्यच आहे. मी अनेक पुढाऱ्यांबरोबर महिना-महिना राहिलों आहें. दौऱ्याच्या प्रसंगीं अशा पुढाऱ्यांचें तिसऱ्यांदा भाषण ऐकणें हें मला सक्तमजुरीच्या शिक्षेहून कमी कठीण काम वाटत नव्हतें. तीच तीच रेकॉर्ड पुन्हा ऐकल्यासारखी

वाटायचें आणि त्यांचें भाषण माझ्या तोंडपाठ होऊन जायचें. बाबांच्या सहवासांत असा अनुभव आला नाहीं. हे नवे विचारहि साधेसुधे नसत. जागतिक जटिल समस्येवर विनोबाजी असा कांहीं तोडगा सुचवीत कीं, तो ऐकून ऐकणारास विनोबांच्या बुद्धिमत्तेची चुणूक जाणवल्याशिवाय राहात नसे. अर्थात् बाबा साधेसुधे विचारहि प्रसंगीं बोलत असत. इतकेंच काय ते विनोदहि करीत असत. आम्ही एका गल्ली-तून चाललों होतों. नुकताच प्रकाश पडला होता. लोकांची वर्दळ वाढूं लागली होती. बाबा रस्त्यानें अत्यंत सूक्ष्म दृष्टीनें निरीक्षण करीत असत. एका दुकानावर एक पाटी लावली होती—आम छाप पोहे. बाबा हसून म्हणाले, "आम छाप पोहे ? ये क्या बात है भाई ?" असेच अनेक प्रासंगिक विनोद ते करीत. बाबा अगदीं रागावलेच तर म्हणत, "बावळट माणसा". या एकाच शब्दानें ते आपला राग आवरून घेत. कुणी कार्यकर्ते म्हणत, "लोकांच्या विचाराचा आमच्या विचारांवर वाईट परिणाम होतो." अशा वेळीं बाबा म्हणत, "बावळट माणसा, लोकांचा जर तुझ्या विचारावर परिणाम होतो तर तुझा नाहीं का त्यांच्यावर होणार ?" बाबांची एकेक युक्ति औरच असते. हिमालय आपल्या उत्तरेला आहे. आपण त्याच्या उत्तरेला गेलों तर ? तो आपल्या दक्षिणेला होतो. तेव्हां हिमालय आपल्या उत्तरेला आहे हा कांहीं सिद्धान्त नाहीं. क्रांतीच्या सिद्धान्ताचेंहि असेंच. परिस्थितीनुसार सिद्धान्त बदलत असतात. कांहीं लोकांच्या हें लक्षांतच येत नाहीं. आज वर्गसंघर्षाची व लढ्याची भाषा करणें हें शुद्ध बालिशपणाचें आहे. विज्ञानानें एवढी प्रगति केली आहे कीं, वर्गसंघर्ष—वर्गलढा—म्हणजे सर्वनाश. मग कुठली क्रांति होणार ? आणि कुणासाठीं ? तेव्हां मी म्हणतों ज्या मानवी शक्तीनें ॲटम बॉम्बसारखीं महान् अस्त्रें तयार केलीं, ती शक्ति जर अहिंसक मार्गाकडे वळली तर केवढी मोठी क्रांति होऊं शकेल? लोक मला म्हणतात, 'हें स्पुटनिकचें युग आहे. इथें तुमच्या चरख्याचा काय उपयोग ? तुम्ही आतां विज्ञानाला रोखूं शकत नाहीं.' या लोकांची मोठीच गल्लत झालेली असते. त्यांनीं विज्ञान म्हणजे शस्त्रास्त्रें व शस्त्रास्त्रें म्हणजे विज्ञान असें समीकरण केलेलें असतें. विज्ञानाची माझ्याएवढी आवड असलेला दुसरा कोणी माणूस माझ्या पाहण्यांत नाहीं. विज्ञानामध्यें शस्त्रास्त्राखेरीज हजारों बाबी येऊं शकतात आणि त्याच आपल्याला हव्या आहेत. चंद्रावर जाणाऱ्या माणसाला अजून शरीर-शास्त्राचें पूर्ण ज्ञान झालें नाहीं. म्हणून मी म्हणतों, " मला हें विज्ञान पाहिजे आहे.

माणसें मारण्याचें नव्हे. तें विज्ञानच नाहीं. तें कुज्ञान आहे." परंतु माझा असा विश्वास आहे कीं, ज्या अर्थीं माणसानें आजपर्यंत असाध्य तें साध्य केलेलें आहे त्या अर्थीं शांतता नि प्रेम यांसारख्या नैसर्गिक गोष्टी तो सहज प्रस्थापित करूं शकेल."

असे किती तरी विचार बाबा बोलत. खरें म्हणजे या विषयावर खूप लिहिण्यासारखें आहे. प्रवासवर्णनासारख्या पुस्तकांत तें सर्व लिहिणें कदाचित् बरोबर ठरणार नाहीं. बाबांना भेटण्यासाठीं त्या दिवशीं लांबून कुणी कार्यकर्ते आले होते. बाबा त्यांच्याबरोबर कांहीं खास विषयावर चर्चा करीत होते. त्यांचा आवाज आमच्या कानांवर पडत होता. मी कान टवकारून एकेक शब्द लक्षपूर्वक ऐकत होतों. सुमारें एक मैल आम्ही चालून गेलों असूं. तेव्हां सडक सोडून एका दलदलीच्या रस्त्याला लागलों. तेथें अनेक लोक बाबांचें स्वागत करण्यासाठीं जमले होते. आमच्या खेड्यांत एक म्हण आहे, 'गाडीबरोबर नळ्याची यात्रा !' किंवा शहरांतली याच अर्थाची म्हण 'तुळशीबरोबर धोतऱ्यावर पाणी !' तद्वत् हें बाबांबरोबर आमचेंहि स्वागत. आमच्यांतले कांहीं कार्यकर्ते तर अशा प्रसन्न समयींसुद्धां उगीचच गंभीर चेहरे करून चालत. जणू कांहीं सर्व जगाचें कसें होईल याची चिंता पडली त्यांना. जसजसा अंधार कमी होऊं लागला तसतशी बाबांना पाहण्यासाठीं लोकांची गर्दी होऊं लागली. जुन्या इंदूरमध्यें आम्हीं प्रवेश केला, तोंच अच्युतभाईंनीं मोठ्यानें हांक मारून मला पुढें बोलावून घेतलें. अच्युतभाई म्हणजे एक आगळाच नमुना. चंपी केलेल्या डोक्यावर त्यांची ती शेंडी, पाऊण बाह्यांचा व बिनकॉलरचा सदरा. त्याला नेहरू सदरा म्हणावें कीं काय म्हणावें हेंच समजत नसे. खरें म्हणजे त्याला अच्युत–सदराच नांव शोभतें. अच्युतभाई महाराष्ट्रीय आहे. एवढा गोड आणि प्रेमळ स्वभावाचा माणूस माझ्या पाहण्यांत नाहीं. अच्युतभाईंनीं जेव्हां मला हांक मारली तेव्हां मी पुढें गेलों आणि बाबांना दुरूनच नमस्कार केला. विनोबाजी हिंदींतून म्हणाले, "या तुम्हीहि माझ्यासारखेच पदयात्रीक आहांत ना ? तर मग आपण हातांत हात घालून चालूं." असें म्हणून त्यांनीं माझा हात आपल्या हातांत धरलासुद्धां. एका महापुरुषाच्या हातांत हात घालून चालतांना सामान्य माणसाला किती आनंद होऊं शकतो याचा अनुभव प्रथम मला त्याच दिवशीं आला. खरें बोलायचें झालें तर

हा अनुभव कांहींसा अवर्णनीय आहे. मला तर असें वाटलें कीं, मीसुद्धां आज महान् पुरुष झालों. त्या दिवशीं एकहि क्षुद्र विचार माझ्या डोक्यांत आला नाहीं. पुराणांतील एक कथा आहे. रामाच्या पदस्पर्शानें शिला होऊन पडलेल्या अहल्येचा उद्धार होऊन तिला पुन्हा पूर्वीचें आपलें स्वरूप प्राप्त झालें. विनोबांच्या स्पर्शानें मला असेंच झालें आणि वाटलें कीं, नरानें कार्य केलें तर तो नारायणहि होऊं शकतो. पशु आणि परमेश्वर यांच्या सीमारेषेच्या मधोमध जो उभा आहे त्याचें नांव माणूस. तो थोडा या सीमारेषेहून इकडे तिकडे झाला कीं त्याचें मनुष्यत्व संपतें. एक तर तो परमेश्वर होतो नाहीं तर पशु. त्यांपैकीं जे दुसऱ्या स्थितींत असतात अशांचा उद्धार महापुरुषाच्या स्पर्शानें–सहवासानें–होतो. "तुम्हीसुद्धां माझेसारखे पदयात्रिक आहांत. मग आपण हातांत हात घालून चालूं!" असें जेव्हां विनोबाजी म्हणाले तेव्हां मीं म्हटलें, "मी पदयात्रिक आहें; परंतु आपल्यासारखा मोठा नाहीं!" त्यावर विनोबाजी कांहींच बोलले नाहींत. थोडा वेळ आम्ही शांतपणें चाललों. नंतर विनोबा म्हणाले, "काय चाललंय आतां? पुढें कुठें जाण्याचा विचार आहे?" मी म्हणालों, "गांवीं शेती आहे. तिची देखभाल करतों. शेतींत थोडेंफार काम करतों आणि इतर वेळीं प्रवास व लेखन आणि वाचन करण्यांत वेळ घालवतों. एथून पुढें कुठें जायचें याचा कांहीं खास कार्यक्रम ठरलेला नाहीं. आपल्या भेटीसाठींच आलों होतों. यापूर्वीं मी सुमारें दहाबारा वर्षें निष्ठापूर्वक कम्युनिस्ट पार्टीचें काम केलें आहे. परंतु अनेक कारणांवरून त्यांचें व माझें न जमल्यानें आपोआप त्यांचेपासून दूर झालों. मीं अजूनहि मार्क्सला श्रेष्ठ संत मानतों. त्याच्या चांगुलपणाविषयीं स्वप्नांतहि शंका कोणीं घेऊं नये, अशा मताचा मी आहें. मात्र माणुसकीच्या हक्कांसाठीं मार्क्सचीं आदर्श तत्त्वें डोळ्यांपुढें ठेवणारी त्याची ही शिष्यमंडळी स्वतः मात्र माणुसकीहीन हृदयशून्य बनली आहेत." याबाबत आणखी कांहीं गोष्टी विनोबाजींना सांगितल्यानंतर मी म्हणालों, "आपल्या भूदानगंगा पुस्तकाचें जवळजवळ सर्व मराठींतील भाग मीं वाचून काढले आहेत. इतरहि आपलीं पुस्तकें वाचलीं आहेत. आमचे जिल्हाध्यक्ष श्री. कोल्हटकर यांचेकडून चर्चा आणि मार्गदर्शन वगैरेची मदत होत असते. मी आतां हेंच काम करणार आहें. आपला आशीर्वाद मागण्यासाठीं आलों आहें." त्यावर आचार्य विनोबा भावे थोडा वेळ पुन्हा शांत झाले, व पुष्कळ वेळानें म्हणाले, चांगलें आहे. काम करीत जा. विचारानेंच क्रांति होते. मार्क्सच्या हातांत कुठलीच शासनसंस्था

नव्हती. परंतु तो विचार आज जगभर पसरला आहे." पुष्कळ वेळ मी विनोबांबरोबर चाललों होतों. पुढें कुणीतरी बाबांच्या परिचयाच्या इसमाचें घर आलें. आम्ही सर्वजण त्या घरांत गेलों. उभ्यानेंच कुशल वर्तमान विचारलें, आणि पुन्हा बाहेर पडलों

येथील मराठा समजातर्फे आचार्य बाबांच्या स्वागताचा एक कार्यक्रम आंखण्यांत आला होता. त्या कार्यक्रमासाठीं आम्ही सभास्थानीं गेलों.

## ज्ञानेश्वराची भाषा

सत्कारप्रसंगीं बाबा मराठींतच बोलले. स्थानिक लोकांनीं मराठी भाषेच्या विकासाच्या दृष्टीनें इंदूरसारख्या हिंदी बहुभाषिकांच्या शहरांत खूप अडचणी येतात, अशी तक्रार विनोबांपुढें मांडली होती.तिला उत्तर देतांना ते म्हणाले, " यासाठीं आपण श्रम केले पाहिजेत. घरीं मुलांना शिकविलें पाहिजे. तीं दोन्ही भाषा शिकतील. शाळेंत हिंदी. घरीं मराठी. ज्या भाषेंत ज्ञानदेव बोलला, ती भाषा कुठेंहि आणि कधींहि दबणारी भाषा नाहीं.

" परमेश्वरानें आपल्याला वाणी दिली आहे, भाषा नाहीं. स्वामी दयानंदतीर्थ हे परकीय अनेक भाषांचे पंडित होते; परंतु ते परदेशांत जास्त दिवस राहिल्यानें स्वतःची मातृभाषाच विसरून गेले. त्यांना मातृभाषेंतून बोलणेंहि कठीण झालें. पुढें त्यांनीं याहि भाषेचा खूप अभ्यास करून या भाषेंतच मोठमोठे ग्रंथ लिहिले, ती गोष्ट वेगळी. परंतु भौतिक परिस्थितीचा असा परिणाम होऊं शकतो. तुकाराम नाशिक, पंढरपूर नि त्र्यंबकेश्वर सोडून कुठेंच गेला नाहीं; पण त्यानें समस्त विश्वाचे विचार आत्मसात् केले."

द्वैत आणि अद्वैत तत्त्वज्ञान ही काय चीज आहे, हें मला एक मोठेंच कोडें वाटत होतें; परंतु विनोबांनीं दोनचार वाक्यांतच त्याची फोड करून सांगितली. इतरहि पुष्कळ विचार त्यांनीं तिथें मांडले. खरोखर या माणसाच्या बुद्धिमत्तेचा अंतच लागत नाहीं. चालतां बोलतां घडणारी घटना, परंतु विनोबाजी त्या गोष्टीवर अत्यंत सखोलपणें व अभ्यासपूर्वक बोलत. एवढा महान् माणूस आणि त्याचे एवढे साधे, सरळ आणि सोपे विचार मान्य करण्यास जगानें एवढा उशीर कां करावा ? असा प्रश्न मला पडला; परंतु तो कांहीं मीं बाबांना विचारूं शकलों नाहीं.

## सर्वोदयनगर

· भूदानांतून विकास पावलेली कल्पना ग्रामदानापर्यंत गेली आणि त्यांतूनच सर्वोदयनगराच्या कल्पनेचा विकास झाला. उत्तर भारतांतील मंगरौठ, बिहारकडील अशींच कांहीं खेडीं हीं खरोखरीच आदर्श खेडीं बनलीं आहेत. तसेंच जर हें मंगरौठसारखें किंबहुना त्याची मोठी आवृत्ति म्हणून इंदूर जर सर्वोदयनगर झालें तर त्याचा सर्व देशावर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं. रोज सकाळीं विनोबा येथील एकेका वॉर्डांतून सभा घेतात. कार्यकर्ते येथें रात्रंदिवस खपतात. रोज सायंकाळीं सफेत कोठीपुढें सायंप्रार्थनेचा कार्यक्रम होतो. हजारों लोक त्यांत उत्साहानें भाग घेतात. असें सारखें काम चालूच आहे.

## सफेद कोठीवरील दिनक्रम

पहाटे तीन वाजतां उठलेली मंडळी चार वाजतां आश्रमाबाहेर पडून ठीक आठ वाजतां पदयात्रा पूर्ण करून सफेत कोठीवर परत येई. या चार तासांत पदयात्रा, एकदोन सभा, ग्रामसफाई वगैरे कार्यक्रम होत असत. नंतर नास्ता करून झाला कीं, लागलीच बाबांच्या खोलींत सर्व कार्यकर्ते एकत्रित जमत. बाबा तर दिवसभर नास्ताच करीत असत. म्हणजे ते खूप खातात असें नव्हे. ते मुळीं कधीं जेवणच करीत नाहींत. दोन तीन तासांनीं थोडें दहीं व मध एकत्रित करून ते रस्त्यानें कुठेंहि थोडा वेळ मिळाला कीं खाऊन टाकीत. पहाटे आम्ही ज्या सत्काराच्या कार्यक्रमास गेलों होतों तो कार्यक्रम संपतांच सभेंतच विनोबाजींनीं त्यांचा खास नास्ता केला नि लागलीच गटारी साफ करण्याच्या कामीं लागले. त्यामुळें सर्व कार्यकर्त्यांचा नास्ता आटोपतांच मीटिंगला सुरुवात होई. कार्यकर्ते आपापल्या कामाचा 'रिपोर्ट' देऊन आलेले अनुभव सांगत. नंतर सर्व कार्यकर्त्यांच्या अडीअडचणींचा विचार करून विनोबाजी त्यावर शेवटीं थोडेंफार बोलत. कामाचा अहवाल सादर करणाऱ्या कार्यकर्त्यांपैकीं कुणाचे अनुभव विशेष महत्त्वाचे वाटल्यास ते लिहून घेण्यास विनोबाजी सांगत. असा हा कार्यक्रम तास दीड तास चालत असे.

नंतर थोडा वेळ लोकांना स्वाक्षऱ्या देण्यांत जात असे. विनोबांचें साहित्य विकणारे कार्यकर्ते बाहेर बसलेले असतात. त्यांच्या भेटीस येणारे लोक त्यांतून कांहीं पुस्तकें विकत घेतात. गीताप्रवचनें हें विनोबांचें त्यांच्या दृष्टीनें सर्वांत

महत्त्वाचें पुस्तक. तें विकत घेणाऱ्या इसमास त्या पुस्तकावर एक संदेश लिहून देऊन त्यावर विनोबाजी स्वाक्षरी करतात. पूर्वीं विनोबा अशी स्वाक्षरी कधींच देत नसत; परंतु लोक स्वाक्षरी मागण्यासाठीं नेहमीं त्यांच्याकडे गर्दी करीत असत. विनोबांनीं ती दिली नाहीं तर ते म्हणत, " गांधीजी पैसे घेऊन स्वाक्षरी देत असत. तुम्ही हवे तेवढे पैसे घ्या आणि स्वाक्षरी द्या !" त्यावर " विनोबाजी म्हणत " गांधीजी गुजाराथी–व्यापारी–होते. मी ब्राह्मण आहें." परंतु शेवटीं लोकांपुढें त्यांना हार खावीच लागली. तेव्हां त्यांनीं एक तोडगा काढला. जो कोणी गीताप्रवचनें हें पुस्तक घेईल त्याच्याच पुस्तकावर स्वाक्षरी करायची. अर्थात् या निमित्तानें तरी हा विचार लोकांपर्यंत जाऊन पोहोंचावा एवढाच उद्देश. या पुस्तकाच्या कांहीं लाख प्रति खपल्या आहेत. अर्थातच मीं हें पुस्तक पूर्वींच वाचलेलें असूनसुद्धां विनोबांच्या स्वाक्षरीसाठीं तें पुन्हा विकत घेतलें व विनोबांचा संदेश व स्वाक्षरी मिळविली. हा कार्यक्रम झाल्यावर एक बस दारांत येऊन थांबत असे. घंटी वाजतांच जेवणाची वेळ झाली असें समजून सर्व कार्यकर्ते चटकन् बसमध्यें येऊन बसत. कांहीं कार्यकर्ते स्वाक्षरीच्या कार्यक्रमास हजर न राहतां मीटिंग आटोपतांच सरळ भोजनगृहाकडे जात असत.

सफेत कोठीपासून मैल-दीड मैल अंतरावर एका प्रशस्त धर्मशाळेंत भोजनाची उत्तम व्यवस्था केलेली असते. कार्यकर्ते ताबडतोब भोजनास बसतात. वाढण्याचें कामहि कांहीं कार्यकर्तेच करीत असतात. अर्थातच स्त्री-कार्यकर्त्या या कामांत उत्साहानें भाग घेतात हें सांगावयास नकोच.

भोजनोत्तर विश्रांतीचा कार्यक्रम असतो. या वेळेंत कांहीं कार्यकर्ते अभ्यासहि करीत असतात. नंतर चार ते सहा सायंप्रार्थना व सभा होऊन पुन्हा भोजनाचा कार्यक्रम आटोपल्यावर थोड्याच वेळांत रात्रीची प्रार्थना म्हणून नऊ-साडेनऊ वाजतांच सर्व आश्रम शांत होतो. अशा प्रकारें सफेद कोठीवरील हा ' आश्रमी ' थाटाचा जीवनक्रम मला फार आवडला. तीन दिवस या गोड वातावरणांत राहून विनोबांचा नि कार्यकर्त्यांचा निरोप घेऊन मी इंदूरचीं प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं बाहेर पडलों.

: ६ :

# इंदूरचीं प्रेक्षणीय स्थळें

## काचेचें मंदिर

येथील प्रेक्षणीय स्थळांपैकीं हें मंदिर प्रसिद्ध आहे. हें भगवान् आदिनाथाचें मंदिर आहे, म्हणजेच जैन धर्मीयांचें मंदिर आहे. संगमरवरी पांढऱ्याशुभ्र दगडानें बांधलेल्या एका भव्य इमारतीमध्यें हें मंदिर आहे. मंदिर पाहण्यासाठीं दूरदूरचे लोक येत असतात. सकाळीं नऊ वाजतांच तें प्रेक्षकांसाठीं खुलें होतें तें रात्रीं नऊपर्यंत उघडें असतें; परंतु जैनांखेरीज इतर धर्मीयांस सायंकाळीं सहानंतर मंदिरांत थांबूं देत नाहींत आणि खरी मौज तर रात्रीच्या विजेच्या प्रकाशांत अप्रतिम असें शोभायमान दिसणारें हें मंदिर पाहण्यांतच असते. माझें अज्ञानहि या वेळेस माझ्या पथ्यावर पडलें, त्यामुळेंच मला रात्रीं हें मंदिर पाहतां आलें. खरें म्हणजे दिवसाहि तें कांहीं कमी सुंदर दिसत नाहीं. उलट मी तर असें म्हणेन कीं, एकदाच पाहून याचें खरें सौंदर्य कळत नाहीं म्हणजे दिवसा व रात्रीं तें पाहतां आलें पाहिजे, तरच खरी मौज बघावयास मिळाली असें समजावें. जमिनीपासून तों भिंती आणि याच्या भव्य छतापर्यंत सर्वच कांहीं रंगीबेरंगी सुरेख काचांनीं मढवून काढलेलें आहे, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे मंदिरामध्यें तीळभर जागेवरहि काचेखेरीज दुसरा कुठलाच पदार्थ दिसणार नाहीं. एवढें असूनसुद्धां हें काम तकलादी स्वरूपाचें दिसत नाहीं. उदाहरणार्थ,काचेनें मढविलेले खांब. ते भक्कम भरीव काचेच्या खांबासारखेच दिसतात.

हीच गोष्ट भिंतींची आणि छतांची. जैन लोकांचीं अनेक मंदिरें मीं पाहिलीं आहेत. हिंदूंचीं आणि बौद्धांचींहि पाहिलीं आहेत. या तीन्ही धर्मांचे लोक मंदिरें बांधण्याच्या कामांत आघाडीवर आहेत; परंतु नंबरच लावायचें ठरलें तर जैन लोकांचा पहिला नंबर लागेल, दुसरा बुद्धांचा आणि तिसरा हिंदूंचा. जैन लोकांनीं मंदिरांच्या बांधकामांत अमाप पैसा खर्च केला आहे. त्याचप्रमाणें त्यांत असामान्य रसिकता दाखविलेली आहे. या गोष्टींची बरोबरी इतर क्वचितच करूं शकतील.

जैन मंदिरांचें दुसरें एक वैशिष्ट्य असें सांगतां येईल. या मंदिरांमधून अतोनात-

संपत्ति अजूनहि पाहावयास मिळते. हिरे, माणकें नि सोनें यांची विपुलता अजूनहि या मंदिरांत दिसून येते. मीं अशीं कितो तरी मंदिरें पाहिलीं आहेत कीं, जेथें खूप संपत्ति आढळली. ती पाहून भारत हा गरीब देश आहे हें म्हणण्यास मन धजत नाहीं. अर्थशास्त्र या विषयाचा माझा कांहीं फारसा अभ्यास नाहीं. जो थोडाफार आहे त्याला अभ्यास म्हणावें कीं नाहीं हा एक प्रश्नच आहे. त्याला आपण माहिती म्हणूं. अशी जी कांहीं थोडी फार अर्थशास्त्राची मला ओळख आहे तिचा उपयोग करून मी असें सुचवूं इच्छितों कीं, कोटमाप संपत्ति देवळांत अडकवून ठेवून काय फायदा? या प्रसंगानें सानेगुरुजींची एक गोष्ट मला आठवते. अंगावर दागिने घालणाऱ्या इसमास ते म्हणत, "भारतासारख्या गरीब देशामध्यें एकाच्या अंगावर धड अंगभर कपडेहि नाहींत आणि एकानें जरुरीपेक्षां जास्त कपडे घालून त्यावर ज्यांची कांहींहि जरूर नाहीं असे दागिने घालणें हें शुद्ध पशुतेचें लक्षण आहे. हा लक्ष्मीचा अपमान, संपत्तीचा दुरुपयोग आहे." दागिन्यांच्या बाबतींत जर ही गोष्ट खरी ठरते तर मंदिरांतील संपत्तीच्या बाबतींत ती कां खरी ठरूं नये? आणि गुरुजींना एवढेंहि अर्थशास्त्र समजत नव्हतें, असें तर कोणीच म्हणूं शकणार नाहीं. ही संपत्ति जर बाहेर काढली गेली तर सरकारला अल्पबचत योजने-सारख्या योजना आंखून वेळेचा व श्रमाचा अपव्यय करून पैसा उभा करण्याची काय गरज भासणार? आणि अर्धपोटीं लोकांनीं पोटाला चिमटा घेऊन भावी उत्कर्षा-साठीं आणखी उपासमार कां सोसावी? दुष्काळांत हा तेरावा महिनाच नाहीं का? आतां हा धार्मिक श्रद्धेचा प्रश्न आहे, ती गोष्ट अलाहिदा; परंतु धर्मासाठीं मनुष्य-प्राण्याचा जन्म नाहीं तर मानवजातीच्या सौख्यासाठीं धर्म आहे, असेंच कुणाहि सरळ मनाच्या माणसास वाटेल. तेंच मला वाटतें. करोडों लोक दारिद्र्यांत असतांना आपण मात्र अंगावर मौल्यवान् जडजवाहिराचे दागिने घालून मिरविणें हें तरी परमेश्वरास मंजूर आहे काय? आणि याला धर्मकर्म म्हणतां येईल काय? मुळींच नाहीं. मला वाटतें इतर देशांतील लोकांनीं जर ही गम्मत पाहिली तर ते काय म्हणतील? पण जाऊं द्या हें! हा कांहीं आपल्या वर्णनाचा विषय नाहीं. मला या मंदिराच्या सौन्दर्याविषयींच बोलावयाचें होतें.

## प्रेक्षणीय माणूस

ही काय भानगड आहे? असें आपण म्हणाल! माणूससुद्धां प्रेक्षणीय असूं

शकतो, ही गोष्ट खरी म्हणजे मलाहि नवीनच होती; परंतु इंदूरच्या काचमहाल या मंदिरांतील काचेसारखीच नाजूक नि सुंदर अशी रूपसुंदरी मीं पाहिल्यापासून ही गोष्ट मला नवीन वाटत नाहीं. अर्थातच या स्त्रीचें वर्णन करावें कीं नाहीं असा एक प्रश्न मला पडला होता; परंतु मंदिरासारख्या पवित्र वातावरणांत या स्त्रीच्या सौंदर्याकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोणहि पवित्र असल्यामुळें हें लिहिण्यास मी धजत आहें.

एक तलम पांढरेंशुभ्र वस्त्र परिधान केलेली, गौरवर्णी तरुणी मंदिरांत दर्शनासाठीं येत होती. मंदिर पाहून व दर्शन करून मी बाहेर पडत होतों. पायमोजे व सँडल चढवून मी निघालों होतों. तीहि लावण्यसुंदरी आंत देवदर्शनासाठीं जात होती. वाचकांनीं माफ करावें परंतु इतकी सुंदर स्त्री पूर्वजन्मांत कधींच मीं कोठेंच पाहिली नव्हती. खेड्यांत नाहीं, शहरांत नाहीं, सिनेमांत नाहीं आणि स्वप्नांतहि नाहीं. कल्पनेनें मात्र पाहिली होती. चितोडची महाराणी पद्मिनी व तिच्या सौंदर्याच्या अनेक कथा मीं ऐकल्या होत्या. तेव्हां पद्मिनी कशी असेल? त्याचें एक कल्पनाचित्र मीं मनोमन रंगविलें होतें. या स्त्रीच्या रूपानें तें चित्र प्रत्यक्ष पाहिल्याचाच मला आनंद झाला. अशी ही अत्यंत सुंदर स्त्री पाहून मी पुन्हा आंत गेलों व देवाऐवजीं तिचा चेहरा निरखून पाहूं लागलों. नाक, डोळे, उंची, रंग सर्व कांहीं अवर्णनीय! कशाला वर्णनाच्या भानगडींत पडूं! कारण कसेंहि वर्णन केलें तरी मला त्या स्त्रीच्या सौंदर्याचें चित्र वाचकांपुढें उभें करतां येणार नाहीं. परमेश्वर जर सौंदर्य द्यायलाच लागला तर किती देऊं शकतो, याचें उत्तर मला त्या स्त्रीकडे पाहिल्यावर समजलें व माणूस एकच असला, येथून तेथून त्यांत साम्य असलें तरी त्यांत फरकहि केवढा मोठा असूं शकतो, याची कल्पना त्या तरुणीला पाहून मला आली. उन्हानें वितळेल, पावसानें विरघळेल, थंडीनें थिजून जाईल नि वाऱ्यानें कुस्करली जाईल असें नाजूक लावण्य. गुलाबाच्या फुलापेक्षांहि गोंडस बांधा, कधीं तांबड्या तर कधीं पांढऱ्याशुभ्र गुलाबासारखा बदलणारा रंग किंवा या दोहोंच्या मिश्रणानेंच तो तयार झाला म्हणा ना! प्रेक्षणीय स्थळाप्रमाणें माणसेंहि प्रेक्षणीय असूं शकतात हें मला प्रथमच त्या दिवशीं कळलें. मंदिराच्या भिंतींत एका आरशांत माझ्या चेहऱ्याचें प्रतिबिंब पडलें होतें. त्याकडे सहज माझें लक्ष गेलें. शेजारींच त्या तरुणीचें प्रतिबिंब पडलें होतें. सहज मीं तुलना करून पाहिली. त्या रूपसुंदरीच्या

माननें एकशतांशहि सौंदर्य माझ्या वांट्यास आलें नव्हतें. परमेश्वराची लीला खरोखरच अगाध आहे. पाहिजे तर कुणी याला निसर्गाची लीला म्हणा ! पण ती लीलाच ! ती परमेश्वराची असो वा निसर्गाची !

## होळकरांचा राजवाडा

तसें पाहिलें तर इंदूर शहरच प्रेक्षणीय आहे. या शहराच्या ऐन मध्यवस्तींत असलेला हा राजवाडा व या वाड्याच्या वरच्या मजल्यावरून इंदूर शहर पाहून याची कल्पना येते. अजूनहि जुन्या होळकरजमान्यांतील राजेशाही पोषाखांतले शिपाई वाड्यांत ठिकठिकाणीं पहाऱ्याचें काम करतात. राजवाड्यांतील एक मंदिर, दरबार हॉल वगैरे ठिकाणें प्रेक्षणीय आहेत. अजूनहि मंदिरांत नित्यनियमानें पूजा-अर्चा, पठण वगैरे कार्यक्रम चालूच असतात. राजवाड्यांत एका कोपऱ्यांत सरकारी ट्रेझरी असल्यानें तेथें रात्रंदिवस पोलीसपहारा असतो. महाराष्ट्रांतून थेट मध्यप्रदेशांत येऊन आपलें राज्य प्रस्थापित करणाऱ्या होळकरांविषयीं महाराष्ट्रीय माणसास आदर वाटणें साहजिकच आहे. इंदूर शहरांत सुमारें पन्नास एक हजार महाराष्ट्रीय लोक आहेत. हिंदी भाषिक येथें बहुसंख्येनें असले तरी मराठ्यांबद्दल त्यांच्यांत आदराची भावना आहे. शहरांतील कांहीं इतरहि लहानसहान मंदिरें पाहण्यासारखीं आहेत. सफेद कोठीपुढील गांधीजींचा पुतळा प्रेक्षणीय आहे.

दुसरे दिवशीं विनोबांच्या आश्रमांतील कार्यकर्त्यांचा निरोप घेतला, व चितोडगडाकडे प्रयाण केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. [illegible]
अनुक्रम .................. वि: ................
क्रमांक ........................ नों. दि. ..............

: ७ :

## वीरभूमि चितोडगड

सुमारें बाराशें वर्षांपासूनचा चितोडगडाचा इतिहास उपलब्ध आहे. याच चितोडगडावर लावण्यसुंदरी महाराणी पद्मिनी होऊन गेली होती. राजा महाराणा प्रताप, त्याचप्रमाणें महाराणा

हम्मीर, कुम्भ, संग इत्यादि राजे याच गडावर राज्य करून गेले. तलवारीचे खणखणाट नि तोफांचे गडगडाट तर चितोडगडानें कितीदातरी पाहिले आहेत. इतकेंच काय, परंतु एकाच वेळीं, एकाच स्थळीं, तेरा तेरा हजार लावण्यवती रजपूत स्त्रियांच्या जोहाराचे रोमांचकारी असे कित्येक प्रसंग या गडानें पाहिले आहेत. किंबहुना मेवाडच्या सर्व ऐतिहासिक तेजस्वी घटनांशीं चितोड एकरूप झाला आहे. आकाशाला भिडणाऱ्या चितेच्या ज्वालांनीं तावूनमुलाखून निघालेला हा परमपवित्र नि धीरोदात्त चितोड ! शूरांची भूमि, वीरांचें स्फूर्तिस्थान, भक्तांचें तीर्थस्थान; सती पद्मिनीचें स्मारक एक ना दोन, हजारों तेजस्वी पैलू आहेत याला. एकेक पैलूंत भारताच्या स्वामिभक्तीचें, धर्मनिष्ठेचें, स्वातंत्र्यप्रेमाचें, शौर्याचें नि धैर्याचें दर्शन प्रेक्षकांस होतें. हृदय अगदीं उचंबळून येतें. चितोडच्या दर्शनानें नाना तऱ्हेचे भाव मनांत गर्दी करतात. चितोडची इंचन् इंच जागा परम पवित्र आहे. इंचन् इंच जागेवर रक्त सांडलें आहे. येथील मातीच्या कणाकणांत सतीची राख विखुरलेली आहे. अनेक भारतीय हाडेंकाडें अद्याप याच्या कुशींत दडून बसलेलीं आहेत. त्याच्यांत अजूनहि एवढी शक्ति आहे कीं, देशाच्या आणीबाणीच्या प्रसंगीं तीं सजीव होतील नि शत्रूला 'दे माय धरणी ठाय' करून सोडतील. सारे रजपूतवीर आपल्या परमप्रिय भारतदेशाच्या रक्षणार्थ धावून येतील. मेवाडचा बच्चान् बच्चा अजून गातो आहे.

> **“ रहते हुये तनु प्राण रणसे मुख न मोडेंगे कभी ।**
> **कर शक्ति है जब लौं न अपने शस्त्र छोडेंगे कभी ।**
> **दुष्कण्टकों से पूर्ण वृक्षों के शिखरपर बास हो ।**
> **खाने पड़े पत्ते परंतु न दासता का त्रास है ॥**

( रा. ती. वि. भू. ) ( चितोडगढ दिग्दर्शनवरून )

राजमाता वीरांगना देवी करुणावती, पन्नादाई, मीराबाई, ज्यांच्या शौर्य-धैर्यापुढें नि नितांत भक्तीपुढें आपलें मस्तक विनम्र होतें, अशा नारीरत्नांच्या चरित्राशीं चितोडचा अविभिन्न संबंध आहे. अशा या परमपवित्र तीर्थक्षेत्राचें दर्शन घेऊन अजूनहि मोठमोठे इंजिनिअर थक्क होतात. प्रेक्षक देहभान विसरतात.

गडावरचा जयस्तंभ अजूनहि ऐटींत उभा आहे. ज्याच्या शेंड्यावर जाणाऱ्या प्रेक्षकाची मान तेथील वाहत्या नि ताज्यातऱ्हाऱ्या थंडगार वाऱ्यानें आपोआप ताठ होते नि ज्या प्रेक्षकास गेलेला हा गड परत मिळविण्यासाठीं महाराणा प्रतापसिंहानें केलेली प्रतिज्ञा माहीत आहे त्यास ती आठवते नि तो सभोंवारच्या विस्तीर्ण प्रदेशाकडे नजर फेकीत आपोआप मनोमन गुणगुणतों.

**" जो हो, जननी दुग्ध को दूषित करूँगा मैं कभी ।**
**तनु प्राण रहते शत्रुको, बढने न दूँगा मैं कभी ॥**
**' चित्तौडका उद्धार कर विध्वंस कर यवन ध्वजा ।**
**शिशौदिया कुलकेतु फहरा कर दूँ डङ्का वजा ।**
**तबतक न शैया शयन नृप प्रासाद बास करूं कभी ।**
**यह प्रण किया मैंने सुनो सरदार गण ! श्रुति दे सभी ॥**

( प्रणवीर प्रतापवरून )

खरोखर तो दिवस अविस्मरणीय आहे. तसाच तो परम भाग्यदायी आहे. ज्या दिवशीं मी गड पाहायला गेलों ती चार ऑगस्टची शुभ तारीख माझ्या कायमची स्मरणांत राहील.

पहाटे पांच वाजतां मी चितोडगड स्टेशनाबाहेर पडलों. तेव्हां बाहेर झिम्‌झिम् पाऊस चालू होता; परंतु तो मुळींच त्रासदायक वाटत नव्हता. किंबहुना त्यामुळें मला आनंदच झाला होता. मंद प्रकाशांत मी गडाच्या दिशेनें वाटचाल करीत होतों. फार नाहीं, तीन चार मैल जायचें होतें मला. हवेंत एक प्रकारचा मस्त धुंद सुगंध दरवळत होता, कीं ' चितोड 'च्या दर्शनासाठीं चाललों असल्यानें धुंद होऊन गेल्यामुळें मला तसा भास होत होता, हें सांगणें कठीण आहे; परंतु असें मला वाटत होतें खास. सारेंच कांहीं वातावरण प्रसन्न होतें. चितोड जसजसें जवळ येत होतें तसतशी रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडांची राई अधिक दाट होत होती. त्यांत दडून बसलेले अनेक मोर मधून मधून मधुर आवाज देत होते. म्यॉंव म्यॉंव करून मी आल्याची जणू वर्दीच ते आपल्या साथीदारांना देत होते. सामानसुमानहि मजजवळ कांहीं फारसें नव्हतें. त्यामुळें एरव्हीं जवळ ओझें घेऊन चालतांना वाटणारा त्रासहि या वेळेस मला वाटत नव्हता. आणि सामान तरी होतें काय ? एक सुटकेस नि एक

गळ्यांत अडकविण्याची थैली. पैकीं सुटकेस मीं स्टेशनवरच 'क्लोकरूम' मध्यें ठेविली होती. बदलण्यासाठीं धुतलेला एक पोषाख नि कांहीं माझीं पुस्तकें व कागदपत्र असलेली थैली मात्र माझ्या गळ्यांतच अडकविलेली होती. एका मोठ्या पुलावरून थोडें पुढें जातांच समोर चितोड गांव व त्याच्या पूर्वेस चितोड गड दिसूं लागला. इथपर्यंत येईतों प्रकाशहि भरपूर पडला होता. लालभडक अगर पिवळ्या रंगाचीं वस्त्रें परिधान केलेल्या अनेक रजपूत स्त्रिया नदीवर स्नान करून घोळक्याघोळक्यानें गाणीं गात गांवाच्या दिशेनें चालल्या होत्या. त्या गाणें गात होत्या, कीं प्रातःसमयीं देवाची प्रार्थना करीत होत्या हें मात्र मला प्रथम कळलें नाहीं. कारण त्यांची भाषा मला समजेल तर ना? आणि केवळ त्यांच्या गाण्याच्या चालीवरून त्या प्रार्थना करीत होत्या कीं गाणें गात होत्या हें ओळखणें कठीण होतें. कारण त्यांची प्रार्थना म्हणण्याची चालहि निराळीच होती. पुढें जेव्हां मी त्यांच्या पाठोपाठ गांवांत गेलों व त्या घरीं न जातां मंदिरांत जातांना मीं पाहिल्या, तेव्हां तें गाणें नसून प्रार्थनाच होती हें मला कळलें. एका मोठ्या तटबंदी असलेल्या वेशींतून आंत प्रवेश करतांच राजस्थानी बांधणीच्या वैशिष्ट्यपूर्ण अशा एका गल्लीसमोर आपण जाऊन पोंचतों. पांढऱ्या शुभ्र अगर पिवळ्याधमक रंगाच्या उंच उंच—फार उंचहि नाहीं—परंतु दुमजली अशा घरांच्या दोन रांगा रस्त्याच्या दुतर्फा दिसूं लागतात. गल्लींतून वैशिष्ट्यपूर्ण असा राजस्थानी पोषाख केलेल्या अनेक स्त्रियांचे घोळके इकडून तिकडे मिरवत होते. मोठा थोरला रंगीबेरंगी घागरा, त्यावर भडक रंगाची कांचोळी नि एक रंगीत तलम ओढणी, अशा थाटांत तोंडावरून बुरखा घेतलेल्या राजस्थानी स्त्रिया पाहून कुतूहल वाटतें. ज्या पद्मिनीच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून दिल्लीचा बादशहा अल्लाउद्दीन खिलजी यानें मोठ्या सैन्यबलानिशीं चितोडवर तिच्यासाठीं हल्ला केला, त्याच पद्मिनीच्या मेवाड प्रांतांतल्या ह्या रजपूत स्त्रिया कशा सुंदर आहेत हें पाहण्यासाठीं मी उत्सुक झालों होतों. परंतु त्यांच्या तोंडावर असलेल्या बुरख्यांमुळें मला एकाहि स्त्रीचा चेहरा पाहतां आला नाहीं, नि म्हणून प्रथम तरी माझी खूपच निराशा झाली; परंतु चितोडगड आतां पूर्णपणें दिसूं लागला होता नि त्याच्याभोंवतालीं असलेली अभेद्य नि अजस्त्र तटबंदी पाहून गडावर जाण्यासाठीं मी त्याहिपेक्षां जास्त उत्सुक झालों होतों. म्हणून केवळ रजपूत स्त्रियांच्या त्या गोड आवाजांत गाइल्या जाणाऱ्या मधुर गाण्याचा स्वाद घेत मी गांवांतून इकडे तिकडे न्याहळून पाहात हिंडत होतों.

## चलफिरशा दाता

चितोडच्या ऐन वेशीजवळ असलेलें एक प्रेक्षणीय स्थळ म्हणजे गरीब नवाज यांनीं बांधलेला दर्गा. हा दर्गा संपूर्णपणें पांढऱ्याशुभ्र संगमरवरी दगडानें बांधलेला असून त्यांत एक अतिसुंदर व प्रेक्षणीय असा छोटासा बगीचाहि आहे. या बगीच्याबाबत येथील मुसल्मान फकिरानें सांगितलें कीं, कसलाहि आजारी माणूस येथें आला व या बागेंतून त्यानें तास-दोन तास वास्तव्य केलें, तर त्याचा आजार खात्रीनें बरा होतो. अर्थातच यांतील धार्मिक श्रद्धेचा भाग सोडला, तरी बागेंतील नानाविध प्रकारच्या सुंदर नि टवटवीत वनस्पति अन् त्यांच्या फुलांचा आल्हाददायक सुगंध असा आहे कीं, त्यानेंच आजाऱ्याचें अर्धेअधिक दुखणें कमी होत असावें. निदान मला तरी हा छोटासा बगीचा फारच आवडला. येथील फुलांच्या सुगंधानें खरोखर मन अत्यंत प्रफुल्लित होतें आणि दर्गा व आसपासची पांढरीशुभ्र संगमरवरी फरशी, स्वच्छता वगैरे पाहून ज्या इसमानें हा सुंदर दर्गा हजारों नव्हे लाखों रुपये खर्चून बांधला त्याच्या धार्मिक श्रद्धेचें कौतुक केल्यावांचून राहावत नाहीं. दर्ग्याच्या संगमरवरी भव्य घुमटावर तीन प्रचंड सोन्याचे ताज व एक चांदतारा आहे. हे ताज अत्यंत तेजस्वी असून ते अस्सल शंभर नंबरी सोन्याचे आहेत, हें प्रथम दर्शनींहि प्रेक्षकाच्या लक्षांत यायला वेळ लागत नाहीं. मला त्या फकिरानें सांगितलें कीं, दीड इंच जाडीच्या ठोस सोन्याचे सुमारें सव्वा मण वजनाचे हे तीन ताज आहेत. फकिराप्रमाणेंच इतरहि अनेक लोकांनीं हेंच सांगितलें आणि ज्या इसमानें लाखों रुपये खर्चून अशी सुंदर इमारत केवळ धार्मिक भावनेनें बांधून दिली, त्यास सव्वामण सोन्याचे ताज तयार करणें कांहींच अशक्य वाटत नाहीं. मात्र आश्चर्य वाटतें तें एका गोष्टीचें. एवढे मोठे सोन्याचे ताज; परंतु उघड्या घुमटावर ठेवलेले आहेत. कुठलाच कडक बंदोबस्त किंवा पहारा त्यासाठीं नाहीं. मंदिरांतून याहिपेक्षां अनंत पटींनीं जास्त संपत्ति मीं माझ्या प्रवासांत अनेक ठिकाणीं पाहिली आहे; परंतु त्या त्या ठिकाणीं कडक पहारा आढळून आला. येथें मात्र तसें कांहींच नाहीं. मीं चौकशी केली असतां कळलें कीं, दर्ग्यांत चार-दोन तरी फकीर कायम राहतात नि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे चितोडगडावरची कालीमाता. कालीमातेचें सत्त्व फार आहे. निदान कालीमातेच्या सत्त्वाबद्दल या

भागांतील जुनीं मार्गे तरी शंका घेणार नाहींत. कालीमातेच्या हद्दीत चोरी केली असतां चोराचे डोळे जातात, कालीमातेचा त्याच्यावर कोप होतो, अशी समजूत सर्व चोरमंडळींत प्रचलित असल्यानें कुणीच या ताजच्या चोरीच्या भानगडींत पडत नाहीं. इकडे विशेषतः चितोडला चोरी कधींच होत नाहीं असें म्हणतात; परंतु मी किल्ल्याच्या पहिल्या दरवाज्यांनून आंत प्रवेश करतांच तेथें छोटासा 'सब्जेल' व कांहीं रखवालदार पोलीस पाहिले. तेव्हां हे चोर कोठून आले म्हणून चौकीदाराकडे चौकशी केली. चोरांची चौकशी करणाऱ्या अनोळखी इसमास पाहून पोलीस क्षणभर चमकले, परंतु माझी ओळख पटल्यावर लागलीच त्यांनीं सांगितलें, "हे सगळे बाहेरगांवचे चोर आहेत. किल्ल्यावर रिझर्व पोलीसलाइन आहे नि येथें पायथ्याला हा सबजेल आहे. आमच्या चितौडला चोरी सहसा होत नाहीं. कालीमातेचें हें सत्त्व आहे." कांहींहि असो; परंतु चलफिरशा दाता दर्ग्यांत घुमटावर असलेले ताज तरी अजून गेल्या पंचवीस वर्षांत कोणीं चोरानें नेले नाहींत; पुढें मागें असा एखादा साहसी चोर निर्माण न होवो, म्हणून मीं येथील ह्या फकिरास अगोदरच सावध केलें; परंतु अत्यंत बेफिकीरपणें तो फकीर म्हणाला, "अरे जा ! क्यौं मजाल है जो कोई इस ताजको चुराए। ए चलफिरशा बाबाके ताज हैं। बाबाके ताज चुराना कोई आसान बात नहीं है। और इसके बारेमें तो ऐसा सोचनाही पाप है।" फकिराच्या बोलण्यांत बेफिकिरी होती, निर्भयता होती, मोठी गाढ श्रद्धा होती. ती पाहून मी लाजलों, ओशाळलो. कोठून असा विषय मीं काढला असें मला झालें. मीं काढलेली ही शंका त्या फकिराला तर मुळींच आवडली नाहीं. तो यापेक्षां फारसें कांहीं बोलला नाहीं; परंतु तो खूपच नाराज झाल्याचे भाव त्याच्या चेहऱ्यावर स्पष्टपणें उमटलेले मला दिसत होते. त्याचें समाधान करण्याच्या उद्देशानें मीं म्हटलें, "मेरे कहनेका मतलब है, सभी आदमी तो नेक और ईमानदार नहीं होते और मैंने अखबारोंमें पढाभी है की कुछ प्राचीन हिंदुमंदिरोंपर डाका डालकर चोरोंने बहुत कुछ मूल्यवान् चिजोंको चुराया है। याने मतलब यह है कि यहनामुमकीन नहीं है।" परंतु तरीसुद्धां फकिराचें समाधान झालें नाहीं असेंच त्याच्या मुग्धतेनें मला उत्तर दिलें. म्हणून एकदाचा हा विषयच बदलावा म्हणून मीं विचारलें, "किल्ला पाहून येण्यासाठीं किती वेळ लागेल?" त्यावर मला कळलें कीं, सुमारें चार ते सहा तास हा किल्ला पाहण्यासाठीं लागतात. तशांत मी प्रत्येक गोष्ट विशेष बारकाईनें पाहात असल्यामुळें मला दुप्पट वेळ हमखास लागत असे. म्हणजे मला

निदान बारा तास हा किल्ला बघण्यासाठीं लागणार होते हें उघड होतें. म्हणून थोडें फराळाचें सामानसुमान बरोबर घेऊन मीं किल्ला चढायला सुरुवात केली. पहिल्या प्रवेशद्वाराबाहेर किल्ल्याच्या पायथ्याला असलेल्या तटाच्या अजस्र भिंतीस खोदून एक संगमरवरी दगडावर कोरलेला मोठा शिलालेख प्रेक्षकाचें लक्ष वेधून घेतो. तो पाहतांच मीं जवळ जाऊन वाचून पाहिला. हिंदी भाषेंत लिहिलेल्या त्या लेखाचा सारांश असा होता कीं, 'चितोडगड शत्रूच्या ताब्यांत गेल्यानंर तो पुन्हा हस्तगत करण्याची प्रतिज्ञा करून जे शूर वीर मेवाडबाहेर पडले व गड जिंकल्याशिवाय पुन: या भूमीवर पाय ठेवायचा नाहीं अशा ज्या पांच प्रतिज्ञा त्यांनीं केल्या होत्या त्या शूर वीरांचा—गाडीला लोहारांचा—स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मोठ्या समारंभानें स्वतंत्र भारताचे पंतप्रधान पं.नेहरू व इतरहि अनेक मंत्र्यांच्या हजेरींत पं.नेहरूंच्या हस्तें आदर सत्कार करून आपल्या मातृभूमींत—चित्रकूटांत—प्रवेश करण्यांत आला.'

ज्याच्या स्मरणार्थ हा शिलालेख लावलेला आहे, त्या गाडीला लोहारांची पुनर्वसाहत सध्यां चितोडगड स्टेशनजवळ वसवलेली असून त्यांचा प्रमुख रामराव गाडोलिया हा आहे. या लोकांचे रीतिरिवाज समजावून घेण्यासाठीं रामराव गाडोलिया यांना भेटण्याची माझी इच्छा होती; परंतु पावसामुळें व वेळेच्या अभावीं तें शक्य झालें नाहीं. शिलालेख वाचून आपण डावीकडे वळलों कीं, समोर एक प्रचंड प्रवेशद्वार दिसतें. त्याच्या कोपऱ्यांत पाडणपोळ म्हणजे पाडण-दरवाजा अशी पाटी लावलेली आहे. याबाबत असें कळलें कीं, राजपुतान्यांत पाटवी शब्दाचा अर्थ पहिला किंवा मोठा असा होतो आणि या दरवाजाचें नांव पाटणपोल असें होतें; परंतु त्याचा अपभ्रंश होऊन पाडणपोल या नांवानेंच तो सध्या ओळखला जातो. या दरवाजाबाबत एक कथा प्रसिद्ध आहे. असें सांगतात कीं, एकदा किल्ल्यावर खूप मोठा पाऊस झाला. त्यांत एक पाडा = छोटेसें गांव वाहून आला व इथें अडकला. त्यावरून पाडणपोल असें नांव पडलें. या दरवाजाशेजारींच एक लहानसें स्मारक आहे. सन १५३७ मध्यें गुजराथचा सुलतान बहादूरशहा याच्या फौजेबरोबर लढतां लढतां वाघसिंहजी रावल या ठिकाणीं मारले गेले. त्यांच्या स्मरणार्थ छोटेंसें स्मारक बांधलेलें आहे.

येथून थोडें पुढें गेलें कीं, वर वर्णिलेला एक सब्जेल लागतो व आणखी थोडें पुढें गेलें कीं, एका बाजूस प्रचंड दगडी तट व दुसऱ्या बाजूस उंच पर्वत व त्यावर दिसणारा असाच पांढऱ्या-तांबड्या दगडांचा दुसरा अभेद्य तट दिसतो. वळणें घेत घेत जो

रस्ता किल्ल्यावर जातो, तो त्याच दिशेनें आहे. तीन वळणें घेऊन रस्ता वर गेलेला असल्यामुळें एकावर एक असे तीन प्रचंड कोट इथें दिसतात. हें दृश्य खरोखरीच अत्यंत भव्य असें आहे. मोठमोठे प्रचंड दगड बांधकामांत वापरले आहेत आणि किल्ल्याच्या तटाचा परिघ लहानसा नसून चांगला बारा मैल लांबीचा आहे आणि किल्ल्याची उंचीसुद्धां कांहीं कमी नाहीं. तरीहि किल्ल्यावर जाण्यासाठीं या बाजूनें एक पक्का रस्ता केलेला असल्यामुळें थेट किल्ल्यावर मोटारीहि जाऊं शकतात. डाव्या बाजूस तटाच्या भिंतीवरून एक सुमारें पांच-सहा फूट रुंदीचा रस्ता आहे. त्यावर चढून वर पाहिलें असतां एकीकडे प्रचंड तटबंदी व दुसरीकडे खोलच खोल असा भाग दिसतो. पायथ्याला घनदाट झाडी आहे. तीसुद्धां नाना प्रकारची. चिंचेच्या आणि लिंबाच्या झाडांखेरीज एकहि झाड माझ्या परिचयाचें नव्हतें. शत्रूवर मारा करण्यासाठीं जागोजाग मोर्चे बांधलेले आहेत. येथून तोफा, बंदुकींच्या साहाय्यानें शत्रूवर मारा करतां येत असे. या भिंतीवरून जों जों पुढें जावें तों तों खालीं दिसणारा खोल भाग अधिकाधिक खोल होत जातो.

### भैरोंपोल

किल्ल्याच्या चढणींतील हें दुसरें प्रवेशद्वार आहे. इ.स. १५३७ मध्यें भैरोंदास सोलंकी मारले गेले. त्यांच्या स्मरणार्थ या दरवाजाचें नांव 'भैरोंपोल असें ठेवलें आहे. भैरोंपोलपासून थोडें पुढें जातांच दोन छत्र्या बांधलेल्या आहेत. त्या कल्लाजी आणि जयमल्ल यांच्या स्मरणार्थ आहेत. सन १५६७ मध्यें येथें झालेल्या युद्धांत हे दोन वीर कामीं आले. जयमल्लजीचे वंशज ठाकूर प्रतापसिंहजी यांनीं पूर्वी असलेल्या स्मारकाच्या दगडाच्या जागीं इ. स. १६२७ मध्यें या छत्र्या उभारल्या आहेत. या दोन्ही छत्र्यांविषयीं ऐतिहासिक माहिती असलेले छोटेसे लेख इथें लावलेले आहेत. ज्या युद्धांत हे वीर मारले गेले त्या युद्धांतील त्यांच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी येथें लोकांकडून मला ऐकायला मिळाल्या. अशाच कांहीं गोष्टी पुस्तकांतहि वाचल्या; परंतु विस्तारभयास्तव त्या येथें देत नाहीं. त्या छत्र्या पाहून आपण आणखी थोडें पुढें गेलों कीं, तिसऱ्या नंबरच्या प्रवेशद्वाराजवळ आपण जाऊन पोहोंचतों.

### हनुमानपोल

किल्ल्यावर जाण्यासाठीं इथपर्यंत सारखा चढच चढावा लागतो. नांवाप्रमाणेंच

हनुमान-प्रवेशद्वार हें अत्यंत मजबूत आहे. हा दरवाजा इतर दरवाजांपेक्षां वैशिष्ट्यपूर्ण बांधणीचा असून तो अजूनहि चांगल्या अवस्थेंत आहे. जवळच हनुमानाचें मंदिर असल्यानें त्यास हें नांव पडलें आहे.

## जोरला प्रवेशद्वार

जोरला म्हणजे जोडला जाणारा. गणेशप्रवेशद्वारास हें प्रवेशद्वार अगदीं जवळच असल्यानें जोरलपोल हें नांव पडलें. एक मोठें वळण घेऊन पुढें गेल्यावर लक्ष्मणपोल आहे. येथें लक्ष्मणाचें मंदिर आहे. सातवा आणि शेवटचा दरवाजा म्हणजे रामपोल. या दरवाजाच्या समोर एक सुंदर दगडी मंडप आहे. तेथें पूर्वी किल्ल्याचे संरक्षक बसत असत. या ठिकाणीं एक शिलालेख असून कुणी एक महान् धार्मिक साधुमहाराज येथें येऊन गेले असल्याचा त्यांत उल्लेख आहे. येथून चितोड गांवचें व भोंवतालचें विहंगम दृश्य अत्यंत मनोहर दिसतें. पांढऱ्याशुभ्र इमारतींचें व स्वस्तिकाच्या आकाराचें चितोड त्याच्यापुढें वेडच अथवा गंभीरी नदी, तिच्यावरील पूल, राई, हिरवीगार शेतें, चितोडगड स्टेशन व क्षितिजापर्यंत दूरवर पसरलेला हिरवागार प्रदेश असा अत्यंत आकर्षक देखावा दिसतो. सकाळची वेळ असल्यानें किल्ल्यावरील दाट झाडींतून अनेक सुंदर मोर इकडून तिकडे उड्या मारीत होते. त्यांच्या "म्यॉंव म्यॉंव" आवाजानें किल्ल्यावरील वातावरण गजबजून गेलें होतें. मधून मधून वानरांची "चिरचिरहि" एकूं येत होती.

## लता मंगेशकरचें गाणें

मीं रामपोल दरवाजांतून थोडा आंत गेलों. तेथें एक लहान हॉटेल आहे. हॉटेलवाला येणाऱ्या प्रत्येक प्रवाश्यास दूध अगर चहा पिऊन जाण्याचा मोठा आग्रह करीत असतो. " आवो बाबूजी, जरा दूध पियो. तबीयत बिलकुल मस्त हो जायेगी आपकी!" असें मोठमोठ्यानें ओरडून तो प्रत्येक प्रवाश्यास सांगत असतो. अर्थातच एवढी चढण चढून आलेला प्रवासी थकून-भागून आलेला असतो. चहा अगर दूध घेण्याचा मोह त्यालाहि होतो. मीं थोडें दूध घेतलें नि उजव्या हातानें जो रस्ता किल्ल्याकडे जातो त्या रस्त्यानें वाटचाल सुरू केली. तोंच लांबवर मला परिचित असा मंजुळ गाण्याचा आवाज ऐकूं येऊं लागला. थोडें पुढें जातांच मीं ओळखलें कीं, हा प्रसिद्ध गायिका लताचा आवाज आणि क्षणभर मी विचारांत पडलों. चितोडच्या

या किल्ल्यावर ह्या लताबाई कुणीकडून आल्या? असा एक प्रश्न क्षणभर मला पडला; पण लागलीच लक्षांत आलें कीं, रेडियोवर त्या गात आहेत, किल्ल्यावर नव्हे. तरीहि मला मौजच वाटली. किल्ल्याच्या एका बाजूस एक टुमदार स्वच्छ इमारत दिसली आणि तिच्यावर बिर्ला धर्मशाळा असें नांव वाचतांच मी तेथेंच थांबलों. आंत जाऊन चौकशी केली, तेव्हां कळलें कीं, विनाशुल्क येथें तीन दिवस राहण्याची सर्व प्रकारची व्यवस्था केली जाते. येथील स्वच्छता आणि शांतता पाहून मीं ताबडतोब नांव नोंदवून एक खोली ताब्यांत घेतली व टाळा मारून बाहेर पडलों. सुप्रसिद्ध उद्योगपति बिर्लाशेठजी यांनीं आपल्या पत्नीच्या स्मरणार्थ ही धर्मशाळा बांधलेली आहे स्वयंपाकपाण्यासाठीं भांडींकुंडीं वगैरे सर्व साहित्य मोफत दिलें जातें. राहण्यासाठीं जरूर ती सर्व व्यवस्था उत्तम आहे. अर्थातच मला किल्ल्यावर एक मुक्काम करावाच लागणार होता व ही सोय त्या दृष्टीनें फारच चांगली झाली होती. पाऊसहि आतां उघडला होता, त्यामुळें मी आगदीं निर्धास्तपणें किल्ल्यावरील प्रेक्षणीय स्थळें पाहण्यासाठीं निघालों व एक एक प्रसिद्ध स्थळ पाहूं लागलों. किल्ल्यावरील सर्वच प्रेक्षणीय स्थळांचें वर्णन करूं म्हटलें तर त्याचें एक स्वतंत्र पुस्तकच तयार होईल. विपुल अशीं प्रेक्षणीय स्थळें आहेत; परंतु त्यांतील अत्यंत निवडक व सुप्रसिद्ध स्थळांचीच माहिती आपण आतां पाहूं. ही माहिती नुसतीच मनोरंजक नाहीं तर उद्बोधकहि आहे.

## महाराणा कुम्भ यांचा राजवाडा

किल्ल्यावर दिसणारीं प्राचीन अशीं अनेक छोटींमोठीं ठिकाणें पाहात प्रेक्षक शृंगारचौरी जवळ येतो. हें छोटेंसें मंदिर व त्यावरील सुरेख नक्षीकाम पाहून थोडा पुढें जातो तोंच त्याला प्राचीन राजस्थानी बांधकाम केलेली एक इमारत दिसते. ही अगदींच मोडकळीस आलेली इमारत अजूनहि अत्यंत भव्य आहे यांत शंकाच नाहीं. हाच राणा कुम्भाचा महाल. राणा कुम्भानें या प्राचीन राजवाड्याचा जीर्णोद्धार करून त्यांत तो सुमारें पन्नास वर्षे राहिला होता, म्हणून यास राणा कुम्भाचा राजवाडा असें म्हणतात. या राजवाड्यांतील भुयारी रस्ता पाहण्यासारखा आहे. येथून पुष्कळच दूर अंतरावर गऊमुख कुंड हें रमणीय स्थान आहे. तेथपर्यंत हा भुयारी मार्ग गेलेला आहे. महाराणी या मार्गानें कुंडावर जाऊन, स्नान करून व देवदर्शन घेऊन परत राजवाड्यांत येत असे. ह्या रस्त्याचें बांधकाम प्रेक्षणीय आहे.

## जोहार मैदान

रजपुतांच्या इतिहासांत जोहार या शब्दास फार मोठा अर्थ आहे. जोहाराची चाल चांगली होती कीं कशी हें आपण आतां ठरवूं शकतों; परंतु त्या वेळेची परिस्थिति लक्षांत घेतां ही चाल किती मोठ्या प्रमाणांत राजपुतान्यांत होती हें चांगलें लक्षांत येईल. चितोडगड यां एकट्या किल्ल्यावर शेंकडों स्त्रियांनीं या चालीपायीं आपल्या जीवनाची आहुति दिलेली आहे. इतकेंच काय एकेका वेळेस तेराशें-तेराशें स्त्रियांनीं एकदम बरोबरच जोहाराच्या प्रचंड चितेंत हसतमुखानें उड्या घेतलेल्या आहेत. अजूनहि अंगावर शहारे येतात तें सर्व ऐकून ! येथें एक भैरवाचें मंदिर आहे. त्या भैरवाची सुमारें पुरुषभर उंचीची मूर्ति पाहिली कीं, शिल्पशास्त्राचा एक नवा पैलू पाहिल्याचें समाधान प्रेक्षकास होतें. मात्र ही मूर्ति पाहात असतां भीतीनें अंगावर शहारे आल्यावांचून राहात नाहींत. सुमारें सात फूट उंचीचा हा भैरवाचा नुसताच मुखवटा आहे. त्याचे ते चांगले फूटभर लांबीचे पांढरेशुभ्र डोळे आणि काळाकभिन्न रंग पाहिला कीं, प्रेक्षक क्षणभर स्तिमित होतो आणि चेहरा तर इतका उग्र दिसतो कीं, एकट्या प्रेक्षकास मंदिरांत थांबवतच नाहीं. पाषाणाचीहि माणसाला भीति वाटावी इतकें कलापूर्ण काम कलावंतांनीं केलेलें आहे, आणि म्हणून याच अर्थानें 'शिल्पशास्त्राचा नवा पैलू' असें मीं म्हटलें आहे. या मंदिरासमोर एक मोठी कमान आहे किंवा तें जोहारमैदानांत जाण्याचें प्रवेशद्वारच आहे. या प्रवेशद्वारांतून आंत जाऊन समोर असलेल्या या रौद्ररूपी भैरवाचें दर्शन घेऊन मगच जोहाराच्या चितेंत रजपूत स्त्रिया उड्या घेत असें म्हणतात. 'जयस्तंभ', 'गोमुखकुंड' या दोन प्रेक्षणीय स्थळांच्या'मध्यें हें मैदान आहे. यांत एक छोटासा चबुतरा बांधलेला आहे. त्यावर राजेलोकांच्या अंत्यविधीसाठीं चिता रचली जात असे. बहुतेक येथील सर्व राजांना याच चबुतऱ्यावर अग्निसंस्कार देण्यांत आला.

वर वर्णन केलेलें मैदान हेंच जोहाराचें स्थान होतें. यासंबंधींचा पुरावा सांगतांना येथील गाईडनें मला एका खड्ड्याकडे नेलें आणि तेथें मैदानाची जमीन ज्या निरनिराळ्या मातीच्या थरांनीं बनलेली होती, त्यांपैकीं पुष्कळ थरांनंतर खालीं जो एक थर होता तो दाखविला. तो मातीचा थर नसून राखेचा थर होता. "हीच त्या शेंकडों स्त्रियांच्या बलिदानाची पवित्र निशाणी !"असें गाईड म्हणाला. त्यांत मला कुठलाच संशय आला नाहीं. ती त्याच वेळची राख होती. अशा प्रकारें

चितोडगडानें केवळ जोहाराची राखच राखून धरलेली नाहीं तर अशीं अनेक स्मृतिचिन्हें त्यावर आहेत; त्यांतलेंच हें एक आहे.

### जयस्तंभ

किल्ल्यावरील हा विजयस्तंभ चांगला चारपांच मैलांवरूनहि दिसूं शकतो. तेवढा उंचच आहे तो; परंतु जयस्तंभाची उंची हेंच एक वैशिष्ट्य नाहीं. त्यावरील विपुल असें प्रेक्षणीय शिल्पकाम, त्याची वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक घडण, त्यावरील शिलालेख अशा किती तरी महत्त्वपूर्ण गोष्टींनीं तो प्रसिद्ध आहे.

शके १५०५ मध्यें महंमदशहा आणि अहंमदशहा या दोन राजांनीं मोठी फौज घेऊन चितोडवर हल्ला केला. त्या वेळीं चितोडवर महाराणा कुम्भ याचें राज्य होतें. त्यानें रस्त्यांतच जाऊन त्यांची फौज अडविली. मोठी निकराची लढाई झाली. अहंमदशहा ऊर्फ कुतुबशहा हा तर जखमी होऊन पळूनच गेला; परंतु महंमदशहास मात्र राणा कुम्भानें कैद केलें. त्याच्याशीं अत्यंत चांगलें वर्तन ठेवलें. राणा कुम्भानें या विजयाच्या स्मरणार्थ सुमारें दहा वर्षें खपून कलावंतांकडून हा स्तंभ उभारला. मोठा सुंदर आहे हा स्तंभ. आठनऊ मजले असलेल्या या स्तंभाची उंची आहे एकशेंवीस फूट आणि शेवटच्या मजल्यावर जाण्यासाठीं सुमारें दीडशें पायऱ्या चढाव्या लागतात. तळाला याची लांबी-रुंदी तीस फूट असून वर ती कमी कमी होत जाऊन आठव्या मजल्या-पर्यंत पुष्कळच कमी होते आणि शेवटच्या घुमटाच्या मजल्यावर तर दहाबारा फूटच भरते. राजस्थानांत सांपडणाऱ्या तांबड्या-पांढऱ्या रंगांच्या दगडांनीं हा स्तंभ बांधलेला आहे. शेवटचा मजला संगमरवरी दगडांचा असून तेथेंच दोन-चार शिला-लेख आहेत. अर्थातच ते जुन्या काळच्या भाषेंत लिहिलेले असल्यानें आपण वाचूं शकत नाहीं; परंतु त्यांतल्या एका शिलालेखावरून कळतें कीं, त्यांत एक वंशावळ लिहिलेली असून राणा कुम्भापर्यंत मेवाडमध्यें झालेल्या त्यांच्या घराण्यां-तील सर्व मूळ पुरुषांचीं नांवें तींत आहेत. स्तंभावरून दिसणारें विहंगमदृश्य प्रेक्षणीय आहे.

### एक रमणीय स्थान

**झरना झरे गउमुख पडे, नरमें नाथ की ठोड ।**
**क्रोड युग तपस्या करे, तब पावे गढ चितौड ।**

अशा या गडाचें दर्शन घेतांना पदोपदीं प्रेक्षकास आनंदच होतो; परंतु प्रेक्षक खरा प्रसन्न होतो तें हें गऊमुखकुंड पाहूनच. अत्यंत रमणीय असें हें स्थान आहे आणि त्याचसाठीं तर थेट कुम्भमहालांतून पद्मिनी भुयारी रस्त्यानें येथें येऊन स्नान करीत असे. स्नानानंतर कपडेलत्ते बदलण्याची तिची जी जागा होती ती पद्मिनीशृंगार या नांवानें ओळखली जाते. तेथें अद्यापहि आरश्यांत पाहतांना गालांवर बोट ठेवून साभिनय नयनानें पाहणाऱ्या पद्मिनीचा एक पुतळा आहे. एक छोटें मंदिरहि येथें आहे. देवदर्शन घेऊन पद्मिनी येथून सुरू होणाऱ्या भुयारी वाटेनें कुम्भमहालाकडे जात असे.

किल्ल्याच्या एका बाजूच्या तटांत हें स्थळ आहे. पाण्याचें नुसतें कुंडच नाहीं तर एक मोठा हौदच आहे आणि पाणीहि भरपूर खोल आणि प्रशस्त आहे. जवळच एक स्नानघर बांधलेलें आहे. अनेक सुंदर झाडें आहेत आणि एक आश्चर्याची गोष्ट म्हणजे एका कड्यांतून रात्रंदिवस थंडगार व स्वच्छ पाण्याचा प्रवाहहि वाहतो आहे. तेथें आहे एक कुंड. त्यांत आहे एक महादेवाची पिंड. 'गाईच्या तोंडांतून ' हा पाण्याचा प्रवाह वाहतो, म्हणून या ठिकाणास गउमुखकुंड असें नांव पडलें आहे हें सांगण्याची आतां आवश्यकता नाहींच.

येथें स्नान करण्याची तरी किती मौज वाटते म्हणून सांगूं. स्नानघरांत गुडघाभर खोलीचें खेळतें पाणी असतें. खुशाल घरांत बसून स्नान करा. वाटल्यास पोहण्याचीहि सोय आहेच. स्नानघरावर चढा आणि हिंमतच असेल तर मारा हौदांत उडी. पुष्कळच खोल जावें लागेल पाण्यांत. मात्र पायाला दगडधोंडे लागण्याची मुळींच भीति नाहीं. भीति आहे ती ही कीं, खालीं गेल्यावर पाण्यांत हवेवांचून दम धरतां आला पाहिजे. अशी खात्री नसेल तर मात्र पोहण्याच्या आणि उडी मारण्याच्या- भानगडींत न पडलेलेंच बरें. मीं मात्र दोन्ही प्रकारच्या स्नानांतील मजा अनुभवली. सहज सुचलें म्हणून सूचना देतों. अहो, माझा पांचशें-एक साबण चोरणारी एक चारशेंवीस मुलगी भेटली मला इथें.

**सावधान**

दुसरीच एक गोष्ट आठवली मध्यें. माझ्या केरळप्रवासांत मत्राल्यांच्या जाळ्यांत मी एकदा सांपडलों होतों. तसाच कर्नाटकच्या प्रवासांत एका भुतांच्या विहिरींतच स्नानासाठीं उतरलों. आतां हे दोन प्रसंग घडले ते मीं माझ्या ' पदयात्रा ' या पुस्तकांत

समाविष्ट केले आहेत. सर्वांना ते खूप आवडले. असे " नव्हे माझी वाणी साप्ताहिक 'नवयुग ' म्हणे ". श्री. र.गो. सरदेसाईंनीं नवयुगांत परीक्षण लिहितांना माझ्या या दोन्ही अनुभवांची दखल घेऊन त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केलेला आहे. तो वाटल्यास वाचकांनीं वाचून पाहावा. " अशा प्रसंगांचीं वर्णनें जर प्रवासवर्णनांत नसतील तर ते सजीव प्रवासवर्णन उतरूं शकत नाहीं. " असें सरदेसाई म्हणतात. या वेळचा एक अनुभव सांगतों. मी इंदोरहून चितोडगडाकडे चाललों होतों. वाटेंत भेटले ' चोरबडायला ' कांहीं पोलीस. म्हणजे चोरांना बडवायला पोलीस भेटले असा अर्थ करूं नका हं ! मी ज्या रेल्वेगाडीनें प्रवास करीत होतों, त्या मार्गावर ' चोरबडायला ' या नांवाचें एक स्टेशन आहे. तेथें कांहीं पोलीस भेटले. आमच्या डब्यांतच एका स्वतंत्र ' कंपार्टमेंट 'मध्यें ते बसले होते आणि दिवसाढवळ्या राजरोस गाडी चालू झाल्यावर ते बहादूर खेळत होते जुगार. त्यांना कशाचीच भीति वाटत नव्हती. पोलिसांची भीति जुगाऱ्यांना असते; पण हे स्वतःच पोलीस. मग काय कुणाला भितात ते ? आतां मला सांगा जर पोलीसच असा धंदा करूं लागले तर बिचाऱ्या जुगाऱ्यांचा धंदा कसा चालेल ? मी कांहीं दिवस पोलीस होतों. तेव्हां आम्हांला कांहीं कायदे पाठ करावे लागत. त्यांत पहिली गोष्ट पाठांतरासाठीं असे, ती म्हणजे पोलिसचीं बारा कर्तव्यें किंवा त्यानें पाळावयाचे बारा नियम. त्यांतला एक नियम असा होता कीं, प्रत्येक पोलिसचें हें कर्तव्य आहे कीं, त्यानें डी. एस. पी. साहेबांच्या परवानगीवांचून दुसरा कुठलाच धंदारोजगार करूं नये. मग हें पोलीस साहेबांच्या परवानगीनें हा धंदा करीत होतें असें मीं समजावें काय ? सांगण्याचा हेतु इतकाच कीं, असे नाना प्रकारचे अनुभव प्रवासांत येतात. जग हें इतकें बहुरंगी, बहुढंगी आहे कीं, त्याची कल्पना नुसती मुंबई पाहून येणार नाहीं. आपले ना. स. का. पाटील केवळ मुंबई शहरासच बहुरंगी-बहुढंगी म्हणत होते. आतां काय म्हणतात माहीत नाहीं—— परंतु मी तर म्हणतों कीं, जगच बहुरंगी-बहुढंगी आहे. त्यांत मुंबई असेल यांत नवल तें काय ? कांहीं अनुभव तर असे चमत्कारिक असतात कीं, ते सांगण्याचीहि सोय नसते. न सांगावे तर जगांत अशा गोष्टी असूं शकतात हें बिचाऱ्या हजारों लोकांना समजूंसुद्धां शकत नाहीं. माझ्या कल्पनाशक्तीच्या कधींच टप्प्यांत न सांपडलेल्या अशा शेंकडों गोष्टी मीं प्रत्यक्ष अनुभावानें पाहिल्या. त्या लिहिण्यांत हजार अडचणी आहेत. वाटल्यास मी त्या प्रत्यक्ष कुणालाहि

सांगूं शकेन. हें सारें सांगण्यामागें एक उद्देश आहे. अनुभव येतो तो अनुभवी माणूस सांगतो. तो लेखक असल्यास लिहितो. कवि कविता करतो; परंतु आलेले अनुभव तिखटमीठ न लावतांहि कलात्मक पद्धतीनें सांगितले तर ते अधिक मनोरंजक नि उद्बोधक होऊं शकतात आणि त्यासाठींच मी या दुसऱ्या पद्धतीचा अवलंब कधीं कधीं करीत असतों. माझा पांचशेंएक साबण चोरला. आंता यांत असंभव असें काय आहे? परंतु 'चारशेंवीस मुलीनें' चोरला असें म्हटलें कीं, हें कलात्मक नाहीं, तरी मनोरंजक खचित वाटेल. निदान छोटीशी गंमत वाटल्यावांचून राहात नाहीं. तीच गोष्ट चोरबडायला भेटलेल्या पोलिसांची आहे. असा अनुभव नेमका त्याच गांवीं आला. ही कांहीं कल्पनाशक्तीची कसरत नाहीं. दोन प्रवाश्यांचीं नांवें मीं लिहून आणलीं आहेत. ते साक्ष देतील. पुरावा देणें ही कमीपणाची गोष्ट आहे; परंतु ज्या बिचाऱ्या कांहीं वाचकांना असे अनुभव कधींच आलेले नसतात, त्यांना यांत अतिशयोक्ति वाटते. असाहि एक अनुभव मला आलेला आहे. हें त्यांचें दुर्दैव आम्हांला नडतें. म्हणून दुर्दैवानें म्हणजे आमच्या दुर्दैवानें हा कमीपणा पत्करून आम्हांला पुरावा देण्याची वेळ येते. यासाठींच हें गुऱ्हाळ लावलें. येवढी मोठी प्रस्तावना करूनहि साबण चोरणाऱ्या त्या मुलीच्या या कथेविषयीं कुणाला कांहीं शंका आलीच तर त्यानें जरूर मला विचारावें. मी त्या मुलीची आणि अशा साशंक माणसाची प्रत्यक्षच भेट करून देईन. ती हकीगत अशी आहे.

## अशीहि मुलगी असूं शकते

गऊमुखकुंडांत मी स्नानासाठीं गेलों होतों. पाऊस चालूच होता. अर्थातच प्रवासांत स्नानाची सोय होईल तेथें स्नान उरकून घेण्याकडे माझी प्रवृत्ति असायची. दुसरे दिवशीं मला कांहीं व्याख्यानाचे कार्यक्रम आटोपून पुढें जायचें होतें. त्यामुळेंच भर पावसांत मी स्नानासाठीं गेलों होतों. स्नानघरांत कांहीं स्त्रिया स्नान करीत आहेत असें पाहून मी 'पद्मिनीशृंगार' या छोट्याशा इमारतींत वरच थांबलों; परंतु पुष्कळ वेळ थांबूनहि त्या स्त्रिया कांहीं केल्या तेथून हालेनात. शेवटीं नाइलाज झाला. मी धीर धरून पुढें गेलों. प्रथम मला अचानक आलेला पाहून त्यांची तारांबळ उडाली; परंतु नंतर काय झालें कुणास ठाऊक, त्या पुन्हा आपल्या स्नाना-

च्या कार्यक्रमांत मग्न झाल्या. मींहि सरळ कपडे काढले आणि ते धुण्यास सुरुवात केली. त्या तीन स्त्रियांपैकीं एकापाठोपाठ एक दोघी निघून गेल्या. शेवटीं जी एक राहिली होती तिचेंहि स्नान आटोपलें होतें आणि ती जाण्याच्याच तयारींत होती; परंतु सहज मीं विचारलें, "स्नानघरांत पुढें गेल्यावर पाणी खोल तर लागत नाहीं ना?" त्यावर कांहींसा विचार करून ती म्हणाली, "तिकडे खूप खोल पाणी आहे. या इकडे कमी आहे अगदीं." माझे एक-दोनच कपडे धुवायचे होते. ते धुऊन झाले होते. त्यामुळें मी त्या मुलीनें सांगितल्याप्रमाणें सरळ कमी पाणी होतें तिकडेच स्नानासाठीं उतरलों. खरें म्हणजे मला पाण्याच्या खोलीची चांगलीच कल्पना अगोदरपासून होती. दोन वेळां मीं तेथें स्नान केलेलें होतें; परंतु आम्ही दोघेंच तेथें होतों. बोलण्यासारखा कांहीं विषय व परिचय नव्हता. म्हणून सहज मीं निरुद्देश-पणें तो प्रश्न विचारला होता; परंतु तिनें दिलेलें उत्तर हें खोडसाळपणाचें आहे, हें मला पूर्ण माहीत होतें. जणू मला पोहतांच येत नाहीं अश्या आविर्भावांत चांचपडत मी पाण्यांत उतरलों व एकदम खोल पाण्यांत जातांच मुद्दामच हातपाय उडवून थेट तळाचा ठाव घेतला. पाण्यांतून बराच वेळ मीं डोकें वर काढलेंच नाहीं. पूर्ण दम-छाक झाल्यावर जेव्हां मी वर निघालों तेव्हां त्या खोडकर मुलीचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता. मी हमखास पाण्यांत बुडालोंच असा तिचा ठाम समज झाला होता; परंतु जेव्हां मी वर आलों आणि पोहण्यास सुरुवात केली तेव्हां कुठें तिच्या जिवांत जीव आला. चांगलीच खोड मोडली तिची; पण थोड्याच वेळांत ती मोठ्यानें हसली आणि म्हणाली, "अच्छा, मैं जाती हूँ। कल फिर मिलूँगी। मैं बडे कीर्ति-स्तंभके पास रहती हूँ।" असें म्हणून ती चालूसुद्धां लागली. स्नान आटोपलें. मी वर आलों आणि पाहतों तों काय; माझी पांचशेंएक साबणाची मोठी वडी तेथें नव्हती. आपला पत्ता सांगून परत भेटण्याचें आश्वासन देऊन ही मुलगी गेली होती; पण ती एवढीशी क्षुद्र गोष्ट कशी करणार? मी हा विचार करीतच बिर्ला धर्मशाळेंत माझ्या मुक्कामावर जाऊन पोहोंचलों.

## चारशें वर्षांनंतर रंग कायम

ठाकूर जयमल्लांचें नांव वर येऊन गेलेंच आहे. त्यांची हवेली ही किल्ल्यावरील सवात उंच ठिकाणीं आणि सर्वांत उंच अशी ही इमारत आहे. चारशें वर्षां-नंतर आज ती मोडकळीस आली आहे; परंतु अद्यापहि ती प्रेक्षणीय आहे. आश्चर्य

म्हणजे या इमारतीचा अस्मानी किंवा निळा रंग अद्यापहि चमकदार असाच आहे. ऊन्ह, वारा, पाऊस या कशालाहि न जुमानतां त्यानें आपलें अस्तित्व कायम ठेवलें आहे. अजिंठ्यांत हजार-दीड हजार वर्षांपूर्वीचीं चित्रें व त्यांचा रंग अद्याप कायम आहे; परंतु निदान तो ऑइल पेंटसारखा चिकट व पक्का रंग तरी आहे. शिवाय त्यास तो गुंफेंत असल्यामुळें उन्हापावसाचा उपसर्गहि पोंचत नसे. या हवेलीच्या बाहेरच्या कमानींतलाहि रंग जणू आजच दिला आहे असा दिसतो. त्याचें तेज किंवा चाकाकी पाहून आश्चर्य वाटतें. अर्थातच हा तेलकट रंग नाहीं. आहे तो साधाच; पण पक्का. यःकश्चित् रंग. चारशें वर्षें कशालाहि दाद दिली नाहीं त्यानें. नाहीं तर आमच्या विज्ञानयुगांतले आजचे रंग ! खेटून जरा कुठें भिंतीला टेकलें कीं गेला तिथला रंग. लागलीच उडी मारून खेटणाराच्या पाठीवर बसायचा. आजचें युगच चंचल आहे म्हणा; बिचाऱ्या रंगाचा काय दोष ? आणि आजकाल कोण किती दिवस टिकतो यापेक्षां कुणाला, कसें नि किती लवकरांत लवकर मारतां येईल याची तर जणू स्पर्धाच चालली आहे. अमेरिकेचा एक ॲटम बॉंब जर थोड्या वेळांत हजारों माणसें मारूं शकत असेल, तर रशियाचा कोबाल्ट किंवा प्लॅटिनम बॉंब त्याहिपेक्षां शतपटींनीं जलद व अधिक लोक मारूं शकतो. या स्पर्धेपायीं जीवनांतील साध्यासुध्या गोष्टीहि अशाच वेगवान् झाल्या आहेत. आणखी एक उदाहरण घ्या. मी लिहितों आहे ही रात्रीची बारा-एकची वेळ आहे. या वेळीं आमच्या गांवावरून नियमानें एक विमान जात असतें. ही विज्ञानाची प्रगति माझ्या डोक्यावर घिरट्या घालीत असतां खालीं एका धाब्याच्या घरांत ढेकणांच्या वाढत्या त्रासामुळें व वेगवान् हल्ल्यामुळें मला उठून बसून धड लिहितांहि येत नाहीं, धड झोंपहि येत नाहीं. चंद्रावर जाऊं इच्छिणाऱ्या माणसास अद्याप हे बहाद्दर ढेकूण दाद देत नाहींत. दिवसभर थकलेला-भागलेला माणूस शांत झोपला तर काय उपयोग ? म्हणून या नव्या युगांत असल्या गोष्टींची खास दाद घेतली जाते व असल्या गोष्टींपासून माणसाचा बचाव करण्याचें कटाक्षानें टाळलें जातें. त्यांत जरासुद्धां हलगर्जीपणा होत नाहीं. इतकेंच काय ? डास मारतांना ढेकूण मारले न जाण्याची जणु दक्षताच घेतली जाते. कारण एकाचें मिश्रण दुसऱ्यास मारूं शकत नाहीं. हा कालाचा महिमा आहे. मात्र जयमल्लाच्या हवेलींत हा जो रंग आहे तो यापासून दूर आहे. येथून दिसणारा चितोडगांवाकडील देखावाहि प्रेक्षणीय आहे.

## कालीमातेचें भव्य मंदिर

किल्ल्यावर चढून रामपोळापासून चांगलें दोन मैल चालत आल्यावर आपण या मंदिरापर्यंत जाऊन पोंचूं शकतों. कालीमातेच्या या मंदिराचें शिल्पकाम प्रेक्षणीय आहे. अत्यंत भव्य असें हें मंदिर खूप प्राचीन असूनहि चांगल्या अवस्थेंत आहे. येथें गोकुळअष्टमीस मोठी यात्रा भरते. आसपासच्या खेड्यांतून शेंकडों लोक यात्रेस येतात. रासनृत्य आणि गाणीं गाऊन ही यात्रा गजवजून टाकतात. या यात्रेस मोठ्या उत्सवाचेंच स्वरूप येतें. कारण याच सुमारास राजस्थान आणि सौराष्ट्रांतील सातं आठंचा मोठा सणहि असतो. सातं आठं म्हणजे सप्तमी-अष्टमी. कालीमातेला इकडचे लोक फार मानतात. त्याचें वर्णन वर आलेलेंच आहे.

## सूर्यकुण्ड

कालीमातेच्या मंदिरासमोर एक मोठें तळें आहे. सूर्यकुण्ड या नांवानें तें ओळखलें जातें. अशीं कितीतरी तळीं आणि विहिरी किल्ल्यावर आहेत. सध्या किल्ल्यावर हजार-पांचशें लोकवस्ती करून राहतात. शेतीवाडी करतात. त्या सर्वांना स्वच्छ पाण्याचा पुरवठा त्यामुळें सहज उपलब्ध आहे; परंतु येथें पन्नास हजार लोकसंख्येचें शहर जरी वसलें तरी तेवढी विस्तीर्ण जागा व पाणी किल्ल्यावर आहे. प्राचीन कालापासून चालत आलेला शिल्पकामाचा धंदाहि किल्ल्यावरील कांहीं लोक करतात. त्यामुळें ते किल्ल्यांतच असलेला उत्कृष्ट दर्जाचा दगड फोडून काढतात. त्यानेंहि अनेक तळीं येथें निर्माण झालीं आहेत.

## सूर्यकुण्डाबाबत दंतकथा

मीं वर सांगितलेंच आहे कीं, किल्ल्यावरील बारीकसारीक गोष्टींची माहिती सांगूं गेल्यास एक स्वतंत्र पुस्तक तयार होईल. अशा किती तरी कथा येथें प्रसिद्ध आहेत. त्यांतली एक अशी आहे कीं, लढाईच्या काळांत या कुण्डांतून रोज एक घोडेस्वार बाहेर निघत असे आणि तो महाराणा कुम्भ वगैरे येथील राजांना लढाईसाठीं मदत करीत असे. ही गोष्ट मोगल राजेलोकांच्या कानांवर गेली. त्यांनीं गुप्त हेरामार्फत गाई वगैरे कापून या तळ्यांत टाकल्या आणि पाणी अशुद्ध केलें. तेव्हांपासून तो मदतनीस घोडेस्वार निघेनासा झाला.आतां ही झाली दंतकथा. इतिहासांत याबाबत एक गोष्ट सांगतात कीं, लढाईच्या वेळीं येथील सेनापति तळ्यांत स्नान

करून कालीमातेचें दर्शन घेऊन मग युद्धावर जात असे. दंतकथा या सेनापतीच्या नित्य नियमावरूनच पडली असावी असें अनुमान केलें जातें. भीमलताप्रहारकुण्ड म्हणजे भीमानें लाथ मारून काढलेला पाण्याचा प्रवाह वगैरे. अनेक तळ्यांबाबत अशाच आख्यायिका आणि दंतकथा प्रसिद्ध आहेत. त्यांतल्या कांहीं तर खूप मनोरंजक आहेत.

## पद्मिनी महाल

**गढ़तो चित्तौडगढ़ और सब गढ़ैया।**
**राणी तो पद्मावती और सब गधैया।**

रेल्वेनें प्रवास करतांना वाटेंत भेटलेल्या त्या प्रवाश्याची ही म्हण मला आठवली. अल्लाउद्दीन खिलजीनें पद्मिनीस ज्या महलांत पाहिलें—काचेंत तिचें फक्त प्रतिबिंब—पाहूनहि जो बादशहा बेहोष झाला अशा त्या परम सौंदर्यसम्राज्ञीचा हा महाल आहे. यांत दोन विभाग आहेत किंवा हे दोन स्वतंत्र वेगळे राजवाडेच आहेत. जलमहल ऊर्फ जनानामहल आणि पद्मिनीमहल ऊर्फ मर्दानामहल. एक पाण्यांत आहे, एक तळ्याच्या कांठावर. एक मोठा, दुसरा छोटा. दोन्हीहि सुंदर आहेत. एकांत एक छानदार बाग आहे. येथें तळ्याच्या बाजूनें एका घुमटांत चार आरसे लावलेले आहेत. अजूनहि पद्मिनी ज्या जलमहलाच्या दारांत उभी राहून तिनें अल्लाउद्दिनास दर्शन दिलें तें दार या घुमटांतून स्पष्ट दिसतें. किल्ला पाहण्यासाठीं माझ्याप्रमाणेंच अनेक वासी सारखे येत होते. मी अशाच कांहीं प्रवाश्यांबरोबर होडीनें जाऊन जलमहलहि पाहून आलों.

राणीचा महाल, रामपूर हवेली, बादशहाची भाकसीचौगान, चतरंग तळें, विकट कंदरा, चित्तौड बुरुज अशीं कितीतरी स्थळें पाहून मी दुसरे दिवशीं येथील एक शेवटचें फत्तेप्रकाश महल हें स्थळ पाहून माझें चंबूगवाळें आटोपणार होतों. पावसानें शाळेंतील व्याख्यानाचे कार्यक्रम तहकूब झाले होते. त्यामुळें सकाळींच मी बाहेर पडलों आणि फत्तेप्रकाश महलाकडे गेलों.

## फत्तेप्रकाशमहल

महाराणा फत्तेसिंह यांनीं बांधलेला हा राजवाडा. वाड्याचें बांधकाम आधुनिक

पद्धतीचें आहे. पांढऱ्याशुभ्र संगमरवरी इमारतीसारखा हा दिसतो. मध्यें एक मोठा भव्य चौक आहे. त्यास चांगल्यापैकीं फारशी बांधलेली असून मधोमध फत्तेसिंहाचा संगमरवरी पुतळा व एक छोटासा कारंजा आहे. प्रथम दर्शनीं जरी इमारत पांढऱ्या दगडांची बांधलेली दिसत असली तरी ती आहे विटांचीच; परंतु वर पांढराशुभ्र गुळगुळीत गिलावा केलेला आहे हें बारकाईनें पाहिल्यास लक्षांत येतें. आंत पोलीस-लोकांचा राखीव फोर्स ठेवलेला आहे. तरीहि प्रेक्षकांस राजवाडा पाहण्यास केव्हांहि परवानगी दिली जाते. येथून पाठीमागें पाहिलें असतां अनेक प्राचीन मंदिरांचीं गोपुरें दृष्टीस पडतात. त्यांतलें एक मंदिर चांगलेंच भव्य असें दिसत होतें म्हणून मी सहज तिकडे गेलों आणि पाहतों तों काय, तें अत्यंत प्रेक्षणीय मंदिर तर होतेंच; पण प्रसिद्धहि होतें हें नंतर आढळून आलें.

## संत मीराबाईचें मंदिर

संत मीराबाईचें नांव ऐकलें नाहीं असा सुशिक्षित माणूस विरळा सांपडेल. मीराबाईचीं भजनें इकडे फार लोकप्रिय आहेत. ज्ञानदेव-तुकारामांचें जें स्थान महाराष्ट्रांत तेंच मीराबाईचें राजस्थान–सौराष्ट्रांत. तुकारामांच्या अभंगांतील शेवटच्या 'तुका म्हणे'. या कडाव्याप्रमाणें मीराबाईच्या, भजनांतील 'मीरा कहे' अशी कडवीं किंवा ओळी जवळजवळ प्रत्येक भजनांत असतात. मेवाडला मीराचा देश म्हणण्याचा इकडे प्रघात आहे. ज्या मीराच्या नांवानें हा प्रांत ओळखला जातो, त्या कृष्णभक्त संत मीराचा जन्म मारवाडांत सन १५५५ मध्यें कुडकी गांवीं झाला. मीरा अठराव्या वर्षी विवाहबद्ध झाली. प्रसिद्ध सम्राट् महाराणा संग याच्या मुलाबरोबर मीराचें लग्न झालें खरें; पण लग्नानंतर दहाच वर्षांत मीराचे पति-भोजराज-वारले आणि मीरा विधवा झाली. तिच्या मनाचा बाल्वयापासूनच श्रीकृष्णभक्तीकडे असलेला कल वैधव्यामुळें अधिकच तिकडे वळला. मीराच्या भजनासंबंधानें, तिच्या आयुष्यांतील अनेक हृदयस्पर्शी प्रसंगासंबंधानें पुष्कळ लिहितां येण्यासारखें आहे. ती एक महान् कवयित्री होती, संत होती, भक्त होती. असे अनेक गुण तिच्या ठायीं एकवटले होते

मीराला विष देणें, विषारी साप तिच्या अंगावर सोडणें वगैरे प्रसंग ज्या ठिकाणीं घडले तेंच हें मीरामंदिर. मीरा आणि श्रीकृष्णाचीं दोन अत्यंत सुंदर मोठीं चित्रें यांत आहेत. मंदिर छोटेंच परंतु प्रेक्षणीय आहे. हें मंदिर ज्या प्रांगणांत आहे तेथेंच मीरामंदिराच्या उजव्या बाजूस हेंएक कुम्भशामजी मंदिर आहे.तेंहि पाहण्यासारखें आहे.

### कुम्भशामजी मंदिर

हें अतिशय प्रचंड असें दगडी मंदिर आहे. त्यावरील शिल्पकाम अवाढव्य तसेंच सुरेख आहे. हीं दोन्हीं मंदिरें केवळ मीं फत्ते प्रकाशमहालांतून पाहिलीं म्हणून मला पाहतां आलीं. एरव्हीं अशींच साधींसुधीं मंदिरें म्हणून मीं तीं कदाचित् पाहण्याचें टाळलेंहि असतें; परंतु तसें झालें असतें तर एका मोठ्या आनंदास मी पारखा झालों असतों, असेंच हीं मंदिरें पाहून झाल्यावर मला वाटलें.

दुसरे दिवशीं सकाळीं मी सामान-सुमान आवरलें. धर्मशाळेची चावी व्यवस्थापकांच्या स्वाधीन केली आणि निघालों. तोंच फाटकांत ती खोडकर मुलगी भेटली. पोषाखांत पुष्कळच बदल झाल्यानें मला ती प्रथम ओळखूं आली नाहीं; परंतु नंतर मीं ओळखलें. तिनें तीन-चार सुंदर दगडांचे खलबत्ते आणले होते आणि त्यांतला निदान एक तरी घेण्याचा ती मला आग्रह करीत होती. प्रवासांत मला प्रसंगीं अंगावरचे कपडेंहि जड होत असत. पायीं प्रवास करावा लागे, डोंगरमाथ्यावर चढावें लागे, कांट्याकुट्यांतून फिरावें लागे, पावसांत हिंडावें लागे; मग मीं हें दगडाचें ओझें कुठें कुठें वागवावें? ते खलबत्ते सुंदर होते यांत शंकाच नाहीं; परंतु यामुळेंच मीं ते घेण्याचे नाकारले आणि दोन अशांच सुंदर दगडांचे सुरेख पेपरवेट तयार करून आणण्यास तिला सांगितलें आणि अगदींच थोड्या वेळांत तिनें ते तयार करून आणलें. ते घेऊन मीं त्या मुलीचा नि गडाचा निरोप घेतला.

: ८ :

## राजस्थानी हृदय

शितावरून भाताची परीक्षा करतां येते; परंतु चार-दोन माणसांच्या स्वभावावरून एखाद्या प्रांतांतील लोकांच्या स्वभावाची परीक्षा करणें हें तितकेंसें बरोबर ठरणार नाहीं; परंतु शें-दोनशें माणसांच्या स्वभावांत

जर कांहीं समान गोष्टी आढळून आल्या आणि तीं माणसें एका प्रांतांतलीं आणि वेगवेगळ्या गांवांतली असलीं तर मात्र असें निदान करणें तितकेंसें चूक ठरणार नाहीं, असें मला वाटतें. राजस्थानी माणसाच्या मनाचा ठाव मी चितोडगडावरील तळ्याचा ठाव घेतांनाच घेऊन बसलों होतों. दुसरे दिवशीं जेव्हां पेपरवेट घेऊन ती मुलगी आली, तेव्हां तिनें माझ्या पांचशेंएक साबणाची वडी एका कागदांत गुंडाळून जशीच्या तशी मला परत केली आणि पुष्कळ गोष्टी बोलली ती मजजवळ. स्त्रियांना स्वातंत्र्य नाहीं. बालवयांत लग्न करण्याची प्रथा. त्यामुळें एका वर्षाच्या आंत आलेल्या वैधव्यानें जीवनाचा बळी घेतला. बळीच नाहीं तर काय ? पतिराजानें इहलोकींची यात्रा आटोपल्यावर विचारीस एका वृद्ध पित्याशिवाय जगांत कुणीच राहिलें नाहीं दुसरें. त्याच्याच छायेंत आजपर्यंतचीं अठरावीस वर्षें काढलीं तिनें आणि पुढेंहि तीं तशींच निभविणें क्रमप्राप्त आहे. मला दया आली त्या मुलीची आणि त्याहिपेक्षां तिच्या गरिबीची ! मीहि गरीब आहें, त्यामुळें तिला कांहींच मदत करूं शकलों नाही. फक्त तिची गरिबी समजूं शकलों. हृदय ओळखूं शकलों. तिला चोर-गुन्हेगार नाहीं मी म्हणूं शकत. तळ्यावरील छोट्या – मोठ्या वस्तु चोरण्यापर्यंत गरिबीनें तिचा अधःपात घडवून आणला आहे. मनमोकळेपणानें तिनें कबुली दिली या गोष्टीची आणि मला सांगितलें कीं, तुमचें पाकीट मी सहज चोरूं शकलें असतें; परंतु नाहीं चोरलें. तुम्ही खूप लांबचे. प्रवासांत संकटांत सांपडाल म्हणून. अशा मुलीला कुणीं चोर म्हटलें, तर मी त्याला माणूस म्हणणार नाहीं. फार तर वकील म्हणेन. कायद्याच्या भाषेंतच ती चोर ठरेल. माणुसकीच्या नव्हे. कधीं कधीं कायद्याची आणि माणुसकीची गल्लत होते, हें जगजाहीर आहे. "बिचारी !" कोण जाणे काय आहे तिच्या भवितव्यांत लिहिलेलें. या मुलीच्या दुर्दैवाबरोबर मी राजस्थानी मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करूं लागलों, तेव्हां मला पुष्कळ गोष्टींचा उलगडा झाला.

प्रवासांत आणि राजकीय जीवनांत, मीं हजारों माणसें पाहिलीं आहेत. त्यांतील कांहीं खूप जवळून. त्यामुळें मला एक कला साधली आहे. माणूस केवळ प्रथमदर्शनी नुसता पाहूनहि मी त्याचें अर्धेअधिक भविष्य त्याच्या फक्त मुद्रेवरूनच वर्तवूं शकेन. याबाबत एक अनुभव सांगतों. प्रवासांत मी व्याख्यानें देत असें. व्याख्यानावर पैसा मिळे. व्याख्यान ठरविण्यासाठीं मराठी-इंग्रजी अगर अशाच एखाद्या

शाळेंत अगोदर जाऊन व्याख्यान ठरवावें लागे. चार-दोन मिनिटांतच मी त्या शिक्षकाचा चेहरा पाहून आणि प्राथमिक बोलण्यावरून व्याख्यान ठरणार किंवा नाहीं हें समजून जात असें. शेंकडा नव्वद वेळां तरी माझा अंदाज बरोबर ठरत असे. म्हणून मी खात्रीपूर्वक सांगतों कीं, राजस्थानी माणसाचें हृदय ओळखण्यांत माझी चूक होण्याचा संभव फार कमी.

राजस्थानी माणूस हा अत्यंत प्रेमळ आहे. कुठली अपेक्षा न करतां कुणालाहि शक्य ती मदत करण्याकडे या माणसाची प्रवृत्ति दिसून येते. तो दिलदार आहे, चिकाटीचा आहे, निश्चयी स्वभावाचा आणि करारी आहे. दिलेलें वचन आणि केलेली प्रतिज्ञा पाळणारा आहे. गाडीला लोहार शेंकडों वर्षें एक प्रतिज्ञा विसरूं शकत नाहीं, याचें इंगित मला राजस्थानी माणूस जेव्हां मीं जवळून पाहिला तेव्हांच कळलें. वरील वर्णनांतल्या मुलीप्रमाणें कांहीं हृदयें तर मीं अगदींच जवळून पाहिलीं आहेत. शत्रूवरहि दया करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. मात्र जशास तसें हा पद्मिनीचा मंत्र तो विसरला नाहीं. कांहीं दोषहि मला राजस्थानी माणसांत दिसले. तो अत्यंत रूढिप्रिय आहे. स्त्रियांना स्वातंत्र्य देऊं इच्छीत नाहीं. आपली मुलगी शिकल्यानंतरलग्नावर तोंडावर बुरखा घेणार नाहीं, या भीतीनें आपल्या मुलीस शाळेंतच न पाठविणारे कांहीं पालकहि मीं पाहिले आहेत. कांहीं लोकांत कांहीं प्रमाणांत अंधश्रद्धाळूपणा दिसून येतो. तो उत्सवप्रिय आहे; परंतु अशा प्रसंगींहि पाहिजे तेवढें स्वातंत्र्य स्त्रियांना देत नाहीं. रस्त्यानें येतां-जातां, गाडीनें प्रवास करतांना स्त्रियांना गाण्याचें स्वातंत्र्य दिलें जातें. हा मात्र अपवाद आहे. संत मीराची ती पुण्याई असावी. निदान भजनें म्हणण्याचें स्वातंत्र्य तिनें त्यांना मिळवून दिलें. कारण हजारों अडचणी नि संकटें येऊनहि मीरानें भजनें म्हणण्याचें सोडलें नाहीं. पुष्कळ बाबतींत मला तो महाराष्ट्रियन माणसाप्रमाणें वाटला; परंतु सुधारणांची गति त्यांच्यापेक्षां आपल्यांत जास्त आहे. उदा० आपल्याकडील ब्राह्मणहि चांभाराचा धंदा करूं शकतो; परंतु राजस्थानी नवे जोडे तयार करणारा चांभार जुनी वहाण शिवण्यांत कमीपणा मानतो. त्याहूनहि गरीब जातीचाच हा धंदा आहे असें तो समजतो. या रूढीपायीं एक चांभार चांगलाच नाराज झाला माझ्यावर. मी अशाच एका दुकानांत माझ्या पटागी चपलांचे तुटलेले पट्टे शिवण्यासाठीं गेलों असतां तो मागेल तेवढे पैसे देऊनहि त्यानें त्या शिवल्या तर नाहींच; परंतु त्यास त्यांत अपमान वाटला.

एकंदरीनें रूढिप्रिय, स्वाभिमानी, प्रेमळ, शत्रूवरहि दया करणारा, जशास तसें वागणारा, निश्चयी, दिलेलें वचन व केलेली प्रतिज्ञा पाळणारा असा हा राजस्थानी माणूस असतो असें म्हणतां येईल.

: ९ :

## एक प्रेक्षणीय शहर उदयपूर

प्रयत्नापेक्षांहि कधींकधीं योगायोगास अधिक महत्त्व येतें हा माझा नेहमींचा अनुभव आहे. तो पुन्हा एकदा उदयपूर पाहतांना आला. त्याचें असें झालें. येथें मी एका महाराष्ट्रियन प्रोफेसरांकडे गेलों होतों. परप्रांतांत आपलीं माणसें नेहमींच माझ्याशीं आपुलकीनें वागतात, असा आजपर्यंतचा अनुभव आहे. त्यांनीं माझें पुस्तक मोठ्या आपुलकीनें विकत घेतलें. इतकेंच नाहीं तर किंमतीपेक्षांहि जास्त पैसे मला मी घेत नसतांनाहि दिले. पाहुणचार, कुशल वर्तमान वगैरे कार्यक्रम आटोपल्यावर सहज प्रवासाबरोबर प्रेक्षणीय स्थळांच्या गोष्टी निघाल्या. चर्चेच्या ओघांत सहज मीं म्हटलें, “ आपल्या येथील जगदीशमंदिरांतील श्रीकृष्णाच्या मूर्तीच्या चेहऱ्यावरील एकवीस हिरे मोठे सुंदर आहेत. त्यामुळें मूर्तिहि फार सुरेख दिसते ! ” त्यावर आश्चर्यानें प्रोफेसरसाहेब म्हणाले, “ अं, आमच्या इथें ? मीं तर कधींच पाहिले नाहींत एवढे हिरे! ” प्रोफेसरसाहेबांच्या मुलीलाहि तेवढेंच आश्चर्य वाटलें. त्या म्हणाल्या, “ मी कधी कधीं जात असतें मंदिरांत, परंतु मला तर फक्त एकच ल्हानसा हिरा दिसला तेथें. कृष्णाच्या हनुवटीवर लावलेला असतो तो. ” मलाहि आश्चर्य वाटलें. कारण पांचच मिनिटांपूर्वीं मी हे तेजस्वी असे एकवीस हिरे पाहून आलों होतों. आम्ही गोंधळांत पडलों; परंतु नंतर प्रोफेसरांनीं अंदाज बांधला. ते म्हणाले, “ इकडे रक्षाबंधनाचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. कदाचित् या उत्सवानिमित्त लावले असतील हे हिरे. ” आणि चौकशीअंतीं हेंच खरें असल्याचें आढळून आलें. योगायोगास महत्त्व असतें तें हेंच. तीन वर्षे

उदयपुरांत राहूनहि जे हिरे प्रोफेसरसाहेबांच्या कुटुंबियांस पाहतां आले नाहींत ते मला फक्त कांहीं तासांच्या अवधींत पाहतां आले. जर ह्या सणाचे वेळीं मी येथें आलों नसतों, तर एवढे सुंदर हिरे मला कधीं पाहतां आले असत काय? पुढें सौराष्ट्रांतहि सातम्-आठम् उत्सवाच्या निमित्तानें मला जीं अनेक लोकनृत्यें व गाणीं वगैरेंचे कार्यक्रम पाहतां आले ते याच योगायोगामुळें.

## ते एकवीस हिरे

उदयपूर शहर पुष्कळ मोठें आहे. तेथें प्रेक्षणीय स्थळेंहि पुष्कळ. शहारांतून सहज एका पेठेनें फिरत मी चाललों होतों. कांहीं मुलें हातांत पांच-पंचवीस चित्रें घेऊन माझ्याकडे आलीं आणि तीं चित्रें पुढें करून मला तीं विकत घेण्याविषयीं सांगूं लागलीं. चित्र साधेंच होतें. हातानें काढलेल्या एका माणसाचें तें चित्र होतें. खांद्या-वर कावड घेऊन चाललेला हा माणूस श्रावण आहे हें मीं तात्काळ ओळखलें आणि तें चित्र फक्त एक आण्यांत मिळाल्यानें मीं विकतहि घेऊन टाकलें; परंतु पुढें जेव्हां गेलों, तों प्रत्येक दुकानांत या चित्रांची गर्दी पाहून मी साहजिकच बुचकळ्यांत पडलों. चौकशीअंतीं कळलें कीं, या दिवशीं श्रावणाचीं चित्रें घरोघर लावलीं जातात. त्यांची पूजा केली जाते. आपल्याकडे नागनरसोबाचीं चित्रें नागपंचमीस लावतात ना, तशीं. या पेठेंतच हें हिरे असलेलें मंदिर आहे.

मंदिराचें नांव जगदीशमंदिर असलें तरी तें आहे श्रीकृष्णाचें मंदिर. कृष्णास इकडे ठाकूरजीहि म्हणतात, तसेंच जगदीश म्हणत असल्यास कोण जाणे! जगनिवास पॅलेस, मर्दाना महल आणि हें मंदिर एकाच राजानें बांधून घेतलें आहे. कदाचित् मंदिर बांधणाराच्या नांवानेंहि तें ओळखलें जात असेल असें दिल्लीच्या लक्ष्मीनारायणाच्यामंदि-रास बिर्लामंदिर म्हणतात तसें. कुणाचेंहि असो; परंतु हें मंदिर अत्यंत भव्य व त्या-वरील शिल्पकाम प्रेक्षणीय आहे खास. सुमारें चार फूट उंचीची शाळिग्रामाची कृष्णमूर्ति आहे. ही मूर्ति अत्यंत रेखीव आहे, आणि त्यावरील ह्या एकवीस हिऱ्यांनीं तर तिचें सौंदर्य शतगुणित झालें आहे. तेजस्वी निळ्या रंगाचे हे हिरे गडद अंधारांतहि बॅटरीच्या छोट्या व कमी पॉवरच्या ग्लोबसारखे चकमकतात. अर्थात् हें तेज कमी नाहीं. कारण ते एस्ट्रेला किंवा एव्हररेडीच्या मसाल्यावर चमकत नाहींत. केवळ दगडाचें तेज तें. ते इतके तेजस्वी आहेत कीं, प्रथम मला वाटलें लहान ग्लोब लावून मुद्दाम सजावट केलेली आहे; परंतु त्यांचें तेज कांहीं आगळेंच आहे. निळ्या

रंगाचे ते हिरे जेव्हां लुकलुकतांना मीं पाहिले तेव्हांच शंका आली कीं, ग्लोब फक्त चमकतो, असा लुकलुकत नाहीं आणि कृत्रिम लकाकी निर्माण केली तरी ती अशीं दिसणार नाहीं. हातांत भरलेली बंदूक घेतलेला पहारेकरी जेव्हां मीं पाहिला तेव्हां न विचारतांहि हे हिरे आहेत हें मीं बाहेरच्या दारांतूनहि ओळखलें. नंतर खास परवानगीनें मीं ते जवळून पाहिले. मंदिरांत एक शिलालेखहि लिहिलेला आहे. हें मंदिर अत्यंत भव्य आहे. भारतांतील सर्वांत उंच मिनार जो कुतुबमिनार त्यापेक्षां फक्त पंधरावीस फूटच कमी उंचीचें हें मंदिर आहे. सव्वादोनशें फुटांहून अधिक उंची हें आहे. कृष्णमूर्तीकडे किती वेळ पाहातच राहावेंसें वाटतें. इतके हिरे आणि तेहि एवढे तेजस्वी मीं पूर्वीं कधीं व कोठेंच पाहिले नव्हते. त्यामुळें तर अर्धापाऊण तास मीं देवळांतच ठाण मांडलें.

## जगनिवास पॅलेस

नांव जरी जगनिवास पॅलेस असलें तरी याचें खरें नांव लक्ष्मीविलास पॅलेस ठेवायला हवें होतें, असें मला वाटलें. मीं ल्हानपणीं एक सिनेमा पाहिला होता. 'एक दिनका सुलतान !' तेव्हांपासून मला नेहमीं वाटे मींहि कधींना कधीं असा एक दिवसाचा निदान औट घडीचा तरी राजा होणार ! उगीच ही कल्पना मनांत दडी धरून बसली. मी आतां मोठा झालों आणि राजामहाराजांची सद्दीहि संपली. जिथें महाराजांचे नामधारी राजे झाले, तिथें औट घडीच्या माझ्या स्वप्नास साकार रूप कसें येणार ? परंतु ल्हानपणींच एक कवितेची ओळ मीं पाठ केली होती.'होणारें न चुकेल होइल जरी ब्रह्मा तया आडवा !' मी राजा होणारच होतों. बालपणींचें हें स्वप्न उदयपुरला साकार झालें.

## औट घडीचा राजा

एका मोठ्या विस्तीर्ण तळ्यांत हा राजवाडा बांधलेला आहे. असें म्हणतात कीं, एकदा खूप मोठा दुष्काळ पडाला.तेव्हां उदयपुरचें हें एवढें मोठें तळें संपूर्ण कोरडें पडलें आणि हें पाहून महाराजांनीं हा राजवाडा बांधून घेतला. अशाच एका दुष्काळांत या राजवाड्याचा घेतलेला एक फोटोहि येथें लावलेला मला पाहतां आला. विस्तीर्ण जलाशयांतून होडींत बसून प्रेक्षक एकदा या पॅलेसकडे निघाला कीं, मीच काय कुणीहि प्रेक्षक फक्त सहा आण्यांत औट घडीचा राजा होऊं शकतो. उदयपुरच्या

मर्दाना महलाच्या किनाऱ्यापासून जों जों दूर जावें तों तों किनाऱ्याकडील दृश्य अधिकाधिक सुंदर दिसूं लागतें. काशी बनारसच्या घाटाचीं जीं चित्रें आपण पुस्तकांत अथवा सिनेमांत पाहतों ना ,तसेंच दृश्य दिसतें हें. मला तर खूप आवडला तो देखावा. पाणीहि काळेंभोर आणि थंडगार असतें. मोठमोठे मासे त्यांत उड्या मारतांना दिसतात. मात्र माशांची ही मौज बघण्यासाठीं अगोदरपासूनच सावध असावें लागतें. किनारा सोडतांनाच त्यांच्यासाठीं चणेफुटाणे किंवा असेंच कांहींतरी विकत घ्यावें लागतें. मग पाहावी त्यांची मौज. उड्यावर उड्या पडतात त्यांच्या. अगदीं देहूच्या डोहांतील माशांप्रमाणें· होडी ऐन राजवाड्याच्या दरवाजांत जाते.

## काचेचा दरबार हॉल

उदयपुरच्या प्रेक्षणीय ठिकाणांत दोन ठिकाणें प्रसिद्ध आहेत. एक हा जगनिवास पॅलेस आणि दुसरा 'मर्दाना महल.' त्यांतील हा शीशमहल तर अत्यंत सुंदर आहे. सुंदर काचांनीं मढविलेल्या या भव्य हॉलमधून आपण थोडें पुढें गेलों कीं, बैठकीची जागा लागते. त्यांतील उंची दर्जाचें फर्निचर आणि गाद्यागिरद्या पाहून झाल्यावर सहज मी एका खिडकींतून मागच्या बाजूनें दिसणारा तळ्याचा देखावा पाहण्यासाठीं गेलों. देखावा तर प्रेक्षणीय आहेच; पण दुसरीच एक गंमत पाहिली मीं तेथें. गंमत अशा अर्थानें कीं, मला त्यांतला कांहींच अर्थबोध झाला नाहीं आणि गाईडलाहि तो सांगतां आला नाहीं; परंतु मला त्या गोष्टींत मौज वाटल्याशिवाय राहिली नाहीं. कारण हा राजवाडा हिंदु राजानें बांधला, आणि त्या खिडकींत अनेक सुंदर तरुण मुस्लीम राण्यांचे फोटो लावलेले होते. हस्तिदंतांत कोरून तयार केलेले हे फोटो सुंदर आणि कलापूर्ण होते यांत शंकाच नाहीं; परंतु अशा प्रकारें मुसलमान घराण्यांतील राण्यांचीं चित्रें आपल्या वाड्यांत लावण्याचें प्रयोजन काय ? हें कांहीं केल्या माझ्या लक्षांत आलें नाहीं.

या दरबार हॉलनजीकच्या बैठकींतून डावीकडे गेलें कीं दुसरी एक खास बसण्याची जागा आहे. येथील सर्व फर्निचर काचेचें आहे. मोठेमोठे गोल मेंज, खुर्च्या, स्टूल वगैरे सर्व कांहीं सुंदर पांढऱ्याशुभ्र काचेचें आहे. त्यावर उंची कपड्यांचें आच्छादनहि जरूर तेथें आहे. ही जागा खरोखर पाहण्यासारखी तर आहेच; परंतु त्यांतील एखाद्या खुर्चींत बसून सभोंवार पाहिलें कीं, 'एक दिनका सुल्तान'ची आठवण झाल्यावांचून राहात नाहीं. दारें व खिडक्या उंची चंदनाच्या लाकडाच्या

आहेत. त्यांच्या सुगंधानें प्रेक्षक मस्त होऊन जातो आणि खुर्ची तरी काय ती साधी असते? लोकल बोर्डाच्या शाळेंतील मास्तरची ती खुर्ची थोडीच होती? कमरेइतक्या उंचीवरून खुर्चीत टेकलेला माणूस अलगद खालीं जायचा आणि गुडघ्याइतका खालीं तो आला कीं, अपोआप मागें त्याचा झोक जाऊन दिसायला साध्या खुर्चीच्या आकाराची ही खुर्ची आरामखुर्ची बनायची. म्हणजे लिबर्टी टॉकीजमधल्या खुर्चीप्रमाणें ॲटोमॅटिक यांत्रिक योजनेनें नव्हे. त्यांतल्या नाजूक स्प्रिंग आणि रबरी सरंजाची ही करामत आहे. या बैठकीच्या जागेसमोरच कांहीं खास उत्सवप्रसंगीं रात्रीच्या वेळीं गाण्याच्या मैफलीचे जे कार्यक्रम होत ती जागा आहे. राजास बसण्याची स्वतंत्र व अत्यंत ऐटबाज अशी गॅलरी आहे.

येथील राण्यांची ड्रेसिंग रूम पाहिल्यानंतर आम्ही दुसऱ्या एका विभागाकडे चाललों होतों. तेथें रस्त्यांतच एक खोली लागली. तिचें दार बंद होतें. अर्थातच आमचें कुतूहल वाढलें आणि आम्ही तींत काय आहे म्हणून विचारलें; परंतु ती खाजगी खोली आहे, प्रेक्षकांस पाहतां येत नाहीं, असें सांगून गाईडनें ती खोली आम्हांला दाखविण्याचें टाळलें आणि तो आमच्याबरोबरच्या लोकांना माहिती सांगत पुढें निघून गेला. मागें आम्ही तीन-चारच लोक राहिलों होतों. आमच्यांतला एक चांगलाच वस्ताद होता. त्यानें गाईडच्या गैरहजेरीचा फायदा घेऊन ती खोली उघडली आणि आंत पाहतों तों काय? कसली खोली नि कसलें काय. मोठा भव्य दिवाणखाना होता तो. अर्थात् त्याला दिवाणखाना म्हणणें हें तितकेंसें बरोबर होणार नाहीं. तो फक्त दिवाणखान्याएवढा मोठा हॉल आहे एवढेंच. आंत आहे एक मोठें चित्रांचें प्रदर्शन. हीं सर्वच चित्रें कामरसानें ओतप्रोत भरलेलीं आहेत. त्यांची सजावट कांहीं औरच सुंदर आहे. गाईडनें ही खोली कां दाखविली नाहीं त्याचें कोडें आम्हांला हीं चित्रें पाहिल्यावर आपोआप उलगडलें.

दुसऱ्या एका खोलींत येथील अनेक राजेलोकांचे फोटो लावलेले होते. त्यांत हा राजवाडा बांधणाऱ्या राजाचाहि फोटो आहे. या राजाची माहिती सांगतांना गाईड म्हणाला कीं, महाराजांना इतकी शक्ति होती कीं, चांदीचा रुपया हाताच्या दोन्ही चिमटींत धरून ताणला तर त्याची लांब पट्टी तयार व्हायची. मला राजाच्या या अचाट शक्तीचा अचंबा वाटला. आजकालचे आम्ही तरुण फार तर कागदाचा रुपया दोन्ही चिमटींत धरून तोडूं शकूं.

## जनानामहल

जलमहालांत दोन विभाग आहेत. मर्दाना आणि जनाना. पैकीं पहिला मर्दाना महल पाहून झाल्यावर आम्ही दुसऱ्या विभागाकडे वळलों. येथील राणीसाहेबांचें स्नानघर आणि पोहण्याचा हौद पाहण्यासारखा आहे. त्याचप्रमाणें 'भूल भुलैया' हें राजाराणीनें बरोबर स्नान करण्याचें ठिकाणहि प्रेक्षणीय आहे. त्यांत अनेक फसव्या वाटा आहेत. या वाटेनें हौदाच्या ऐन मध्यावर असलेली राणी आणि राजाची बसण्याची जागा आहे. स्नान करणाऱ्या अनेक दासीहि राजा-बरोबर असायच्या. या चक्रव्यूहासारख्या वाटेनें जाऊन जी दासी राजास अगर राणीस प्रथम शिवत असे तीस त्या दिवशींचें राजाचें खास इनाम दिलें जाई.

अशा प्रकारचा हा राजवाडा आहे. त्याचें सर्व वर्णन करूं म्हटलें तर खूप विस्तारानें लिहावें लागेल. पाण्याचे हौद, रंगीबेरंगी फवारे सोडणारें कांचेचें कारंजें, हौदांतून बाहेर पडणारे नानाविध रंगांचे प्रकाशझोत अशा कितीतरी गोष्टी यांत आहेत.

या तळ्यांतच दुसराहि एक प्राचीन जलमहल आहे. कुणा तरी इतिहास-प्रसिद्ध मोगल राजास तेथें कैदेंत ठेवलें होतें म्हणून तो प्रसिद्ध आहे; परंतु तेथें पाहण्यासारखें विशेष असें दुसरें कांहीं नाहीं असें कळल्यानें तो न पाहतांच आम्ही सर्व लोक परतलों व शहरांतील प्रसिद्ध मर्दाना महल जो या तळ्याच्याच कांठावर बांधलेला आहे तो पाहण्यासाठीं गेलों.

## मर्दाना महल

अत्यंत भव्य असा हा राजवाडा आहे. यांतील काचमहल पाहून प्रेक्षक थक्क होतो. जमिनीपासून तों भिंतीच्या छतापर्यंत सर्वच कांहीं सुरेख काचांनीं मढवून काढलें आहे. छतहि साधेंसुधें नाहीं. चांगलें उंच व घुमटाकार आहे. कितीहि वेळ पाहातच राहावें असें दृश्य आंत आहे. मोरचौकांत जाण्यासाठीं येथूनच रस्ता आहे.

## हजारों प्रतिबिंबें

मोरचौकांत चार सुंदर मोठाले मोर आहेत. काचेचेच हे मोर असले तरी हुबेहुब ते मोराप्रमाणेंच रंगीबेरंगी काचेच्या तुकड्यांनीं बनविलेले असल्यानें खूप सुंदर दिसतात आणि या मोरचौकाजवळ एका विभागांत ज्या रंगीत काचांची

करामत केलेली आहे, ती पाहून तर प्रेक्षक देहभान विसरतो. आपण जरा कुठें हाललों कीं, आपलीं हजारों प्रतिबिंबें भोंवतालच्या भिंतींत हलूं लागतात. खरोखरच हें दृश्य अत्यंत मनोहर दिसतें. पाहिल्यावांचून यांतली गंम्मत कळणार नाहीं.

: १० :

## मौंट आबूचें अप्रतिम शिल्प

उदयपुरहून पालनपुर-मार्गानें अहमदाबादला जातांना वाटेंत मौंट आबू स्टेशन लागतें. स्टेशनपासून सुमारें अठरा मैल अंतरावर हें रमणीय स्थान आहे. येथें जाण्यासाठीं स्टेशनवरून बस मिळते. एक रुपया म्युनिसिपल टॅक्स भरावा. लागतो. एक रुपयाच्या आसपास मोटारभाडें आहे. मी एका मालट्रकनें गेलों होतों, त्यामुळें मला असला कर अथवा भाडें पडलें नाहीं आणि रस्त्यानें सृष्टिसौंदर्यहि मनसोक्त पाहतां आलें. अर्थातच पावसाळ्याचे दिवस असल्यानें इतक्या उंच पहाडावर सतत पाऊस आणि पावसाळी हवा असणार हें उघड होतें. त्यामुळें मीं सामान रेल्वेस्टेशनांतच ठेवलें होतें. फक्त अंगावरचे कपडेच काय ते बरोबर होते. स्टेशन सोडतांच दुतर्फा दाट झाडांच्या राईतून जाणाऱ्या सडकेवरून आपली मोटार चालूं लागते. तीन मैल दूर जातांच एक मोठा पूल ओलांडल्यानंतर हें हिरवेंगार घनदाट जंगल सुरू होतें. सरकारच्या जंगलविभागखात्यातर्फे ठिकठिकाणीं माहितीच्या पाट्या लावलेल्या आहेत.मला शिवनेरीच्या पायथ्याला पाहिलेल्या अशा पाट्यांचीच आठवण झाली. त्या पाटीवर एक म्हण तर खूप छान लिहिलेली होती. “ एका झाडापासून लाखों आगकाड्या तयार होतात; परंतु एक आगकाडी लाखों झाडांची राख करूं शकते ! ” “ आपल्या बहुमूल्य राष्ट्रीय संपत्तीचें रक्षण करा. ” अशा अर्थाच्या अनेक पाट्या लावलेल्या होत्या. मधून मधून जंगलाचें क्षेत्रफळ वगैरे आंकडेवारीची माहितीहि दिलेली आहे. खरोखर मौंट आबू येथें केवळ राष्ट्रीय संपत्तीचा सांठाच आहे असें नाहीं तर तें एक राष्ट्रीय तीर्थहि आहे. येथील वनश्रीवर परमेश्वराचा वरदहस्त आहे. वनश्रीच्या

रूपानें प्रत्यक्ष श्रीच अवतीर्ण झाली आहे इथें आणि मनुष्यानेंहि येथें कमाल केलेली आहे. येथील ' देलवाडा ' मंदिर ताजमहलच्या कलाकृतीला कितीदा विकत घेईल असें अप्रतिम सुरेख आहे. हें राष्ट्रीय तीर्थ पाहिल्याखेरीज वन-श्रीच्या सान्निध्यांतील आनंद लुटतांच येणार नाहीं. कर्नाटकांत गिरसप्पाचा धबधबा ज्या घनदाट जंगलांत आहे तें जंगल पाहूनहि मला असेंच वाटलें होतें; परंतु येथील सौंदर्य कांहीं आगळेंच आहे खास !

एका बाजूस उंच पर्वत, दुसरीकडे खोल दरी, मधून अरुंद नागमोडी सडक. तीन-चार हजार फूट उंच चढत जाते आपली मोटार. वानरांचे चीत्कार आणि इतर पशुपक्ष्यांची धावपळ पाहण्यांत मजा तर वाटतेच; पण खरी मौज आहे धुंवयांतून दिसणारा दऱ्याखोऱ्यांचा देखावा पाहण्यांत. एकावर एक वळणें घेत चढत जेव्हां आपण जातों, तेव्हां खालीं खोलच खोल हजारपांचशें फूट लांबी-रुंदीच्या दऱ्या दिसतात. आकाशांतून हजारों पिंजारी जणू कापूसच पिंजीत आहेत खालीं. त्यांच्या कमानीच्या टणत्कारानें चिंधड्या चिंधड्या होऊन उडणारा कापूस हळूच खालीं दरींत पडत होता. हिरव्यागार मखमली गादीवर रानवारा जणू रुईचीं फुलेंच उधळीत आहे असा पाऊस पडतांना पाहून मौज वाटते. केतकीच्या वनांतून हिंडणाऱ्या माणसाप्रमाणें प्रेक्षक धुंद होऊन जातो. हें दृश्य पाहून केतकीवरून आठवण झाली. सापांचा म्हणे तिथें खूप सुकाळ असतो. तसाच इथें दऱ्याखोऱ्यांत वळणें घेतांना मोटार कधींकधीं तर ऐन एखाद्या खोल दरीच्या कड्यालाच जाऊन खेटते. तेथून जरा चार दोन फूट गेली कीं गेलीच ती दोन अडीच हजार फूट खालीं. ड्रायव्हरच्या हातांत आपलें जीवन देऊन बसावें लागतें मोटारींत आणि ड्रायव्हरनें आपलें जीवन सोंपविलेलें असतें परमेश्वराच्या हातांत. या गोष्टीची जाणीव झाली कीं, भीतीनें थरकांटा येतो अंगावर. ड्रायव्हर मोठाच तरबेज माणूस होता. तसाच तो जीवनाविषयीं बेफिकीर होता. मला फोंडा घाटांतील माझ्या अपघाताचीच आठवण झाली इथें. त्यामुळें तर काळजाचें पाणीच झालें माझ्या. मी हळू मोटार चालविण्या-विषयीं ड्रायव्हरला सांगितलें. फ्रंट सीटवरच बसलों होतों मी. ड्रायव्हरनें कारण विचारलें असतां मीं सांगितलें कीं, ' मला भीति वाटते अपघाताची ! ' त्यावर तो खों खों हसत सुटला, आणि म्हणाला, "बस? एक वेळेंत घाबरलेत तुम्ही? मी तर उभें आयुष्य घाटानें येण्याजाण्यांतच खर्च केलें आहे. अरे बाबूजी, संभालनेवाला तो भगवान् है भगवान्

मैं क्या संभालूँ किसी को ?" "वा साहेब !" मी म्हणालों, "छान आहे. तर मग आणखी थोडी जोरांत चालवा मोटार !" आणि खरोखर त्यानें मोटार त्या घाटाच्या रस्त्यांतूनहि अशी कांहीं जोरानें काढली म्हणतां, कीं जर अपघात झाला असता तर परमेश्वरहि आम्हांला वांचवायला येवढ्या जोरानें धावत येऊं शकला नसता.

अशा प्रकारें कांहीं आनंद तर कांहीं भीति यांच्या संमिश्र मनःस्थितींतच मी हा अठरा मैलांचा घाट चढून वर आलों. घाटाची मुख्य चढण संपली होती. उजव्या बाजूस अजूनहि एक अति कराल दरी होती. डावीकडे उंच शिखर. तेथें एक हनुमानाचें मंदिर आहे. मंदिर छोटेंच आहे. ड्रायव्हरमहाशयांनीं चालू गाडींत स्टिअरिंगवरील हात सपशेल काढून घेऊन, ते जोडून अगदीं भक्तिभावानें डोळे झांकून, मान वांकवून प्रणाम केला हनुमानजीस. मला त्याच्या या विलक्षण परमेश्वर-भक्तीचें कौतुक तसेंच आश्चर्यहि वाटलें. चालू गाडी, घाटाचा रस्ता, याचें त्याला भानच नव्हतें जणू.

## दीडशें कोटींची कलाकृति !

मौंट आबूच्या माथ्यावर आपण जाऊन पोंचलों कीं, एखाद्या शांत, रमणीय शहरांत जाऊन पोंचल्यासारखेंच वाटतें. खरें म्हणजे हें शहरहि नाहीं आणि खेडेंहि नाहीं. कारण घरें मोठमोठीं शहरांतील अद्ययावत् बंगल्यांसारखीं आणि वस्ती आहे विखुरलेली. त्यामुळें शहरबाजारांतली गर्दी इथें नाहीं आणि खेड्यांतलीं दरिद्री चंद्र-मौळी घरेंहि दिसत नाहींत. येथून तीन मैल अंतरावर एका पर्वतांत आहेत तीन जैनमंदिरें. इ. सन अकरा ते तेराच्या दरम्यान हीं मंदिरें बांधलेलीं आहेत आणि अक्षरशः कोडों रुपये खर्चून तीं बांधलीं आहेत. अर्थातच त्या काळच्या मानानें हल्लीं चार ते पांच पट तरी महागाई वाढलेली आहे. नऊशें वर्षांपूर्वीचे चाळीस कोटी रुपये हल्लींच्या दोनशें कोटी रुपयांइतक्या किंमतीचे आहेत. यांपैकीं एक मंदिर साडेअठरा कोटी रुपये खर्चून; तर दुसरें साडेबारा कोटी आणि तिसऱ्यांतलीं केवळ दोन गोत्रेंच कांहीं लाखांचीं आहेत. तेव्हां हा आंकडा अतिशयोक्तिपूर्ण आहे असें कोणी म्हणणार नाहीं. उलट पन्नास कोटींनीं तो कमीच दिलेला आहे.

## देलवाडा-मंदिर

हें आदिनाथ ऋषभदेवाचें मंदिर आहे. ऋषभदेव हा जैनांचा देव. गुजराथचा राजा भीमदेव, विमलशाहा हा भीमदेवाचा प्रधान होता. खूप श्रीमंत होता तो.

त्यानेंच सन १०३१ मध्यें हें मंदिर बांधलें आहे. बांधकामासाठीं एकूण खर्च रु. १८,५३,००,००० इतका झाला. विमलशाहानें बांधलेलें हें मंदिर नंतर त्यानें जैन-धर्मीयांच्या संघास अर्पण केलें. बाहेरून अगदींच सामान्य प्रतीचें दिसणारें हें मंदिर आंत जाऊन पाहतांच प्रेक्षक थक्क होऊन जातो. अक्षरशः मायानगरींतच प्रवेश केल्यासारखें वाटतें. पाहणारा देहभान विसरतो.

प्रवेशद्वारांतून आंत प्रवेश करतांच समोर अनेक सुरेख कमानी दिसतात. चोहों बाजूंस अतोनात खांब आहेत. मध्यभागीं ऋषभदेवाचें मंदिर असून भोंव-तालीं पन्नासहून अधिक मंदिरें क्रमवार बांधलेलीं आहेत. नजर जाईल तिकडे पांढऱ्याशुभ्र गुळगुळीत संगमरवरी दगडावर सुरेख शिल्पकाम केलेलें दिसतें. हीं पन्नास-पंचावन्न मंदिरें, शेंकडों दगडी खांब, अनेक सुंदर कमानी, फरशी, छत, भिंती सारें कांहीं मौल्यवान् संगमरवरी दगडाचेंच आहे आणि शिल्पकृतीला तर तोड नाहीं. एक जैन प्रवासी हें मंदिर पाहून थक्क झाला. त्यानें अनेक देशांचा प्रवास केलेला होता. तो म्हणाला, " इतकें विपुल आणि सुरेख शिल्पकाम मीं जगांत कुठें पाहिलें नाहीं." मींसुद्धां अशा सुंदर दगडांवर कोरलेलें एवढें विपुल शिल्पकाम भारतांत कुठेंच पाहिलें नाहीं. इंच न् इंच जागेवरून कलावंताची छिन्नी फिरली आहे. कांहीं ठिकाणीं छतावरील कोरीव काम अक्षरशः मधाच्या पोळ्यापेक्षांहि जास्त नाजूक व सुरेख असें आहे. यांतल्या कांहीं मूर्ति तीन तीन हजार रुपये किंमतीच्या आहेत. माणसाचें नख जितकें पातळ व तीक्ष्ण असतें ( मुद्दाम वाढवलेलें नख ) तितकें आणि हुबेहुब तसेंच नखसुद्धां तयार करण्याइतकी खबरदारी मूर्तीच्या कोरीव-कामांत घेतलेली आहे. चेहऱ्यावरचे भाव कॅमेराहि चित्रित करूं शकणार नाहीं इतके हुबेहुब आहेत. सर्वच कांहीं अवर्णनीय सुंदर आहे. मला कितीदा आश्चर्य वाटतें अशा कांहीं गोष्टी पाहून कीं आपण चंद्रावर जाण्याचें ठरवीत आहोंत. ख्रुश्चेवसाहेबांची तर महत्त्वाकांक्षा अशी जबर आहे कीं, ते त्याच्या हयातींत सूर्यमालेंतील सर्व ग्रहगोलावर विळाहातोड्याचें निशाण पोचलेलें पाहूं इच्छितात. अर्थातच मीं अजून रशिया पाहिला नाहीं आणि रशियन सिनेमाहि फारसे पाहिले नाहींत; परंतु भारतीय चित्रपटनिर्मात्यांना एक कळकळीची विनंती करावीशी वाटते.

## असे सिनेमा असले तर !

सिनेमाइतकें प्रभावी आणि परिणामकारक असें शिक्षणाचें दुसरें कुठलेंच साधन नाहीं, असा माझा ठाम समज आहे. भारतांतील अशा अद्वितीय सुंदर कलाकृति, प्रेक्षणीय अशीं वनश्रींनीं गजबजलेलीं जंगलें, पर्वत, दऱ्या, आकाशांतील ग्रहगोलांची माहिती, देशोदेशींचें लोकजीवन व अशीच विविध स्वरूपाची मनोरंजक आणि उद्बोधक माहिती देणारे चित्रपट जर तयार झाले, तर केवढा फायदा होईल ? शेंकडों, हजारों शिक्षकांना एक महिन्यांत शिकवून जें विद्यार्थ्यांच्या पचनीं पाडतां येणार नाहीं एवढें ज्ञान आणि काम तीन तासांत एका थिएटरमार्फत देतां येईल आणि पचनीं पाडतां येईल. एखाद्या कल्पक नि साहसी निर्मात्यानें निदान एक प्रयोग म्हणून तरी असा चित्रपट काढल्यास मला नाहीं वाटत तो अयशस्वी होईल म्हणून. अर्थातच जेवढीं कांहीं जैनमंदिरें आहेत त्यांतील जीं सर्वोत्कृष्ट दर्जाचीं आहेत तिथें तिथें फोटो घेण्याची मनाई असल्यानें मी त्यांचे फोटो वाचकांपर्यंत पोंचविण्यास असमर्थ ठरलों आहें; परंतु तसा प्रयत्नच केला गेला तर तें कांहीं फारसें कठीण काम नाहीं. नाहीं तर आज या क्षेत्रांत काय चाललें आहे ? माकड-चेष्टा आहेत झालें सगळया !

## आजकालचे सिनेमा

एक ती आणि एक तो. दोघांची होते ओळख, नंतर होतें प्रेमांत रूपांतर त्या ओळखीचें. पुढें कांहीं तरी खटकतें आणि प्रेमांत विघ्न येतें. प्रेमवासना अनावर होते. ते गैरसमज दूर होऊन दोघांचें जमतें आणि सिनेमा संपतो. थोड्याफार फरकानें हेंच पाहण्यासाठीं हजारों लोक लाखों रुपये खर्चून रोज कां सिनेमा पाहतात हेंच मला कळत नाहीं. तो फरकहि सांगून टाकतो. एक ती आणि दोन ते, बाकी सारें वरील-प्रमाणें. थोडा आणखी यांत फरक राहिला. या दोन तेपैकीं एकाचें तिच्याबरोबर जमतें व एक आत्महत्या करून मोकळा होतो. हेंच कथानक उलटसुलट करतां येतें. राजनीति अवघड आहे. गेल्या बारा वर्षांपासून मी अभ्यास करतों आहें तिचा, परंतु अजून पाहिजे तेवढी समजत नाहीं; पण मला आपलें वाटलें म्हणून सांगतों. या अशा कांहीं कमअक्कल निर्मात्यांचा सर्व पैसा सरकारनें सरळ ताब्यांत घ्यावा आणि सिनेमा कसा असूं शकतो याचें एक छानदार प्रात्यक्षिक त्यांना दाखवून

घडा शिकवावा; पण सरकारला हा धडा कोण शिकविणार ? हा प्रश्नच आहे. मांजराच्या गळ्यांत घंटी बांधायला सांगणाऱ्या शहाण्या उंदरांच्या कथेसारखीच ही अक्कल आहे. आहे ना ? म्हणून मी म्हणतों राजनीति कठीण असते, तें या अर्थानें. जाऊं द्या हें; पण सरकारचाच दोष नाहीं सगळा; आपल्या प्रेक्षकांचाहि आहेच. उठल्यासुटल्या सरकारी धोरणावर तोंडसुख घ्यायचें हा कांहीं निरुद्योगी लोकांचा उद्योगच होऊन बसला आहे. मी त्या मार्गाचा अवलंब करीत नाहीं; पण जी राजनीति एवढी अवघड ती न समजतांहि जरा कुठें खुट्ट झालें रे झालें कीं संप, हरताळ, मोर्चा, निषेध, काम बंद, धंदा बंद, गिरणी बंद, मोटार बंद आणि मेंदूहि बंद! काय हें ? या निर्मात्यांविरुद्ध जर बहिष्काराची एकच जोरदार मोहीम उभारली तर जादूची कांडी फिरल्यासारखा गुण येईल; पण हें करतो कोण ? मीं एक रशियन फिल्म पाहिली होती. ‘ फॉल ऑफ बर्लिन ’ ? बर्लिनचा पाडाव ! किती सुंदर होती म्हणून सांगूं ! आहे असा स्वातंत्र्यसंग्रामावर एखादा छानदार चित्रपट. याबाबत पुष्कळ लिहावेंसें वाटतें; परंतु झालें एवढेंच विषयांतर पुरे आणि निर्माते व आजकालचे सिनेमाशोकीन नाराज व्हायचे ! तेव्हां हें येथेंच संपवितों. आतां दुसरी एक गोष्ट पाहा.

## अंधश्रद्धा कीं आत्मविश्वास

देलवाडा मंदिरांतलीच ही गोष्ट. मंदिराच्या सौंदर्याचें वर्णन केलेंच आहे, भिंतीवरील व छतावरील कोरीव कामाचें निरीक्षण करीत मी चाललों होतों. आकाशांतील ताऱ्यांचें निरीक्षण करीत वर पाहात चालणाऱ्या ज्योतिषाच्या गोष्टीप्रमाणेंच झालें माझें. तो विहिरींत पडला आणि मीं सापावर पाय दिला, एवढाच काय तो फरक. पायाला थंडगार गिळगिळीत लागलें कांहींतरी; पण दिसलें मात्र नाहीं. फरशीहि अशीच थंडगार नि गुळगुळीत आहे. तेव्हां म्हटलें असेल फरशीच. भ्रम झाला असेल; परंतु थोड्याच वेळांत गाईड ओरडत आला, “ अरे बच्चे लोक, अंदर मत जाव! साँप है, जल्दीसे बाहरसे देखो ! ” सापाचें नांव ऐकतांच मी चरकलों. त्याचें नांव ऐकून असा मी नेहमींच चमकत असतों म्हणा. कारण आहेच ती तशी वल्ली. सरळ धूम ठोकली मी बाहेर आणि पाय न्याहाळून पाहूं लागलों. कुठें चावला तर नाहीं ना ? चौकशीअंतीं कळलें कीं, हा साप येथेंच राहतो. रोज देवाला दाखविल्या जाणाऱ्या दुधाच्या नैवद्यावर तो आपला उदरनिर्वाह करतो. तो

अव्वल विषारी असला तरी कधींच कुणाला चावत नाहीं. असें कळल्यावर मला अश्चर्य वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आचार्य विनोबा भावे यांचाच शिष्य ! हा येथील पुजारी असावा असेंच वाटलें. सर्पाबद्दल त्यांच्याहि अशाच विचाराच्या कांहीं गोष्टी मीं ऐकल्या आहेत.

## लुणवसहि मंदिर

भगवान् नेमीनाथाचें हें मंदिर. गुजराथचा राजा वीरधवल याचा प्रधान शेठ वस्तु-पाल तेजपाल यानें सन १ २ ३ १ मध्यें बांधलें.बांधकामाचा खर्च १ २,५ ३,० ०,० ० ० रुपये झाला. ऋषभदेवाच्या मंदिरांत आणि यांत पुष्कळ साम्य आहे. मुख्य मंदिर, अश्वशाला, भोंवतालचीं लहान मंदिरें, शिल्पकाम वगैरे सर्व कांहीं अप्रतिम आहे. ऋषभदेवाच्या मंदिरापेक्षां हें किंचित् लहान वाटतें एवढाच काय तो फरक.

तिसऱ्या नंबरचें देवालयहि असेंच आहे. एक दुसऱ्याची ते प्रतिकृतिच वाटते. याच मंदिरांत तीं 'गोखरें' आहेत. त्यांच्यासंबंधीं असें सांगतात कीं, हीं नऊ वेळां पूर्ण करून प्रत्येक वेळीं तोडून टाकण्यांत आलीं. थोडा दोष राहिला कीं तें तोडलें जाई. अखेरच्या वेळीं तें निर्दोष आहे असें आढळून आल्यावर ठेवलें. ऐशीं ते नव्वद लक्ष रुपये केवळ याचाच खर्च झाला. इतर खर्चाचा आंकडा येथें कुठेंच पाहावयास मिळाला नाहीं; परंतु नंबर दोनच्या म्हणजे नेमीनाथाच्या मंदिराहून तें कमी सुंदर खास नाहीं.

अशा प्रकारचीं क्रोडों रुपये खर्चून बांधलेलीं हीं मंदिरें आणि त्यांवरील शिल्पकृति पाहून आपण बाहेर आलों कीं, एक साध्या दगडाचें परंतु अत्यंत प्रचंड मंदिर दिसतें.

## केवळ हातसफाई

कलावंताच्या केवळ हातसफाईतहि जादुगाराप्रमाणें केवढी सफाई असते याची खरी कल्पना हें मंदिर पाहून येते. कलेची किंमत कळते. मुख्य तिन्ही मंदिरांपेक्षांहि भव्य असें हें मंदिर आहे. फावल्या वेळेंत हात साफ करण्यासाठीं छिन्नी चालवून जी शिल्पकृति निर्माण झाली त्यांतूनच या मंदिराची निर्मिति झाली. केवळ हें मंदिरच प्रेक्षणीय आहे असें वाटतें; परंतु कला ही कांहीं आगळीच चीज आहे, हें देलवाडा मंदिर पाहिल्याशिवाय कळत नाहीं. ती साक्षात् तेथें अवतरली आहे. बाहेर पडतां पडतां सहज एक विचार मनांत येऊन गेला. एक काळ असाहि होता कीं, मंदिरा-

सारख्या गोष्टींतहि कोटीकोटींचें भांडवल खर्च करणारे राजे-प्रधान होऊन गेले. एक अर्थानें ही केवढी मोठी चूक! परंतु लागलीच दुसरा विचार मनांत आला. छे! यांत कांहींच चूक नाहीं. हीं मंदिरें पाहून आज शेंकडों वर्षें निदान प्रेक्षकांस आनंद तरी मिळाला आणि शेंकडों वर्षें पुढेंहि मिळेल; परंतु हल्लीं शस्त्रास्त्रांपायीं जो कोटी-माप पैसा उधळला जातो त्याचें काय? इंग्लंड, अमेरिका, रशिया अशीं राष्ट्रें तर अक्षरशः दरसाल क्रोडों रुपये युद्धसाहित्यावर खर्च करतात. सुदैवानें युद्ध झालें नाहीं तर? हें सर्व व्यर्थच जाणार कीं नाहीं? आजपासून शंभर वर्षांनीं जर कोणी माणूस माझें हें पुस्तक वाचील अगर रशिया-अमेरिकेचें बजेट तपासील तर तो काय म्हणेल? विसाव्या शतकांतील महामूर्ख माणसानें क्रोडों रुपये पाण्यांत घातले, आजचे शस्त्रपंडित उद्यांचे वायफळ लोक ठरतील. कदाचित् हे दिवस याहीपेक्षां लवकरच येतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

: ११ :

# गिरनारच्या सिंहप्रदेशांत

प्रवासाची माझी उत्कट आवड पाहून माझे कांहीं मित्र पुष्कळदा मला म्हणतात, "काय आहे प्रवासांत एवढें मोठें? तींच झाडें, तींच माणसें, तीच घरें, तीच जमीन. जगभर फिरून आलेलीं माणसें शेवटीं आश्रम थाटून त्यांत राहिलीं." माझे हे मित्र चांगले सुशिक्षित आहेत, विद्वान् आहेत. अर्थातच त्यांच्यापुढें मी प्रवासाचें समर्थन करीत बसत नाहीं. आश्रम थाटणारीं माणसेंसुद्धां पूर्वी जगभर फिरलीं. नानाविध अनुभव जमा करून मगच पुस्तकांच्या साहाय्यानें अभ्यास, चिंतन, मनन, लेखन वगैरेंसाठीं आश्रमांत राहिले. त्यांच्याच आरोपांत माझें उत्तर आहे. अशा या माझ्या मित्रांची आठवण मला प्रवासांत कधीं कधीं होत असते आणि अशीं कांहीं प्रेक्षणीय स्थळें पाहतांना तर ती हटकून होते. मी गिरनारच्या जंगलांत भटकत असतां

मला त्या भागांतील लोकांकडून कळलें कीं, सिंहाची नैसर्गिक सहणी, त्याची चाल-चलणूक जवळून प्रत्यक्ष पाहण्यासाठीं पं. जवाहरलाल नेहरू हे चार दिवस या जंगलांत राहिले होते. एका उंच मचाणावर बसून त्यांनीं चार दिवस एवढा प्रदीर्घ वेळ केवळ या छोट्याशा दिसणाऱ्या कामांत खर्च केला आणि त्या कालांत सर्व लवाजम्याचा चार लक्ष रुपये खर्च झाला. एक एक सेकंद ज्या व्यक्तीचें लाख मोलाचें आहे अशा व्यक्तिहि अशा कामांत इतका रस घेतात, यावरून मी फिरतों ही गोष्ट बरोबर कीं चूक? या प्रश्नाचें उत्तर आपोआप त्या माझ्या मित्रांना मिळायला हवें. सांगण्याचा हेतु इतकाच कीं, वरवर सत्य वाटणारें माझ्या मित्रांचें विधान हें चुकीचें कसें आहे हें लक्षांत यावें. गिरनारविषयीं इकडे एक म्हण प्रसिद्ध आहे. ती अशी—

**" जो जोई नहीं सोरठ धरा न चढ्या गढ गिरनार**
**नायो नहीं नीर गोमती एने एळें गयो अवतार "**

गिरनारच्या आसमंतांतील प्रदेश इतका सुंदर आहे कीं, तो ज्यानें पाहिला नाहीं, तसेंच गिरनारहि इतका सौंदर्यसंपन्न आहे कीं, तो गड जो चढला नाहीं त्याचें जीवन ज्याप्रमाणें पवित्र गंगा-गोमतीमध्यें ज्यानें स्नान केलें नाहीं, त्याचें जीवन व्यर्थ असतें तसें व्यर्थ होय.

## धुक्याच्या साम्राज्यांत

पावसाळ्यांत गिरनारवर चढाई करणें म्हणजे एक अनन्यसाधारण आनंद प्राप्त करून घेण्यासारखें आहे. तुषारांच्या धुक्यांतून शेंकडों फूट उंच जावें लागतें. शेंकडों पायऱ्या चढाव्या लागतात आणि प्रवासी वीसबावीसशें पायऱ्या चढून वर गेल्यानंतर अपूर्व आणि सुंदर अशा ठिकाणावर जाऊन पोंचतो. तीन हजार फूट उंचीवर गेल्यावर तो आकाशाला पोंचल्यासारखा होतो नि त्याचा आनंद खरोखरीच गगनांत मावेनासा होतो. मात्र हा स्वर्गप्राप्तीचा आनंद प्राप्त करण्यासाठीं आपल्याला श्रीगुरुदत्तात्रयाच्या शिखरापर्यंत जावें लागतें. अक्षरशः हजारों पायऱ्या चढाव्या लागतात.त्या मोजून मोजून मोजाव्यात तरी किती? नऊ हजार, नऊशें नऊ अशी त्यांची संख्या आहे, असें येथील रहिवासी सांगतात. अर्थातच ही संख्या बरोबर असावी. सात-आठ हजार पायऱ्यांपर्यंत तर त्यांचे आंकडे जागजागीं लिहिलेले आहेत. पुढेंहि ते लिहि-लेले असणार; परंतु भोंवतालच्या दृश्याकडेच सर्व अवधान खेंचलें गेल्यामुळें ते

वाचतां आले नाहींत. पायऱ्यांच्या संख्येंतील नऊ हा आंकडा अर्थपूर्ण आहे. तीनदा नऊचाच आंकडा आहे. नवनाथांपैकीं गोरखनाथ वगैरेंचीं नांवें असलेलीं शिखरें येथें आहेत. तशींच जैनमंदिरें आहेत. हिंदूंचींहि आहेत. भर्तृहरीनें वैराग्य घेतल्यावर ज्या गुहेंत तपश्चर्या केली ती गुंफा आहे. पुष्कळ प्रेक्षणीय ठिकाणें आहेत. तीं आपण शिखर उतरतांना पाहणारच आहोंत.

## श्रीगुरुदत्ताचें शिखर

हें सुमारें चार हजार फूट उंच आहे. तेथून खालीं, वर, समोर, मागें जिकडे पाहावें तिकडे आकाशच आकाश पसरलेलें दिसतें. दशदिशांत शून्याखेरीज कांहींच दिसत नाहीं. थंडगार ओली हवा, पिसाट पावसाळी चावरा वारा आणि धुकेंच धुकें. धुक्याचेंच साम्राज्य चोहोंकडे. आकाशभ्रमण करणाऱ्या स्वर्गीय देवदेवतांच्या नि गंधर्वांच्या अनेक कथा मीं लहानपणीं ऐकल्या होत्या. त्यांतला प्रत्यक्षच आनंद आज लुटीत होतों. सातआठ फूट व्यासाच्या एका लंबवर्तुळाकार शिखराच्या शेंड्यावर आपण उभे आहों या गोष्टीवर विश्वास बसत नाहीं. येथें एक छोटेसें मंदिर आहे. गुरुदत्ताच्या पादुका त्यांत आहेत. हें मंदिर अवघें चार फूट उंचीचें आहे. एका मजबूत लोखंडी दांड्यास टांगलेली एक प्राचीन प्रचंड घंटाहि आहे. पावसाळी हवेपासून बचाव करणारी खास शेगडी घेऊन एक साधुमहाराज फक्त ध्यानस्थ होऊन डोळे मिटून बसले होते. अंगावर लोकरीचीं अतोनात लक्तरें होतीं त्यांच्या. मला तर भीतिच वाटली त्यांची. कारण जर त्यांची समाधि भंग पावली तर ? मी हळूच दत्ताच्या पादुकांजवळ गेलों, दर्शन घेतलें आणि माझ्या मित्रानें साधूची समाधि मोडली. डोळे किलकिले करून साधुमहाराजांनीं मला चांगलें निरखून पाहिलें आणि माझ्या मित्रालाहि. " नीचे भोजनका प्रबंध है। भोजन करके जाना।" एवढें सांगून पुन्हा आपले डोळे मिटून ते शांत बसले. साधुमहाराज नुसतेच नामधारी साधु नव्हते. त्यांचें शरीर सांगत होतें कीं, ते सच्चे ब्रह्मचारी आहेत. एवढा तेजस्वी माणूस मीं नाहीं पाहिला अजून कोठें. त्यांच्या पुढें दागदागिन्यांचा नुसता ढीग पडला होता. चौकशीअंतीं कळलें कीं, उन्हाळ्याच्या नि हिंवाळ्याच्या दिवसांत शेंकडों भाविक लोक श्रीगुरुदत्ताच्या दर्शनार्थ येथें येतात. ते आपल्या अंगावरील मौल्यवान् दागदागिने दत्तचरणीं अर्पण करून जातात. पावसाळ्यांतहि चुकले भटकलेले माझ्यासारखे कांहीं प्रवासी थेट एवढ्या उंचीपर्यंत येतात.

## तो अविस्मरणीय क्षण

पूर्व दिशेकडे मी पाहात उभा होतों. निश्चित दिशा सांगणेंहि कठीण. परंतु माझ्या समजुतीप्रमाणें ती पूर्वदिशा मी मानीत होतों. पाहात होतों. नाना विचारतरंग मनांत उठत होते. गैरसावधपणांत वाऱ्यानें उडून जाऊं नये म्हणून घंटा ज्या मजबूत लोखंडी दांड्यास बांधलेली होती त्याला विळखा मारून उभा होतों. यांत चूक होता कामा नये. वाऱ्याचा वेग असा कांहीं असतो कीं, रुमालाप्रमाणें माणसाला हवेंत भिरकावून देण्यास त्यास कांहींच प्रयास करावे लागणार नाहींत. एवढी खबरदारी घेण्याइतकेंच माझें चित्त ठिकाणावर होतें. एरव्हीं तें या अनंत आकाशांत सारखें विचारांबरोबर भिरभिरत होतें. ज्या सुळक्याच्या उन्नत शेंड्यावर मी उभा होतों तो नुसता सुळकाच निदान हजार फूट उंचीचा होता. निसर्गनिर्मित उत्तुंग मनोरा. कधीं नाहीं ते विचार मनांत गर्दी करूं लागले. खरोखर मनुष्यजीवनाचा उद्देश काय बरें असावा? असा एक आजपर्यंत मानवी बुद्धीच्या टप्प्याबाहेर कुठें तरी दडून बसलेलें ज्याचें उत्तर आहे असा यक्षप्रश्न माझ्या मनांत आला. कांहीं उत्तर सांपडेना त्याचें. एक उत्तर सांपडलें. अशाच कैलासतुल्य शिखरावर, हिमालयाच्या माथ्यावर, सागराच्या लाटेवर, वाऱ्याच्या झोक्यावर, ऊन्ह, वारा, थंडी, पावसांत हिंडावें, फिरावें हाच प्रश्न जेथें तेथें मनाला विचारावा. त्याचें उत्तर तेथें मिळेलच मिळेल. मला येथें जीवनांतहि परमानंद वाटत होता. मृत्यूबद्दलचें कुतूहल इतकें वाढलें होतें कीं, तो त्या क्षणीं आला असता तरी मला माझी एक मोठी महत्त्वाकांक्षा सफल झाल्याचें समाधान वाटलें असतें. या अनंत अवकाशांत, शून्यांत, आपणहि शून्यरूप धारण करून मिसळून जावें आणि या सृष्टीच्या रहस्याचा शोध घ्यावा, असें मला वाटल्यावांचून राहिलें नाहीं. छे! असें मुळींच नाहीं वाटलें. वर्णन करण्याच्या पलीकडची अवस्था होती ती मनाची.

माझ्या आयुष्यांत असाहि एक क्षण येऊन गेला आहे कीं, त्या वेळीं मी आत्महत्या करण्यास निघालों होतों. परंतु जीवनाविषयीं तीव्र लालसा होती. मृत्यूची भयानक भीति वाटत होती; परंतु जगण्यास असमर्थ होतों. म्हणून पसंत केला होता. त्यांतून परमेश्वरानें सांथ दिली मला. मी वांचलों. तो परमेश्वर हयात आहे. तुम्हां-आम्हांत राहतो; परंतु तुम्ही त्याला यःकश्चित् माणूस म्हणाल म्हणून मी त्याचें नांव सांगत नाहीं. ती अवस्था गेली, जगण्याच्या अनेक कला आज माझ्याजवळ आहेत. परंतु म्हणून कीं काय त्यांतलें

महत्त्व मला वाटेनासें झालें आहे, नव्हे झालें होतें. श्रीगुरुदत्ताच्या या शिखरावरील तोच तो क्षण. जेव्हां धुक्याचा दाट पडदा फाडून तीक्ष्ण सोनेरी पात्याप्रमाणें एक-दोन सूर्यकिरणें घुसलीं, तीं थेट भूतलापर्यंत जाऊन पोंचलीं आणि मीं खालीं पाहिलें. आकाशाच्या खिडकींतून खालीं पाहिल्यासारखें वाटलें मला. अपूर्व, सुंदर, अद्भुत-रम्य, पूर्ण पाहूंहि शकलों नाहीं. तोंच एका प्रचंड धूसर ढगानें आपल्या देहाचें दाट पांघरूण त्यावर टाकलें. एखाद्या अभागी निपुत्रिक स्त्रीनें कुणाच्या कडेवर एखादें सुंदर गोंडस मूल पाहावें आणि त्याला दृष्ट होईल या भीतीनें त्याच्या मातेनें क्षणार्धांत त्याला आपल्या पदरांत दडवावें, अशाच चपलतेनें धावलेल्या त्या ढगांनीं माझ्या दृष्टीपुढून तें सुंदर दृश्य झट्कन उचलून घेतलें. मी पाहातच उभा राहिलों.

## श्रीगुरुदत्तात्रयाचा मित्र

जेव्हां मी येथून परत फिरलों तेव्हां माझा मित्रहि माझेबरोबरच परत फिरला. इतका वेळ तो साधुमहाराजांच्या धुनीजवळ पायांत डोकें घालून बसला होता. एक-वार भोंवतालच्या दृश्यावर—म्हणजे निळ्या-पांढऱ्या धुक्यावर—नजर फिरवून मी परतलों तेव्हां मित्रानें माझ्या पायांत लुडबुड करायला सुरुवात केली. थंडीनें पुरता कांकडून गेला होता. धुनीजवळ बसला तरी बिचाऱ्याला ऊब पुरती आली नाहीं. कारण ऊब यायला त्याच्या अंगावर कपडे होते कुठें ? हा मित्र म्हणजे दुसरातिसरा कुणी नसून दत्ताचा सहचारीच होता. गाई आणि कुत्रे नाहींत असा तिथें दत्ताचा फोटोहि दिसत नाहीं. तांबड्या रंगाचा हा कुत्राच माझा दोस्त बनला होता. तीन हजार फुटांपेक्षांहि अधिक उंचीवरील गोरखनाथाच्या शिखरापासून जेव्हां सर्व सहप्रवाश्यांनीं माझी साथ सोडली तेव्हां हा धावून माझ्या मदतीला आला आणि त्यामुळेंच मला एकट्याला पुढें जाण्याची हिंमत झाली. नाहीं तर होती ना. केवळ सातआठ पायऱ्या पुढें व तेवढ्याच मागें. बाकी सर्व आकाश. कशी हिंमत होणार मग ? या माझ्या मित्राबरोबर मी गोरखनाथाच्या शिखरापर्यंत पुन्हा उतरून आलों. वाटेंत साधुजनांच्या भोजनाचा प्रसादलाभ झालेलाच होता. एकट्या माणसास कोणत्याहि रूपानें दत्तात्रयभगवान् दर्शन देतात, अशी इकडील धार्मिक लोकांची श्रद्धा आहे. मीं ही गोष्ट सहज कांहीं लोकांजवळ काढलीं असतां त्यांनीं मला परम भाग्यवान् ठरविलें. कारण " ते साधु कुणाशींच कधींहि कांहीं बोलत

नाहींत. ते बोलले व त्यांनीं तुम्हांला प्रसाद घ्यायला सांगितला म्हणजे प्रत्यक्ष त्यांच्या रूपानें दत्तगुरूनें दर्शनच दिलें तुम्हांला ! " असें ते म्हणाले. मलाहि आनंद वाटला. कारण मीं जेथें जेवण केलें त्या ठिकाणीं दुसरे एक साधुहि असेंच म्हणाले होते व त्यांनीं मला परत भेटण्याचा सल्ला दिला होता. ते साधु मला पुढें असेंहि म्हणाले कीं, " त्यांच्यापासून तुम्हांला फार लाभ होईल. ते प्रसन्न झाले तर संपत्तीला तोटा नाहीं. चिलमींतसुद्धां ते हिरे वापरतात ! " अर्थातच जों-पर्यंत पुन्हा मी गिरनार पर्वतावर जात नाहीं तोंपर्यंत साधुमहाराजांची भेट होऊं शकत नाहीं आणि मी पुन्हा गेलों तरी ते तेथें भेटणार नाहींत. कारण ते नेहमीं हिमालयांत राहतात असें मला कळलें होतें. तेव्हां त्या संपत्तीची हांव मीं सोडलेली आहे हें सांगणें नकोच.

## पूर्वजांची भेट

एक गोष्ट सांगण्याची राहिलीच. भर्तृहरीच्या गुहेपासून आपण थोडें पुढें गेलों कीं, आपली ही पूर्वजमंडळी भेटते. गिरनारवर वानरें फार आणि तींहि खाऊन-पिऊन चांगलीं पुष्ट झालेलीं. हनुमानाची सेनाच ती. कुठलाच खाद्यपदार्थ ते नाहीं जाऊं देत पर्वतावर. अगदीं झडतीच घेतात आपली म्हणा ना. प्रवाश्यानें स्वखुशीनें त्यांना कांहीं दिलें तर ठीक. नाहीं दिलें तर ते घेणारच हें ठरलेलें. शहरांतील वस्तूंच्या किंमतीपेक्षां निदान तीन-चार पट अधिक किंमती पर्वतावर खाद्यपदार्थांच्या पडतात. तेव्हां मीं एक-दीड डझन केळीं, कांहीं ओले बदाम आणि इतर खाण्याचे जिन्नस घेतले होते. या मंडळीला चाहूल लागली आणि मग काय, कसले फराळ नि कसलें काय? सावज सांपडल्यानें मोठ्या आनंदानें ऐटींत डोलत आपल्या शेपटीचें छत्र माथ्यावर धरून माझ्या मागें आले. मी कावराबावरा होऊन त्यांना पाहात होतों आणि डोळे किलकिले करून ते मला. शेवटीं मी थकलों, किंबहुना त्यांच्या नज-रेला नजर लावण्याची हिंमत खचली. त्यामुळें खालीं पाहात तसाच चाललों. आला एक पुढें आणि सरळ माझ्या हातांतली पिशवी घेतली काढून. केळीं तर मी स्वखुशी-नेंच वांटून दिलीं. तरीहि कांहीं मंडळीस वांटणी बरोबर न मिळाल्यानें नाराज राहिलीच. झडती घेतली त्यांनीं; परंतु शिल्लकच होतें कुठें काय ? अशा प्रकारची ही आपली पूर्वजमंडळी येथें प्रवाश्यांस बरीच नाडतात. मात्र खोडी केल्याशिवाय दुसरा कांहीं उपद्रव ते देत नाहींत हीच भाग्याची गोष्ट. घेतां काय त्यांचें ?

## लोकनृत्य

राजस्थान आणि सौराष्ट्र या दोन्ही प्रांतांत लोकनृत्य आणि गीतें यांचे सामुदायिक कार्यक्रम मीं अनेक पाहिले. विशेशतः सौराष्ट्रियन स्त्री ही स्वतंत्र वृत्तीची असल्यानें किंवा तिला स्वातंत्र्य मिळत असल्यानें ती नृत्यांत खूप प्रवीण असते. नृत्यांतील तिचें हावभाव पाहून आश्चर्य वाटल्यावांचून राहात नाहीं. प्रख्यात नर्तिकेला लाजवतील अशा कांहीं स्त्रिया मीं पाहिल्या आणि त्यांचें नृत्य हें निर्मात्याच्या चाकोरींतून आणि दिग्दर्शकाच्या कृत्रिम नखऱ्यापासून अलिप्त असल्यानें तें सहजसुलभ व जिवंतपणाचें वाटतें. कांहीं सिनेमांतून तर मीं अशीं नृत्यें पाहिलीं आहेत कीं, त्यांना नृत्य म्हणावें कीं कसरतीचा व्यायाम हेंच कळत नाहीं आणि तोहि बेढब. खेळकर-पणें सहज स्फुरलेलीं गीतें आणि अकृत्रिम हावभाव त्यामुळें लोकनृत्यास विशेष किंमत येते. या गीतांचा आणि नृत्याचा कुणी एक कवि नाहीं, एक निर्माता नाहीं कीं एखादा दिग्दर्शक अथवा ख्यातनाम डान्सर नाहीं. सर्वच कवि. सर्वच दिग्दर्शक. सर्व डान्सर. सौराष्ट्रियन स्त्रियांचें 'रासनृत्य' पाहिलें नाहीं तर तो माणूस अभागीच !

## मवैयाचें रासनृत्य

तो सणाचा दिवस होता. सातम्-आठम्चा. आपल्याकडे गोकुळअष्टमी म्हणतात इकडे त्याला सातम्-आठम् म्हणतात. राजकोटपासून अठरावीस मैलांवर मवैया हें एक ल्हानसें खेडें आहे. तेथील रासनृत्य हें प्रेक्षणीय असतें असें कळल्यामुळें मी मुद्दाम तेथें गेलों. दुपारनंतर नृत्याचा कार्यक्रम सुरू होतो. मवैया हें ल्हानसें खेडें खरें; परंतु तिथपर्यंत वीज जाऊन पोंचली आहे. इकडील लोक सधन आणि तशांत सणाचा दिवस. लाडू-जिलेबीचा नुसता धुडगूस चालला होता प्रत्येक घराघरांतून. सौराष्ट्रियन शेतकऱ्यांच्या घरची शुद्ध तुपाची ही मेजवानी चाखण्याची नव्हे पोट-भर झोडण्याची संधिहि आम्हांला मिळाली आणि मग आयतेच आम्ही त्यांच्या कार्यक्रमांत सामील झालों. आम्हांला नाचतां-गातां येत नव्हतें आणि आमचा पोषाख त्यांच्याहून भिन्न होता. बाकी त्यांतलेच आम्ही, या भावनेनें लोक आम-च्याशीं वागत होते. माझ्याबरोबर माझे एक नातेवाईकहि होते. ते इकडे पोलिसची नोकरी करतात. त्यामुळें तर आम्हांला विशेष आदरानें वागविलें जात होतें.

दुपारीं चार वाजल्यानंतर मंडळी गटगटानें बाहेर पडते. चाळीस-चाळीस, पन्नास-पन्नासाच्या गटानें स्त्रिया जमतात. मोठ्या गांवांतून ही संख्या मोठी असते. नवा

पोषाख करून नटूनथटून स्त्रिया आलेल्या असतात. पुरुषहि नटण्याच्या बाबतींत मागें राहात नाहींत. अर्थात् त्यांच्या नटण्याला आजचा आपल्याकडील फॅशनेबल तरुण हें सोंग सजलें, असें म्हणेल ती गोष्ट वेगळी; परंतु त्यांचा बापड्याचा समज असतो कीं, आपण केलेला हा पोषाख मोठाच रुबाबदार आहे म्हणून. तंग विजार. कमरे-च्याहि वर तरंगणारा आणि शेंपन्नास चुण्यागुण्यांचा झालर असलेला सदरा (?), भडक रंगाचा लाल, पिवळा अगर असाच एखाद्या रंगाचा फेटा. गळ्यांत रुमाल. हातांत रंगीत मण्यांनीं मढवलेली काठी. अश्या थाटांत ही स्वारी जेव्हां वर हात करून नाचूं लागते, तेव्हां कमरेवरला सदरा पोटाच्याहि वर सरकतो आणि पाहण्या-सारखें सोंग दृष्टीस पडतें. एक मोठा घागरा. पिवळा अगर भडक लाल रंगाचा. कांचोळीहि तशीच आणि ओढणी असा आहे स्त्रियांचा पोषाख, परंतु तो दिसतो सुंदर ! सुंदरच म्हटलें पाहिजे. कारण तो स्त्रियांचा पोषाख आहे ना. कांहीं स्त्रिया घोंगड्या नेसतात. अगदीं आपल्याकडे साडी नेसतात तसा काळ्या अगर रंगीत घोंगडीचा उपयोग साडीसारखा करतात. तरीहि त्या सुंदर दिसतात. कदाचित् स्त्री-प्रेक्षकांचा अनुभव याउलट येण्याचा संभव आहे. म्हणजे त्यांना या हेंगाडी पोषाखांतले तरुण आवडायचे आणि पुरुष प्रेक्षकांस आवडतात स्त्रिया. तास अर्ध्या तासांतच सर्व तयारी होते.

स्त्रिया गोलाकार फेर धरून उभ्या राहतात. या वर्तुळांत कांहीं वाद्यकाम करणारी मंडळी बसते. इतर पुरुष तेव्हां प्रेक्षकाचें काम करतात आणि मग नृत्य सुरू होतें. तबल्याच्या ठेक्यावर शेंदोनशें पायांचे ठेके पडतात. पेटीच्या सुरांत नाजूक सूर मिसळले जातात आणि मग एक कर्णमधुर संगीत नृत्याच्या झंकारांतून तरळतें. त्यांत शृंगार असतो, भक्ति असते, उन्माद व मस्तीहि असते.

**" शारदा पुनम की रातडी ने ओल्यों चांदों पड्यों आकाशरें**
**आवले आशा भर्या ।**
**आशा भर्याने अमें अवियाने मारेवाले रामज्या सासरे**
**आपले आशा भर्या ।**

पूर्ण गाण्याचा थोडक्यांत अर्थ असा आहे कीं, गोपी श्रीकृष्णास भेटण्यासाठीं आतुर झालेल्या आहेत. त्या अशा दिवसाची आतुरतेनें वाट पाहात आहेत कीं,

त्या दिवशीं श्रीकृष्ण त्यांना भेटेल. त्यांच्याबरोबर रासनृत्य करील. त्या आनंदांत तो दिवस घालवतील. श्रीकृष्णाबरोबर रासनृत्य करण्याची सर्व गोपींची तीव्र इच्छा आहे. पौर्णिमेच्या अशा त्या दिवसाचीच त्या वाट पाहात आहेत.

अशा अर्थाचीं किती तरी गाणीं गायिलीं जातात. दोन्ही हातांनीं झोका घेऊन टाळी वाजविण्याची तऱ्हा, पायाला विशिष्ट लचक देऊन त्याचा जमिनीवर धरलेला ठेका, मागेंपुढें सरकण्याची ढब, विजेची चपलता, सर्व कांहीं मनोहर. अक्षरशः मनाला हरण करणारें, असें हें रासनृत्य असतें. पुष्कळ प्रयत्नानंतर मी या नृत्याचा फोटो घेऊं शकलों. कारण येथील लोकांचें अज्ञान. त्या मानानें हे लोक मला फार अडाणी वाटले. फोटो घेण्याला सक्त विरोध केला त्यांनीं; परंतु पुस्तक लिहिण्यासाठीं मीं हें नृत्य पाहण्यास आलों आहें व त्यांत फोटो दिल्यानें तें चांगलें होईल! असें जेव्हां मीं त्यांना सांगितलें, तेव्हां कुठें तशी परवानगी मिळाली आणि मी सर्व भारतभर प्रवास करीत आहें असें जेव्हां त्यांना कळलें तेव्हां तर ते अगदींच खूष झाले. ते इतके कीं, इतरहि वेळेस जीं गाणीं ते गातात तीं सर्व गाणींहि त्यांनीं मला म्हणून दाखविलीं.

**विवाहप्रसंगींचें गीत**

**ढोलीडा धुडक्या लाडी चालो अपने घरे रे ।**
**उभा रहे तो मागू मारा दादा पासे शिखरे ।**
**हवे केसी शिखरे लाडी, हवे केसी बोल रे ।**
**परण्या एटले प्यारा, लाडी चालो अपने घरे रे ।**

विवाह झाल्यानंतर वधूवरांस निरोप देण्यासाठीं वधूपक्षाचे लोक गांवाबाहेर जातात. ही मंडळी परत फिरते तेव्हां वधू त्यांच्यांत घोटाळते. अशा वेळीं सासरच्या लोकांकडून स्त्रियांनीं गाइलें जाणारें तें गीत आहे. वरपक्षाची बाजू घेऊन त्या हें गीत गातात आणि त्यांतून सांगतात कीं, “ हे लाडके, आतां तूं आमची झाली आहेस. आईबापांची नाहींस. म्हणून माहेर सोडून सासरीं चल. उशीर करूं नकोस! चल लवकर. हे बघ, हे शहनाईवाले शहनाई वाजवून तुला बोलावीत आहेत. तेहि सांगत आहेत कीं लवकर चल ! उशीर नको.”

एक ना दोन शेंकडों गीतें मी ऐकलीं अशीं.

## कोपरगांवची टोपी सौराष्ट्रांत

नाशिकचीं द्राक्षें, मुंबईचा हलवा, चौपाटीची भेळ, मथुरेचा पेढा, आग्र्याचा पेटा आणि धारवाडी काटा जसा प्रसिद्ध तशी कोपरगांवची टोपी. आतांपर्यंत मला कोपरगांवचा गूळच प्रसिद्ध वाटत होता. परंतु जेव्हां जुनागडला मीं ही टोपी पोंचलेली पाहिली तेव्हां मला असें कळून चुकलें कीं, गुळाबरोबर या टोपीनेंहि नांव कमावलें आहे.

मी स्टेशनवर सहज फिरत होतों. त्या हजार-पांचशें लोकांतहि ही टोपी ओळखली मीं चांगली. बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या टोपीसारखी वीतभर उंचीची ही टोपी; परंतु बेतून मापून न घेतल्यानें बळदाटीनें डोक्यांत कोंबलेली. अशा दहावीस टोपीधारींचा एक गट दिसला मला स्टेशनवर. मीं ओळखलें ! ही कोपरगांवची मंडळी. लागलीच जवळ गेलों नि नमस्कार ठोकला. ही मंडळी आपल्या खास अजब हिंदींत बोलूं लागली, " तूम कायकू गांवके रहनेवाले है ? हमारे नगर साईटके है क्या ? तुमकू मराठी येता है ? " मीं म्हटलें, " चांगलें मराठी येतें पाटील. कशाला त्या हिंदीची कुतरओढ करतां ? बोला आपल्या मराठींत." त्यावर एक मोठा निश्वास टाकून पाटील म्हणाले, " काय बोलतां राजे. पंचाईत सगळी. पैसे असून मारामार. धड बोलतां येईना कीं धड फिरतां येईना. देवाचं काम म्हणून आलों, नाहीं तर छे, जन्मांत नाहीं मीं सोडलं कधीं घर. " त्याच्याबरोबर असलेल्या पाटलीणबाई कण्हत खालीं बसण्याचा प्रयत्न करीत म्हणाल्या, " अन् त्या गिरणारवर भल्याच्या लेकानं चढूं नहीं बाबा. दोन दिवस झाले, पण बसता येत नाहीं का उभं राहतां येत नहीं. पाय तुटून गेले तरी बर. ठणक लागलीय नुसती ! " गिरनारवर चढणाराची अशीच स्थिति होते आजीबाई. तुम्ही तरी म्हाताऱ्या आहांत, परंतु माझे देखील पाय दुखतात तीन दिवसांपासून. आजच बाहेर पडलों. तीन दिवस खोलींत पडून होतों. एवढ्या दूरवर ही मराठी मंडळी भेटल्यानें मला खूप आनंद झाला. त्यांनाहि बरें वाटलें. त्यांची गाडी येईपर्यंत आम्हीं मनसोक्त गप्पा केल्या. चर्चेंतून कळलें कीं, घर सोडून त्यांना तीनचार आठवडे झाले होते. तीर्थयात्रा करीत ते फिरत होते. प्रत्येकीं पांचशें रुपये खर्च होऊन गेला होता आणि अजून शेंकडों मैलांचा प्रवास करून घरीं जायचें होतें. त्यामानानें माझें शंभर रुपये किंमतीचीं पुस्तकें आणि तीस रुपये रोख, हें भांडवल पुष्कळ टिकलें. कारण तिकिटाशिवाय खर्चच नव्हता दुसरा

मला कांहीं आणि तशांतहि कांहीं व्याख्यानाचे कार्यक्रम झाल्यानें शेंदीडशें रुपयांचा हातभार त्यांतून लागला. विनोबांच्या आश्रमांतील कार्यकर्त्यांनीं ठिकठिकाणच्या लोकांकडे ओळखपत्र मला दिलें असल्यानें इतरहि खूप मदत झाली. त्यामुळें या वेळेस नेहमींप्रमाणें त्रास तर झाला नाहींच; पण अगदींच आरामांत पार पडली ही सफर !

## शेठजींना सल्ला

आतांच मीं एक म्हण ऐकली. म्हण ग्रामीण आहे; परंतु आहे मोठी अर्थपूर्ण. 'व्यापारी बच्चा कभी नहीं बोलेगा सच्चा ! कभी बोलेगा सच्चा तो उसका गुरु हो कच्चा' ही म्हण बहुधा शेठजींना मनोमन पसंत पडेल. माझा सल्ला जरा जड आहे. अजीर्ण होण्याची शक्यता आहे; परंतु कित्येकांनीं तो पचविला आहे. प्रयत्न केल्यास सर्वच शेठजींना तो पचण्यासारखा आहे. मी येथें—म्हणजे जुनागडला—एका ग्रामसेवक ट्रेनिंग कॉलेजांत उतरलों होतों. या कॉलेजला एका धनाढ्य गृहस्थानें जमीनजुमला व शेतीचीं औजारें वगैरे मिळून सुमारें साडेचार लक्ष रुपये किंमतीची संपत्ति दान दिली. केवढें मोठें काम केलें हें. शेंदोनशें ग्रामसेवक त्यांत शिकतात. शेती करतात. उत्पन्न काढतात. नवभारताच्या उभारणींत देशाला अत्यंत उपयोगी असे ट्रेंड कार्यकर्ते मिळणार आहेत या ट्रेनिंग सेंटरमधून. सर्व शेठजींनीं जर यांचें अनुकरण केलें तर हां हां म्हणतां देशाचो भरभराट होईल. हा सल्ला इतका कांहीं अजीर्ण होण्यासारखा नाहीं. मी तर म्हणेन कीं अति खाल्लें तें पचण्याचा हाच रामबाण मार्ग आहे. नाहीं तर अजीर्ण होईल. वांती होण्याचा संभव असतो अति खाल्ल्यानें. अनेक विद्वान् हा सल्ला देत आहेत; परंतु बोटींतल्या व्यापारी मारवाडी प्रवाश्यांची गोष्ट आहे ना. त्याला समुद्रप्रवासांत बोट लागली. त्याला उलटी होण्याचा संभव दिसतांच एका चतुर माणसानें सल्ला दिला. एक तांब्याचा पैसा तोंडांत धरून खिडकींत तोंड धरून खालीं पाण्याकडे पाहा! त्याप्रमाणें त्या मारवाड्यानें केलें आणि काय चमत्कार ! क्षणार्धांत थांबली त्याची वांती. तो गुण कसा आला ? अहो, वांती झाली तर तोंड उघडेल, आणि पैसा समुद्रांत पडेल. घट्ट दाबून धरली ती त्यानें. कसली वांती नि कसलें काय ! पैशापुढें सब झूट ! एका तांबड्या पैशासाठीं ज्यानें वांती पचविली ते लाखाची गोष्ट ऐकून काय करणार नाहींत ? छाती बडवून वेताळासारखें तांडवनृत्यच सुरू करतील ?

## अप्परकोट किल्ला

जुनागड येथील हा प्राचीन किल्ला प्रसिद्ध व प्रेक्षणीय आहे. यांत असलेली एक बारव व विहीर तर इतकी प्रेक्षणीय आहे कीं, त्यासंबंधानें एक म्हण इकडे प्रसिद्ध आहे. "अडीचडी बावने नवघइ कुंआँ जेणे न जोया न जीवीता मुआ" अडीचडी नांवाची बारव व नवघण विहीर अथवा आड— ज्यानें पाहिली नाहीं तो जीवंत असूनहि मुडदा, असा या म्हणीचा अर्थ आहे. बरें झालें ही म्हण आठवली. नाहीं तर ज्या वाचकांना प्रवासाची आवड फारशी नाहीं किंवा ज्यांना आवड असूनहि प्रवासास जाणें अनेक अडीअडचणींमुळें शक्य नसल्यानें ते प्रवास करूं शकत नाहींत त्यांना प्रवासांतील गंमती व आनंद अनुभवण्यास मिळत नाहीं. तेव्हां अत्यानंदाच्या भरांत आम्ही कधीं कधीं त्यांना अभागी वगैरेसारखीं विशेषणें लावून मोकळे होतों. यांत कुत्सित बुद्धि अथवा कुणाला उणें लेखण्याचा हेतु नसतो, परंतु प्रवासांत मिळणारा आनंद कशा प्रकारचा असतो याचें हुबेहुब वर्णन करण्याच्या भरांत आपण कुणावर कठोर टीका करतों आहोंत हें लक्षांतच येत नाहीं; परंतु अशा वाचकांचा मात्र तसा ग्रह होण्याची शक्यता असते. म्हणून आतां असा ग्रह झालाच तर फार तर ते सौराष्ट्रियन लोकांस दोष देऊन मोकळे होतील आणि मी नामानिराळा राहून जाईन. कारण ही म्हण कांहीं मीं तयार केलेली नाहीं.

अप्परकोट किल्ल्याचें प्रवेशद्वार व त्याच्या दोन्ही बाजूंची तटबंदी इतकी प्रचंड आहे कीं ती पाहून प्रेक्षक थक्क होतो. जुन्या काळच्या स्थापत्यकलेचें कौतुक तर वाटतेंच; परंतु प्रवाशाची मति गुंग होऊन जाते हें प्रवेशद्वार पाहिल्यावर. आंत विशेष प्रेक्षणीय असें दुसरें कांहीं नाहीं. वर उल्लेखिलेल्या दोन्ही ठिकाणांखेरीज एक जुना राजवाडा, शहरास पाणीपुरवठा ज्या तळ्यांतून केला जातो असे दोन तलाव, भुयारी रस्ता वगैरे ठिकाणें पाहण्यासारखीं आहेतहि, परंतु फक्त तलावच चांगल्या स्थितींत आहेत. बाकी सर्व पडझड व ओसाड जंगल आंत आहे.

## जेलजवळील दर्गा

जुनागड येथील जेल खूप प्रचंड आहे. त्याची ती मजबूत तटबंदी पाहून मला तो एखाद्या किल्ल्यासारखाच दिसला. चौकशीअंतीं कळलें कीं तो तुरुंग आहे. अर्थातच तो पाहण्यासाठीं खास परवानगी घेण्याची गरज असणारच. घर सोडून बरेच दिवस

झाले होते आणि गिरनार व आसपासचीं ठिकाणें पाहण्यांत माझे पुष्कळ दिवस खर्च झालेले होते. त्यामुळें येथील हा जेल पाहण्याचें जमलें नाहीं. मात्र जवळूनच जुनागडच्या नवाबाची एक मशीद व दर्गा प्रेक्षणीय आहे, तो पाहून मीं जुनागडचा निरोप घेतला.

१२८९.

## नवाबाचें कबरस्थान

या वेळच्या प्रवासांत अहमदाबाद येथें मीं अनेक पुष्कळ मशिदी, दर्गे अथवा कबरस्थानें पाहिलीं होतीं; परंतु येथील ह्या दोन्ही इमारती वैशिष्ट्यपूर्ण असून सुंदर आहेत. दर्ग्यांत नबाब व त्याच्या घराण्यांतील स्त्रीपुरुषांचीं प्रेतं पुरलेलीं असून वर सुरेख संगमरवरी दगडांच्या कबरी बांधलेल्या आहेत. अतोनात खर्च करून या इमारती बांधलेल्या असल्यानें त्या प्रेक्षणीय झाल्या आहेत.

## सात वारांचें माहात्म्य

असें म्हणतात कीं, ज्याच्या पायावर चक्र आहे असा माणूस प्रवास करीत असतो. माझ्या पायावर असें चक्र आहे कीं नाहीं हें मला माहीत नाहीं; परंतु असें चक्र नसेल तर वरील समजूत चुकीची आहे असेंच मी म्हणेन. आतांपर्यंत मीं भारतांत सुमारें तेरा-चौदा हजार मैल प्रवास केलेला आहे आणि याहिपेक्षां खूप मोठा प्रवास करण्याची माझी इच्छा आहे. योग असल्यास थोड्या दिवसांत मी परदेशाच्या प्रवासासहि जाण्याची शक्यता आहे. यत्नानें असाध्य तें साध्य होतें असा माझा विश्वास आहे. म्हणून केवळ योगायोग किंवा ज्योतिषशास्त्र वगैरे सारख्या गोष्टींवर मी विश्वास ठेवीत नाहीं; परंतु सहज एक कविता आठवली तींत—

> **मिळणार नाहीं शत्रु त्याला जो बुधवारीं जन्मला**
> **घडेल प्रवास फार त्याला, जो गुरुवारीं जन्मला**
> **जीवनासाठीं कष्ट घेतो तो शनिवारीं जन्मला**

सर्वांवरी प्रेम करी, असतो उत्तम खेळकरी, त्याचा जन्म कोण वार ? कवीची थोडी गल्लत झालेली दिसते. तसें पाहिलें असतां आतांच्या माझ्या शरीरांत वरील पांचहि वारांचा थोडाबहुत वास आहेच. परंतु एक ओळ वास्तविक अशी हवी होती—

> **घडेल प्रवास फार त्याला, जो रविवारीं जन्मला**

REFBK-0012989